रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २२ ऑक्टोबर २०२३



# जातगणना विरुद्ध 'रोहिणी ब्रह्मास्त्र'?

# OBC

आधुनिक केसरी

स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने राष्ट्रवाद व विकास प्रश्नावर निवडणूका जिंकल्या आहेत. काँग्रेसने राष्ट्रवादाला तर तिलांजली दिली आहे. आता या पक्षाची धर्म, जात, तुष्टीकरण व मोफत योजनांचा आधारावर निवडणूका जिंकणे हे त्यांचे नीती बनली आहे.तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे तर देशातून जात हा शब्द नष्ट झाला पाहिजे, असे मत होते. पण आज त्यांचे वारसदार व नातू राहुल गांधी यांनी पाच राज्यातील विधानसभा सत्ता मिळविण्यासाठी जातीय जनगणनेचे वचन देत आहेत. देशाचा अमृत महोत्सव साजरा होत असताना काँग्रेस पक्षाला जातीयतेच्या कुबड्या घ्यावा लागत आहे, ही दुर्देवाची बाब आहे.

स्वातंत्र्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्य घटनेत सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागासवर्गाच्या घटनेच्या कलम ३४१ व ३४२ नुसार अनूसूचितजाती व अनुसूचित जातीना आरक्षणाची तरतूद केली. राज्य घटनेत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना आरक्षणाची तरतूद नाही. राज्य घटनेत कलम ३४० अन्वये सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या सुधारण्याच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी आयोग नेमण्याची तरतूद आहे. राष्ट्रपतींना याबाबत आयोग नेमण्यास मान्यता अधिकार आहे. आरक्षण देण्यामागे मागसवर्गांना राजकीय, शैक्षणिक व आर्थिक लाभ मिळावा, हा उद्देश आहे. आरक्षण म्हणजे अवघड जागेचे दुखणे आहे. काँग्रेस सरकारने अनेक आयोग नेमले,पण इतर मागासवर्गांना म्हणजे ओ.बी.सीं.ना आजपर्यंत न्याय देऊ शकला नाही. सद्या काँग्रेस पक्ष व गांधी परिवार सत्तेसाठी वाटेल ते करावयास तयार आहे. देशात ध्यप्रदेश, राजस्थान छत्तीसगड, तेलंगाना, मिझोराम राज्यात काँग्रेसची सत्ता आली तर जातीय जनगणना केली जाईल, असे जाहीर केले. ही पक्षाची राजकीय खेळी आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी देशात जातीय जनगणनेचा हट्ट धरला होता. त्यानंतर बिहार राज्यात जात सर्वेक्षण केले, त्यावर ५०० कोटी खर्च केले. राज्याच्या या जातीय सर्वेला फारसे महत्व नाही.बिहार जातीय सर्वेक्षणाचा तपशील जाहीर झाला. बिहारमध्ये 'जिसकी संख्या भारी उसकी सत्ता मे जादा भागिदारी' असा नारा दिला जातो. राज्यात एकूण ओबीसीची लोकसंख्या ६१.१ टक्के आहे. यात लालू प्रसाद यांचे यादव सर्वाधिक १४.२६ अधिक तर नितीशकुमार यांचे कुर्की समाजाची संख्या २.८७ टक्के इतकी आहे. मग सत्तेची भागिदारी कोणाची राहील ? या सरकारकडे इतर मागासजातींना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याचे कोणतेही नियोजन केलेले नाही. केवळ याचा राजकीय फायदा होतो का? हेच पाहिले जात आहे. देशात जातगणना केली नवीन आकडेवारीनुसार देशभर नवीन आरक्षणाची मागणी केली जाईल. देशात जातीभेद आणि अस्पृश्यता हा समाजाला लागलेला कलंक आहे. डॉ. आबंडेकर यांनी देशातील जातीयता नष्ट करण्यासाठी लढा दिला. रि.प. पक्षाचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी पूर्वी शाळेच्या दाखल्यावर जातीच्या ऐवजी 'भारतीय' उल्लेख करावा अशी सूचना केली होती. देशात जातीयचा नष्ट करावयाची असेल तर जातीच्या नावाने मिळणारे विशेषाधिकार बंद केले पाहिजेत. तसेच वंचिताचा शोध घेता आला पाहिजे, असे जाणकारांचे मत आहे. देशातील राजकीय नेते स्वार्थासाठी जातीचा आणि धर्माचा वापर करतात. त्यामुळे सामाजिक कटूता वाढत चालली आहे. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने जात पात, धर्माचा आधार न घेता केवळ विकासाच्या मुद्दावर निवडणूका लढविल्या. पण आज काँग्रेसकडे चेहरा बदलेला आहे. काँग्रेसचे राजपूत्र राहुल गांधी जातीगणनेच्या कबुड्या घेत आहेत. यामागे सत्ताकारण हेच आहे. केंद्रात ज्या पक्षाची सत्ता असते ते सरकार जातगणनेस मूरड घालतात तर विरोधी पक्षात असले की, जातगणनेची करतात. मग काँग्रेस असो, भाजपा तेच करत आहेत. लोकसभा निवडणुकीत २०१९ निवडणुकीत भाजपाला ओ. बी.सी.चे ४५ टक्के मते पडली, ही काँग्रेसची पोटदुखी आहे. त्यामुळे पक्षाने जातीय जनगणनेची मागणी सुरु केली. देशात ओ.बी सीं.ची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही, ही लोकसंख्या ५० टक्यापेक्षा असावी, असा अंदाज आहे. यासाठी जातीय जनगणनेची मागणी केली जात आहे. यातून जातगणना केली तर सहानुभूती मिळेल असे काँग्रेसला, असे वाटतेय! तर भाजपाला जातगणनेमुळे हिंदू समाज जाती -जातीत विभागाला जाईल व त्याचा पक्षाला फटका बसेल याची भीती आहे. देशात २०११ नंतर जनगणना झालेली नाही. १९८९ पासून ओ.बी.सी. मतदार हा काँग्रेस पक्षापासून दूर गेला आहे. पुन्हा हा समाज जोडण्याचा प्रयत्न आहे. काँग्रेसला ओबीसी समाजाबद्दल सहानूभूती नाही. भारतात ब्रिटिश राजवटीत १८३२ व १९३१ मध्ये जनगणना केली गेली. केंद्राचे म्हणणे १९३१ मध्ये देशात एकूण जातीची संख्या४१४७ होती. जनगणना करण्याचा अधिकार हा केंद्राला देण्यात आहे. स्वातंत्र्यानंतर १९५१ पहिली जनगणना करण्यात आली. तेव्हा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजातीची संख्या संकलित केली. तेव्हा केंद्र सरकारने जातीय सर्वेक्षणाला करण्यास नकार दिला. १९४८च्या जनगणनेच्या कायद्यात जातगणना करण्याची तरतूद नाही. घटनेचे कलम ३४० नुसार मागासजातीसाठी २३ जून १९५३ रोजी काका कालेकर आयोग नियुक्त गेला होता. या आयोगाने देशात २३९९ मागास जाती व ८७७ अति मागास जाती असल्याचे नमुद केले. पण केंद्र सरकारने आयोगाचा आकडेवारी वस्तुनिष्ठ नसल्याचे कारण देत तो स्विकारला गेला नाही. नंतर १९७९ मध्ये केंद्राने इतर मागासजातींना सामाजिक व शैक्षणिक आरक्षण देण्याचा उद्देशाने मंडल आयोग स्थापन केला. तोही अहवाल काँग्रेसने गुंडाळून ठेवला. माजी पंतप्रधान व्ही.पी सिंगांनी १९९० मध्ये लागू केला. तेव्हा सामान्य वर्गातील विद्यार्थ्यांनी या विरोधात आंदोलन छेडले होते. आजही खुल्या वर्गातील तरुणात आरक्षणाविषयी नाराजी अधिक दिसून येते. याचे कारण आरक्षण गुणवत्तेनुसार दिले जात नाही. खूल्या वर्गातील विद्यार्थ्याला अधिक गुण असून सुध्दा शैक्षणिक क्षेत्रात प्रवेश व नोकरी नाकारली जातेय. तसेच खुल्यावर्गाला शैक्षणिक शुल्क अधिक आकारली जाते. यामुळे तरूणात नाराजीचा सूर दिसून येतो. दुसरीकडे खूल्यावर्गातील मंडळी इतर मागासजातीचे प्रमाणपत्र मिळवून ते राखीव जागातून उभे निवडून येत आहेत. यात गऱ्या मागासवर्गीयांचा राजकीय हक्कावर गदा येत आहे.तसेच मंडल आयोगामुळे जनतादल, समाजवादी पक्ष प्रादेशिक पक्षांना राजकीय लाभ झालेला आहे.काँग्रेस सरकारने २०११ मध्ये सामाजिक,आर्थिक जातीय सर्वेक्षण केले. तेव्हा एकूण जातीची संख्या ४६ लाख होती.तर महाराष्ट्रात अनुसूचित जाती, अनुसूचित अनुसूचित जमाती ओबीसी जातीसंख्या ४९४ वतर राज्यात एकूण जाती ४ लाख२८ हजार ६७७ आहेत. पण जातीचा संपूर्ण तपशील सार्वजनिक करण्यात आला नाही. कर्नाटक सरकारने २०१५ मध्ये जातीय सर्वेक्षण केले, पण आकडेवारी जाहीर केली नाही.राजकीय पक्षांना याचा फायदा होईल तर कांहीना नुकसान होईल वाटत होते. भाजपा सरकारने सामान्य वर्गातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना दहा टक्के आरक्षण देण्याचा २०१९ मध्ये कायदा केला. ज्याचे उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी व पाच एकर पेक्षा जमीन घराचे निकष आहेत. त्यांना ( ईडब्लूएस) नोकरीत व शैक्षणिक आरक्षण दिले जात आहे. महाराष्ट्रात याचा गरीब मराठा समाजाना लाभ मिळू शकतो. मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी १९८० पासूनची आहे. त्यासाठी ४२ आतापर्यंत बलिदान दिले. महाराष्ट्रात भाजपा व शिवसेनेचे सरकार आले तेव्हा तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एम.जी. गायकवाड आयोग नेमला. या आयोगाच्या अहवालानंतर ३० नोव्हेबर २०१८ रोजी मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला गेला. याला उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. पण न्यायालयाने गायकवाड आयोगाचा अहवाल मान्य करत आरक्षण १६ टक्यावरुन १३ टक्के मान्य केले. नंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. दरम्यान राज्यातील सरकार बदलले. महाविकास आघाडीचे सरकार आले. त्यांनी याकडे दुर्लक्ष केले.सर्वोच्च न्यायालयाने दि. ५ मे २०२१ रोजी मराठा आरक्षण रद्द ठरविले. तेव्हा राज्य सरकारने न्यायालयात योग्य बाजू मांडली गेली नाही, असे कायदे तज्ज्ञांचे मत आहे. तेव्हा मराठा नेते दोन वर्षे गप्प का राहिली ?तेंव्हा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण होते. त्यांची जबाबदारी नव्हती काय? सद्याचे राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यास सकारात्मक आहे. काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नेत्यांनी व आमदारांनी ५५ वर्षात मराठा समाजाच्या नावावर सत्ता मिळविली व भोगली. त्यांनी समाजासाठी काय केले? याचा जवाब त्यांना विचारला का जात नाही? आता मनोज जरांगे यांचे नेतृत्वाखाली मराठा समाज एकवटला आहे. तरुणांची साथ मिळत आहे. त्यांनी समाजाला आरक्षण दिल्याशिवाय राहणार नाही, असे म्हटले आहे. पण हे आरक्षण कसे देता येईल? याबाबत घटना व कायदा काय तरतूदी आहेत? याचा अभ्यास केला पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा नेते शरद पवारांचा पक्ष मराठा समाजाचे प्रतिनिधीत्व करतो, असे मानले जाते. त्यांना समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न महत्वाचा कधीच का वाटला नाही? याच पवारांनी आर्थिक निकषावर आरक्षण देण्याची मागणी केली होती. या पवारांना महाराष्ट्रात पक्षाला एक हाती सत्ता आणता आली नाही. ते मात्र विदेश नीतीवर व पंतप्रधान मोदीवर टीका करुन आपण राष्ट्रीय नेते असल्याचे दाखवितात.फिलिस्तानच्या नावाखाली ते 'हमास' समर्थन करत आहेत. कारण त्यांना समाजापेक्षा मुस्लिम मताची चिंता अधिक आहे. यातून काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षांची तुष्टीकरण नीती स्पष्ट होते. आरक्षण प्रश्नावर समाजाच्या किती नेते व आमदारांनी राजीनामे दिले? या आमदारांनी लोकप्रतिनिधींनी मराठा समाजाची फसवणूक केली नाही काय? त्यांचे राजीनामे का मागितले जात नाहीत? मंडल आयोगाच्या अहवालानुसार ओबीसींमधील एकूण जातीची संख्या ३७४३ तर इतर मागासवर्ग राष्ट्रीय आयोगानुसार एकूण ५०१३ जाती आहेत. त्यात नवीन जातीचा समावेश झाला आहे. ओ.बी.सीं.मधील सर्वजातीला आरक्षणाला लाभ होत नाही, हे वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रात मराठा समाजाला आरक्षणाला कोणाचाही विरोध नाही. पण मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र व ओबीसीत समावेश करता येतो का? याबाबत कायदेशीर बाजू अभ्यासली पाहिजे. समाजाला स्वतंत्र आरक्षण नको आहे का ? या आरक्षणाचा नोकरी, शिक्षणापेक्षा राजकीय फायदा अधिक होईल. कारण महाराष्ट्रात १८ लाख शासकीय कर्मचाऱ्यावर सुमारे वेतन निवृत्तीवर सुमारे ६० टक्के खर्च होतोय! तो भविष्यात वाढत जाणार आहे. त्यामुळे भविष्यात शासकीय नोकरी व खर्चावर मर्यादा येण्याची शक्यता आहे. तेव्हा सर्वांना शासकीय नोकरी मिळेल याची खात्री नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. पण आरक्षणाच्या नावावर राजकीय नेते ओ.बी.सीं.च्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ५६ हजार राखीव जागावर दावा करत राहतील. मराठा समाजाला ओ.बी.सी.मध्ये समावेश ओ.बी. सी. संघटनाचा विरोध आहे. काँग्रेस दोन्ही डगरीवर हात ठेऊन राजकारण करत आहे. या समाजाला आरक्षण देण्याबाबत सकारात्मक सूचना करत नाही केवळ राजकीय टीका केली जाते. सर्व नेत्यांनी पक्षाचे जोडे बाजूला ठेऊन एकत्र निर्णय घ्यावा. मराठा व मराठेत्तर वाद होणार नाही, हेच पुरोगामी महाराष्ट्राच्या हिताचे आहे. समाजाला दिलेले आरक्षण कायद्याने टिकले पाहिजे, याची काळजी घेतली पाहिजे. मराठा नेत्यांना कायदेशीर लढाही द्यावा लागेल. शिंदे -फडणवीस -दादा सरकार मराठा समाजाला आरक्षण कसे देणार? हे स्पष्ट केले नाही. ते अंधारात ठेवले जात आहे. राज्य सरकारने झुलवत न ठेवता समाजाला आरक्षण देता येते की नाही, हे तरी स्पष्टपणे सांगावे. महाराष्ट्रात भाजपा सरकार व निवडणूका आल्या की, मराठा आंदोलन सुरू होते. त्याला विरोधी पक्षाचे छूपे प्रोत्साहन आहे, असा आरोप केला जातोय.

महाराष्ट्रात मराठा आरक्षणावरुन तर केंद्रात पातळीवर ओ.बी.सी.च्या विषयावरुन भाजपाला लक्ष्य केले जात आहे. यामागे मताचे धृव्रीकरण व्हावे, हाच हेतू आहे. हे प्रश्न सामाजिक ऐवजी राजकीय प्रतिष्ठेचा बनला आहे. भाजपा सरकारने २ ऑक्टोबर २०१७ मध्ये ओबीसी जातीच्या अभ्यासासाठी निवृत्त न्यायाधीश जी. रोहणी आयोग स्थापन केला होता. या आयोगाला चौदा वेळा मुदत वाढ देण्यात आली होती. या आयोगाने अहवाल ऑगस्ट २०२३ मध्ये राष्ट्रपती द्रोपदी मूर्म यांचेकडे सादर केला. रोहणी आयोगाचा अहवाल राजकीयदृष्ट्या संवेदनशील असल्याने तो गोपनीय ठेवण्यात आला आहे. या आयोगाने महाराष्ट्रासह ११ राज्यातील ओ बी.सीं.चे उपवर्गीकरण केले आहे.यात सुमारे ३ हजार ओ.बी.सी. उपजाती आहेत. यासर्वांना केंद्रिय २७ टक्के कोट्याचा समान वाटा निश्चित करणे हा उद्देश आहे. मोदी सरकारने २०२४ च्या निवडणुकीपूर्वी रोहणी आयोग स्विकारला व लागू केला तर! तो विरोधी पक्षाविरोधात ब्रह्मास्त्र ठरेल! यातून 'इंडिया आघाडी'चे पानिपत होईल, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.






कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850



मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## आँखोंसे जो उतरी हैं दिलमें...

ज्यांना आपण आधुनिक वाल्मिकी म्हणतो ते ग दि माडगूळकर गीतरामायणाच्या लेखनामुळे अजरामर झाले. हेच गीतरामायण बाबूजी उर्फ सुधीर फडके यांनी गाऊन अजरामर केले. यातील ते गीत सहजच ओठांवर येते. स्वये श्रीरामप्रभू ऐकती, कुश लव रामायण गाती. मग ही गाणारी मुले कशी आहेत याचे चित्रमय वर्णन गदिमा करतात. ते म्हणतात राजस मुद्रा वेष मुनींचे, गंधर्वच ते तपोवनींचे अशा एकेक ओळी आठवत जातात. या सगळ्यांचा श्रोतृवृंदावर काय परिणाम होतो, तो पण गदिमा जणू सचित्र आपल्या डोळ्यांसमोर उभा करतात. ते म्हणतात सामवेदसे बाळ बोलती, सर्गामागुनी सर्ग चालती सचिव मुनिजन प्रिया डोलती, आसवे गाली ओघळती. प्रत्यक्ष श्रीरामांवर काय परिणाम झाला तर... सोडून आसन उठले राघव, उठुनि कवळती अपुले शैशव पुत्रभेटीचा घडे महोत्सव, परी जो उभया नच माहिती. अशी जादू जणू हे शब्द करतात ! मग ते शब्द वाल्मिकींचे असोत वा गदिमांचे. ती अमूर्त अक्षरे ध्वनीचे रूप घेऊन कानावाटे हृदयापर्यंत पोहोचतात. आनंदाच्या चांदण्याची बरसात होते. कर्तव्यकठोर असलेल्या श्रीरामांचे देखील डोळे पाणावतात. माया, ममता, प्रेम, करुणा सगळे सगळे भाव हे शब्द उभे करतात. असं म्हटलं जातं की प्रख्यात जर्मन कवी गटे यांनी कालिदासाच्या शाकुंतल या नाटकाचं जर्मन भाषेत केलेलं भाषांतर जेव्हा वाचलं, तेव्हा त्यांना इतका आनंद झाला की हा जर्मन कवी आपलं देहभान विसरून शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचला. कुठून आला हा आनंद ? पुस्तकाच्या वाचनातूनच ना ? या आनंदाला उपमा नाही आणि त्याची तुलना इतर कुठल्या आनंदाशी होऊ शकत नाही. त्या काळात पाश्चात्य साहित्यात सौंदर्यवाद मूळ धरू लागला होता. अशा काळात कालिदासाने लिहिलेलं शकुंतलेचं आणि निसर्गाचं वर्णन वाचून हा कवी अक्षरशः वेडा झाला. त्याने त्यावेळी शाकुंतल या ग्रंथाबद्दल काढलेले उद्‍गार असे आहेत. ' वसंतऋतूतला मोहोर आणि ग्रीष्म ऋतूतलं फळ हे सर्व एकाचवेळी ( युगपद्) ज्यात आहे, जे ( एकाच वेळी ) मनाला शांत करणारे ( संतर्पणम्) आणि मोहितही करणारे आहे.





## आनंदी पहाट

## मनात घर करून राहणारे घरच घरघर थांबवते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या घराचा संबंध आपल्या मनाशी असतो, तसंच घराच्या अंतरंगाचा संबंध त्या घरात राहाणाऱ्या व्यक्तींच्या अंतर्मनाशी असतो. त्यांचं परस्परांमध्ये एक निराळं नातं असतं. आपलं स्वतःचं, हक्काचं, आपल्या स्वप्नातलं असं घर की जे नेहेमीच आपलं वाटत असतं केवळ आपल्या अंतर्मनातील भाव भावनांमुळे. आपल्या मनातलं घर आणि घरातलं मन हे कधीही एकमेकांपसून वेगळं होऊ शकत नाही. त्यामुळे मानसशास्त्रीय दृष्टीकोंनातून घरातील वातावरण असणं आवश्यक ठरतं. यामध्ये कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा विचार करावा लागतो. प्रत्येकाच्या मानसिकतेचा अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. प्रत्येकाच्या विचारांप्रमाणे आवडी-निवडी, अपेक्षा, गरजा, शारीरिक व्यक्तिमत्व हे निराळं असतं. त्याप्रमाणे त्याला साजेसं, शोभेल असं घरातलं वातावरण असणं निश्चितच उपयोगाचं ठरतं. घरातील विविध वस्तू त्यांचे रंग, वस्तूंचे विविध आकार, निरनिराळे प्रकार, त्यांची कल्पकतेने केलेली मांडणी अशा अनेक बाबींचा थेट संबंध आपल्या मनाशी येत असतो, त्यामुळेच त्याचा परिणाम कमी अधिक प्रमाणात आपल्या मानसिकतेवर होत असतो. आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवण्याची आणि टिकवण्याची ती आपली हक्काची जागा असते. आपल्या अंतर्मनातील आनंद निर्माण करण्याची बाब ही जितकी महत्वाची असते तितकंच सौंदर्याला देखील महत्व असतं. आपण आपल्या जीवनात सौंदर्याचा शोध घेत असतो तेव्हा ते अधिकाधिक कसं मिळवता येईल यासाठीच प्रयत्नशील असतो. सुंदरता, ही आपल्या प्रत्येक गोष्टीकडे बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते. प्रत्येक गोष्ट ही सुंदरच असते, अशा सकारात्मक दृष्टीने आपण बघितलं की अशावेळी त्या गोष्टी मध्ये सौंदर्याचा साक्षात्कार व्हायला लागतो. आपल्या जीवनामधील सौंदर्याचं स्थान आणि महत्व हे तेव्हाच आपण अनुभवू शकतो. आनंद मिळवून जीवन जगण्यातच आपलं मनःस्वास्थ्य टिकून राहू शकतं.

## सुप्रभात

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.२१

सकाळी उठल्याबरोबर सुप्रभात म्हटलं की किती छान वाटतं. ओठांचा सुद्धा छान व्यायाम होतो.एक चांगली सकाळ तुला आमचा नमस्कार असो... आणि दिवस छान जावो. असे आपण एकमेकांना फक्त सकाळीच म्हणतो. कारण सकाळ प्रसन्न झाली तर आपण सुद्धा प्रसन्न राहतो. त्यासाठी रात्री लवकर झोपावे. जेणेकरून आपली सकाळ प्रसन्न उगवेल. ती खरोखरच सुप्रभात असेल. रम्य ती सकाळ. प्रभातसमय खरंच खूप लावण्य घेऊन येते. अतिशय प्रसन्न वातावरण हे फक्त सकाळीच पाहायला मिळते. पक्षांचा किलबिलाट, सनईचे सूर, थंडगार वारा,सूर्याची कोवळी उन्हं, सडा-सारवण, रांगोळी, रियाज, गृहिणींची लगबग, गाईच्या दुधाच्या धारेचा चरवीत होणारा आवाज, सर्जा-राजाच्या घुंगुर माळेचा आवाज, पहाटेचे कोंबड्याचे आरवणे अतिशय सुरेख असे दृश्य सकाळचे असते. म्हणून तिला सुप्रभात म्हणतात. प्रभात समयी नेहमीच खूप हलकं व प्रसन्न असतं. कुठलेही चांगलं काम करताना सकाळीच करतात. कारण तेव्हा उत्साह तर असतोच पण कुठलंही दडपण मनावर नसतं. श्रीकृष्णाने देखील गीतेत सांगितले आहे की, कुठलेही चांगले आणि महत्त्वाचे काम व देवपूजा हे सुद्धा सकाळीच करावे. कारण रात्रभर आपलं मन आणि शरीर शांत झालेल असतं. त्यामुळे सकाळचा उत्साह हा नवी उमेद घेऊन येतो. आणि दुपारनंतर दिवसभराच्या कामाने शरीर थकलेले असतं.त्यामुळे सायंकाळी कोणतेही काम करण्याचा उत्साह राहत नाही. म्हणून शुभकाम हे नेहमी प्रभात समयी करूया. जमेल ना? त्यामुळे ते सहज व लवकर होतं. लेखन, वाचन हे देखील सकाळी खूप चांगल्या प्रकारे होते. सगळ्यांच्या जीवनात अशी रम्य सुप्रभात नक्की यावी. यासाठी आपल्याला पैसे वगैरे काही लागत नाही. फक्त मनाची तयारी करणे की माझी प्रत्येक सकाळ गोड असावी. सुप्रभात व्हावी. माझी सकाळ चांगली झाली म्हणजे मी दुसऱ्यांची सकाळ चांगली व्हावी म्हणून प्रयत्न करेल. नक्कीच..

## एक गरुड आणि एक घुबड

आधुनिक केसरी

**एक गरुड आणि एक घुबड, फार दिवस एकमेकांशी भांडत असत. शेवटी त्यांनी परस्परांशी मित्रत्वाने वागण्याची शपथ घेतली व एकमेकांच्या पिल्लांस खाऊ नये असे ठरविले.**
**घुबड गरुडास म्हणाले, ‘गडया ! पण माझी पिल्ले कशी असतात, हे तुला ठाऊक आहे ना? ठाऊक नसेल, तर ती दुसऱ्या एखादया पक्ष्याची आहेत असे समजून तू त्यांना गट्ट करशील, अशी मला भीति वाटते,’ गरुड म्हणाला, ‘खरेच, तुझी पिल्ले कशी असतात, हे मला मुळीच ठाऊक नाही.’**
**घुबड म्हणाले, ‘ऐक तर. माझी पिल्ले फार सुंदर असतात. त्यांचे डोळे सुंदर, पिसे सुंदर, सगळेच काही सुंदर असते. या वर्णनावरून माझी पिल्ले कोणती हे तुला सहज समजेल.’ पुढे एके दिवशी, एका झाडाच्या ढोलीत, गरुडास घुबडाची पिल्ले सापडली. त्यांजकडे पाहून तो म्हणाला, ‘किती घाणेरडी, कंडाळवाणी आणि कुरूप पिल्ले ही ! आपली पिल्ले फार सुंदर असतात, म्हणून घुबडाने सांगितले आहे. तेव्हा, ही घुबडाची पिल्ले खास नव्हते. यास मारून खाण्यास काही हरकत नाही.’ असे म्हणून त्याने त्या पिलांचा फडशा उडविला!**
**आपली पिल्ले नाहीशी झालेली पाहून घुबड गरुडाला म्हणाले, ‘गडया ! माझी पिल्ले तूच मारून खाल्लीस, असे मला वाटते.’ गरुड म्हणाला, ‘मी खाल्ली खरी, पण तो माझा दोष नव्हे.**
**तू आपल्या पिल्लाचे जे खोटेचे वर्णन केलेस, त्यामुळे ती मला ओळखिता आली नाहीत. इतकी कुरूप पिल्ले घुबडाची नसतील, दुसऱ्या एखादया पक्ष्याची असतील, असे समजून मी ती मारून खाल्ली, यात माझा काय अपराध आहे बरे?’**
**तात्पर्य – स्वतःसंबंधाची खरी हकीकत लपवून ठेवून, भलतीच हकीकत सांगणारा मनुष्य शेवटी आपणास संकटात पाडून घेतो.**

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**उठे घाणी फुटतां श्रवण ।ते दुर्गंधी नेघवे ॥ २०॥डोळां निघती चिपडें ।नाकीं दाटतीं मेकडें ।प्रातःकाळीं घाणी पडे ।मुखीं मळासारिखी ॥२१॥लाल थुंका आणी मळ । पीत श्लेष्मा प्रबळ ।तयास म्हणती मुखकमळ ।चंद्रासारिखें ॥२२॥उठे घाणी फुटतां श्रवण ।**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**अन्तिम क्षिति उपलब्ध में, जिवन्मुक्त पद होय । तामे कोई एक आप्त है, मत द्रष्टा ऋषि सोय ।।१९।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल तृतीय अध्याय) ०२/०३/१९मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : योगाच्या अंतिम भूमीची प्राप्ती झाल्यावर योगी जीवन्मुक्त पद प्राप्त करतो. त्या जीवन्मुक्त योग्यांमधे कोणी एक आप्त योगीश्वर असतो, ज्याच्या अंतरात ईश्वरीय ज्ञानाचा स्त्रोत प्रवाहित होतो, ज्यांना वैदिक परिभाषेत मंत्रद्रष्टा ऋषि म्हणतात.**

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शारदीय नवरात्र (माळ पाचवी)

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

संतापले, अत्यंत रागाने त्यांच्या भुवया वक्र झाल्या. मुख क्रोधाने लालेलाल झाले.हाताच्या मुठी आवळल्या गेल्या. अतिशय रागाने संतप्त झालेल्या चक्रधारी श्री, विष्णुंच्या मुखातून एक महान तेज बाहेर पडले, तसेच तेज ब्रम्हा आणि शिवशंकरांच्या मुखातून ही बाहेर पडले इंद्र व अन्य देवांच्या मुखातूनही आणि शरीरातून असेच विलक्षण तेज बाहेर पडले यासर्व तेजशलाका एकत्रित होऊन,त्यासंर्वाचे एक महातेज निर्माण झाले. आणि काय आश्चर्य पहाता पहाता या देवतांचा,एक तेजस्वी ज्वालापर्वत तयार झाला.व त्या तेजाने दाही दिशातील परिसर व्यापून टाकला. सर्व देवांच्या शरीरातून निर्माण झालेल्या त्या तेजाने कशाचीच तुलना होत नव्हती. मात्र सर्व तेजरेखा एकमेकांत मिसळण्याचे कार्य संपुष्टात आल्यानंतर एका नारी स्वरूपाचा आकार तयार झाला. त्या आकाराने तिन्ही लोक आपल्या तेजाने व्यापून टाकले. भगवान शिवशंकरांच्या तेजाने मुखाचा एक अप्रतिम आकार घेतला. यमतेजाने लांबसडक व काळ्याभोर केसांचा आकार घेतला, विष्णुतेजाने बाहूंचा आकार घेतला. चंदा मामाच्या तेजाने स्तनाचा आकार घेतला. इंद्र तेजाने मध्यकटिभाग तयार झाला. वरूण तेजाने जांघेचा आकार घेतला आणि पृथ्वीच्या तेजाने नितंब आकारात झाले. ब्रम्हदेवांच्या तेजाने नारी स्वरूप पाय तयार झाले. सुर्याच्या तेजाने पायांना बोटे तयार झाली. अष्टवसुंच्या तेजाने हातांना लांबसडक बोटे तयार झाली. कुबेर तेजाने एक अतिसौदर्यमय नासिका तयार झाली. प्रजापतीच्या तेजाने दात प्रदान केले. अग्नीच्या तेजाने नेत्र तयार झाले. सुषमा(संध्या)घ्या तेजाने बाकदार भुवया तयार झाल्या. वायु तेजाने दोन्ही कान तयार झाले. अशा प्रकारे सर्व देवांच्या तेजाने सर्व अवयव एकवटून एक अत्यंत तेजस्वी मंगलदायक महादेवी तयार झाली. देवी सहस्त्रनाम म्हणून आपण तिचा जय जयकार करूया. दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी! अनाथ नाथे अंबे करूणा विस्तारी!

## नामाचे सूक्ष्म स्वरूप

आधुनिक केसरी

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरूद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे



नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण 'राम राम' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चित आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चित आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता 'राम राम' जपावे.

## गहिनीनाथ

मठात कान्होबा, पर्वती, मच्छिंद्र, त्याच्या पूर्वेस जालंदर, त्याच्या पलीकडे गहिनीनाथ असे ऐकून त्याने तीं नावे पालटून दुसरी ठेविली, तीं अशीं: जानपीर असें नांव जालंदरास दिलें. गैरीपीर हें नांव गहिनीनाथास ठेविलें. मच्छिंद्राचें मायाबाबलेन व कानिफाचें कान्होबा अशी **क्रमशः**

रविवार, २२ ऑक्टोबर २०२३
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ७८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 22 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-78 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

## बॉम्बस्फोटाच्यावेळी दाऊद भाजपा अध्यक्ष होता

### उद्धव ठाकरेंचा फडणवीसांवर हल्लाबोल

आधुनिक केसरी

**मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ललित पाटीलला २०२० मध्ये अटक झाली तेव्हा तो शिवसेनेचा नाशिक शहराध्यक्ष होता, असा आरोप केला. तसेच ललित पाटील शिवसेनेचा पदाधिकारी होता म्हणूनच त्याला तेव्हा सवलत मिळाली का? असा प्रश्न उपस्थित केला. यानंतर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी फडणवीसांच्या आरोपाला प्रत्युत्तर दिले. ते शनिवारी मुंबईत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले, ललित पाटील प्रकरणात सत्य काय आहे हे सर्वांना माहिती आहे. देवेंद्र फडणवीसांच्या आरोपांवर आमच्या अरविंद सावंत यांनीही उत्तर दिले आहे. संजय राऊत आणि सुषमा अंधारेही बोलत आहेत. त्यामुळे फडणवीसांकडे प्रश्नांची उत्तरे नाहीत. फडणवीसांच्या म्हणण्यानुसार, अटक केली तेव्हा ललित पाटील शिवसेनेचा नाशिक शहराध्यक्ष होता. मात्र, असें म्हणणे म्हणजे बॉम्बस्फोटाच्यावेळी दाऊद भाजपा अध्यक्ष होता, असे म्हणण्यासारखे आहे, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी फडणवीसांना टोला लगावला.

## जळगाव येथे स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे बुधवारी पंधरावे पुष्प

आधुनिक केसरी न्यूज











**वाशिम :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे पंधरावे पुष्प मा.प्रा. डॉ.जयेंद्र लेकुरवाळे संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव हे विद्यार्थी म्हणून वावरताना या विषयावर गुंफणार आहेत. ए. टी. झांबरे माध्यमिक विद्यालय, जळगाव येथे बुधवारी, दि. २५ ऑक्टोबर दु. १ वा. होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. प्रणिता झांबरे (मुख्याध्यापक - ए. टी. झांबरे माध्यमिक विद्यालय, जळगाव) यांची उपस्थिती राहणार आहे. या व्याख्यानाचे उद्घाटक डॉ. जगदीश पाटील (मराठी भाषा अभ्यास मंडळ सदस्य, बालभारती), तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रमोद आठवले (उपमुख्याध्यापक, श्री संत गाडगे महाराज हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, भुसावळ) यांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृत्यर्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व वाशिम जिल्हा संस्थाचालक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.






## अमित पाटील खडसे यांच्या वाढदिवसा निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी

**रिसोड :** तालुक्यातील भर जहाँगीर जिल्हा परिषद सर्कलचे युवा जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांच्या वाढदिवसा निमित्त येथील स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालयाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.तद्वतच ज्ञानदीप प्रायमरी शाळेत रांगोळी स्पर्धचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते.

दि.२१ आक्टो.रोजी अमित पाटील खडसे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील स्व. पुष्पादेवी महाविद्यालयाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराचे उद्घाटन पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक गीते यांनी केले.तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य गायकवाड हे होते.दरम्यान राजकारणातून सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेले जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांचा वाढदिवसा निमित्त सत्कार करून मान्यवरांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले.यावेळी उद्घाटक व अध्यक्षांनी आपल्या मार्गदर्शनात रक्तदानाचे फायदे व महत्त्व पटवून देत, " रक्तदान हेच श्रेष्ठदान " असल्याचे सांगून, रक्तदान ही काळाची गरज आहे. असे सुचित करून रक्तदात्यांना प्रोत्साहित केले. याप्रसंगी मुरलीधर जूनघरे, रामभाऊ हुंबाड, कैलास खानझोडे, प्रभाकर लहाने, गजानन सरनाईक, आदिनाथ बदर, वैभव वायचाळ, विनोद पाटील खडसे, अर्जुन खरात, रमेश पाटील सदार, रवि नरवाडे, डॉ.वरकड, अमोल खडसे, कांतादेवी रक्तपेढीचे संचालक श्री वायचाळ आदींची उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे प्राचार्य,प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी चांगल्या प्रकारे नियोजन केले होते. सदर शिबिरात ८० हून अधिक रक्तदात्यांनी उत्सुफुर्त रक्तदान केले असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.



आशीर्वाद ही सर्वात मोठी देणगी आहे, माझ्या वाढदिवसा निमित्त आपणा सर्वांचा आशिर्वाद आणि प्रेम मिळाले ते खूप अनमोल आहे . यातून मला भविष्यात अधिक जोमाने समाजकार्य करण्याची ऊर्जा मिळाली त्याबद्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो .आणि मला प्रत्यक्ष भेटून, भ्रमणध्वनी वरून, विविध माध्यमातून, सोशल मीडियाद्वारे सर्वांनी शुभेच्छा दिल्या त्या सर्वांना खुप खुप धन्यवाद..!

**अमित पाटील खडसे, ( जिल्हा परिषद सदस्य,वाशिम )**

## विनायक मेटेंच्या पुतण्याची राहत्या घरी आत्महत्या

आधुनिक केसरी

**बीड :** शिवसंग्राम संघटनेचे दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या पुतण्याने राहत्या घरी आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.

सचिन मेटे असे विनायक मेटेंच्या पुतण्याचे नाव असून त्यांनी बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील राजेगाव येथे राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. सचिन मेटे यांनी नेमक्या कोणत्या कारणातून आत्महत्या केली, याची अधिकृत माहिती अद्याप समोर आली नाही. सचिनच्या आत्महत्येची माहिती समोर येताच गावात खळबळ उडाली आहे. आत्महत्येच्या नेमक्या कारणाचा शोध पोलीस घेत आहेत. गेल्या वर्षी विनायक मेटे यांचं एका रस्ते अपघातात निधन झाले होते. दोन महिन्यांपूर्वी या घटनेला एक वर्ष पूर्ण झाले. विनायक मेटे यांच्या निधनाने मेटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. यानंतर आता मेटे कुटुंबावर दुसरा आघात झाला आहे.




# पोट गहाण तर सब गहाण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**समाजाच्या विकासाचा मार्ग अर्थकारणात दडलेला असतो. देशातील समस्त जनतेच्या कल्याणाची इच्छा बाळगणे आणि त्यास मूर्तरूप देणे ह्या दोन्ही भिन्न बाबी आहेत. उदरभरण आणि बाह्य विकासात ताळमेळ साधणे मोठी तारेवरची कसरत असते. सामान्य माणसाला पोट भरण्यासाठी ज्या काही रोजगाराची आवश्यकता आहे ते प्रदान केल्यानंतर शासन काय करते याकडे तितकेसे लक्ष कोणी देत नाही. परंतु रोजगार न देता इतर गोष्टीतच शासन रस दाखवत असेल तर मात्र जनता आपल्या रोजगारासाठी मागणी लावून धरते. हा रोजगार पुरवणे शासनाचे आद्य कर्तव्य आहे हे समजून घेऊन सामान्य माणसास शासनाने न्याय दिला पाहिजे आणि त्याच्या पोटापाण्यासाठी रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे.**



## क्षितिजापल्याड

देशाला जेवढा विकास महत्त्वाचा आहे, तेवढाच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त रोजगाराचा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. परंतु आर्थिक विकास साधताना बेरोजगारीत वाढ होणे हे कोणत्याही भांडवली विकसनशील राष्ट्राचे भागदेय ठरते. कारण विकसित राष्ट्रांशी स्पर्धा करताना मोठमोठ्या यंत्रांच्या साह्याने कमीत कमी खर्चात आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याचे बंधन आपोआप निर्माण होते. राष्ट्र विकसित होत असल्याचा अभिमान वेगळा आणि सोबतच बेरोजगारीत झपाट्याने होणारी वाढ, ही चिंता निराळी असे आपणास करता येणार नाही. विकासामध्ये रोजगारक्षम प्रक्रियेचे प्रारूप निर्माण करणे हे आजच्या काळाचे आव्हान आहे. आजमितीला जगात भारताची ओळख विविधांगाने असली तरी सर्वात तरुण लोकांचा देश अशीही ओळख आहे. तरुण म्हणजे तेजस्विता, लाथ मारेल तिथे पाणी काढण्याची धमक. स्वप्नांच्या पूर्ततेसाठी कितीही शारीरिक कष्ट करण्याची तयारी. परंतु दुर्दैव असे की, हेच तारुण्य ऐन भरात निस्तेज होताना दिसते. वाममार्गाला जाताना दिसते आहे. रिकामे डोके सैतानाचे घर अशी आपल्याकडे एक म्हण आहे. या रिकाम्या डोक्याला आणि हाताला विधायकतेकडे आणण्याचे काम संस्थात्मक लोकशाहीमध्ये राज्याचे आहे. विनाकारण आजचा तरुण भरकटला आहे असे म्हणण्याला काहीच अर्थ नाही. कारण भरकटणे हे तारुण्याचे व्यवच्छेदक लक्षण असते, हे आपण समजून घेतले पाहिजे. या तरुणांच्या रिकाम्या हाताला आज काम पाहिजे. काम करण्याची त्यांची इच्छा नाही असे आहे का? नाही. अर्थार्जनासाठी लायकीप्रमाणे काम करण्याची, एवढेच काय तर पीएचडी करून सुद्धा सेवक होण्याची आजच्या  तरुणांची तयारी असेल आणि तेही जर त्यांच्या वाट्याला येत नसेल तर तरुणांवर दोष कसा ढकलणार? आज देशात कोणत्या प्रकारातली किती बेरोजगारी आहे, ती काल किती होती? हे सांख्यिकीय रीतीने सांगता येईल. परंतु त्यापेक्षा बेरोजगारीच्या कारणांची आणि त्यावरील उपायांची चर्चा करणे महत्त्वाचे ठरेल. पारंपरिक अर्थतज्ज्ञ मग त्यात झा बाटिस्ट से, पिगू किंवा मार्शल यांनी गुंतवणूकदारांच्या अनुषंगाने रोजगाराची चर्चा केली आहे. गुंतवणूकदाराच्या विश्वासाला तडा जाणे किंवा कामगारांची वेतन ताठरता यामुळे मंदीतून येणाऱ्या बेरोजगारीचे विवेचन ते करतात. अर्थचक्रात मंदी येणे हे बेरोजगारीचे कारण ठरते तसेच वाढत्या उत्पादनाचेही निदर्शक असते. उत्पादनातील सातत्य आणि मजुरांपेक्षा यंत्रांवर दिलेला भर यामुळे क्रयशक्तीत घट होऊन मागणी-पुरवठ्याचे संतुलन बिघडते आणि मंदी येते. मंदीतून निर्माण होणारी बेकारी वेगळी आणि उत्पादन साधनांत झालेल्या आमूलाग्र बदलातून तयार केल्या गेलेली बेरोजगारी निराळी. आज सर्व अलबेल असताना, देश विकास करताना बेरोजगारीचा आलेख सातत्याने वाढताना दिसतो, त्याचे कारण आपल्याकडे मंदी आहे, असा नव्हे तर यंत्रांच्या अतिरिक्त वापरातून, काम करण्याच्या बदललेल्या शैलीतून ही बेकारी दिसते आहे. बेरोजगारीचे जे सात-आठ प्रकार आहेत, त्यात आपण सुशिक्षितांच्या बेरोजगारीचे निरीक्षण केले तर सर्वाधिक प्रमाण दिसते. एकीकडे शिक्षितांचे प्रमाण वाढले पाहिजे म्हणून जोर द्यायचा आणि दुसरीकडे मात्र संधीची अनुपलब्धता निर्माण करायची. ही पारस्परिक विसंगती देशातील तरुणांच्या अक्रोशाचे, उद्वेगाचे कारण बनते आहे. खाऊन-पिऊन मजेत असणे आणि आर्थिक विकास साधणे या दोन्ही गोष्टी वेगळ्या असल्या तरी ज्यांच्यासाठी आपण विकास करू इच्छितो, त्यांच्या पोटापाण्याचीही व्यवस्था लावली पाहिजे. अकारण स्पर्धा वाढवून छाती फुटेपर्यंत पळण्यात काही हशील नाही. हे खरे असले तरी जागतिकीकरण नामक भ्रामकतेने आपणास एवढे पछाडले आहे की, आपण त्यातून मागे फिरणे किंवा आपल्या रीतीने मार्गक्रमण करणे आजतरी अशक्य कोटीतील गोष्ट वाटते. परंतु एकवेळ अशी येईल की, आपणास आपल्या देशाच्या दृष्टीने विचार करावाच लागेल. इतरांच्या दृष्टीने आपण मागास ठरू, संकुचित ठरू, परंतु आपल्या हिताची काळजी आपण घेतली नाही तर येणाऱ्या पिढ्या आपणास माफ करणार नाहीत. जागतिक महामंदी नंतर एम्प्लॉयमेंट अँड मनी हा ग्रंथ लिहून अमेरिकेला मंदीच्या गर्तेतून बाहेर काढणारा केन्स- ज्याच्यावर नंतरच्या



काळात अनेकांगी टीका सुद्धा झाली. त्यांच्याप्रमाणे आपला देश समोर ठेऊन, बेरोजगारीचा प्रश्न कसा मिटेल, याचे शास्त्रशुद्ध विवेचन करणारा आणि उपाय देणारा केन्स भारताला हवा आहे. सनातनी, भांडवली, मार्क्सवादी अशा कोणत्याच विचारधारेला न मानणारा परंतु तटस्थपणे उपाय सांगणाऱ्या अर्थतज्ज्ञाची देशाला खरेच गरज आहे. नाहीतर जगाच्या स्पर्धेत भाग घेताना एतद्देशीय प्रश्नांचा गुंता आपण नक्की वाढवून बसणार यात शंका नाही. नरेगासारखी योजना कितीही चांगली असली तरी ज्या देशात उच्चशिक्षित लोकांच्या बेरोजगारीचे प्रमाण साठ टक्के आहे, त्यांना या योजनेतून काम कसे मिळणार? काळ बदलला, परिस्थिती बदलली तेव्हा अकुशल कामगारांना, कष्टकऱ्यांना काम मिळावे म्हणून निर्माण झालेली ही योजना आजही प्रासंगिक असली तरी शिक्षितांच्या दृष्टीने सुद्धा विचार करणे, ही काळाची गरज आहे. जॉबलेस विकास अंतर्गत बंडाळीचे कारण ठरतो, हा जगाचा इतिहास असताना आम्ही मात्र त्या प्रश्नाला घेऊन म्हणावे तितके गंभीर नाहीत, हेच खरे. कोरोना काळात कित्येक कर्मचारी घरी बसले, काहींना कमी मोबदल्यात काम करावे लागते. शिकून बाहेर पडलेल्या तरुणांच्या फाईलची सांभाळून सांभाळून लक्तरे निघाली, तरीही त्याची आशा जिवंत आहे. ऑनलाईन पद्धतीने तर नवीन नोकरभरती बंदीवर शिक्कामोर्तब केल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. हे बदलले पाहिजे, राष्ट्रहित म्हणून धोरणकर्त्यांनी हे जाणीवपूर्वक बदलवलेले पाहिजे. अन्यतः समाजात भयंकर परिस्थिती निर्माण होईल. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे चित्र बदलत असताना देशांतर्गत बेरोजगारी कमी करून येथील तारूण्य सकारात्मक दिशेने प्रवर्तित करणे काळाची गरज आहे. नाहीतर समाजातील युवकांचे अख्खे आयुष्य कोणाच्यातरी मागे पुढे जिंदाबाद-मुर्दाबद करण्यात वाया जाईल. बुद्धी असूनही ती गहाण ठेवावी लागेल कारण पोट गहाण तर सब गहाण असे म्हटले जातेच ना.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# मानवतावादी कायद्याचे पालन व्हावे



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**युद्ध कोणत्याही प्रकरचे असो,त्यात मरण मात्र सामान्य जनतेनेच होत असते. सत्ता पिपासू आपल्या स्वार्थासाठी, अभिमानसाठी, धर्मासाठी, जातीसाठी आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठीयुद्ध घडवून आणतात. हमास आणि इस्त्राईलच्या युद्धात गाजा शहरातील अल अहली रुग्णालयावर झालेल्या हल्ल्यानंतर पाचशे जणांचा बळी गेला आहे हल्ला एक प्रकारचा मानवतावादी हल्ला आहे.युद्धात सहभागी नसलेल्यांचा बळी गेला. या युद्ध सामान्य नागरिकांचे हाल होत असून सामान्य नागरी मूलभूत गरजांपासून वंचित आहेत. इस्रायलने उत्तर गाझातील नागरिकांना दक्षिण गाझाकडे जाण्याचा आदेश दिला असून, यामुळे हजारो नागरिक पलायन करीत आहेत.**

इस्रायलचे गाझावर हवाई हल्ले सुरूच असून, यात  एका शाळेवर हवाई हल्ला करण्यात आला. यात सहा जण ठार झाले. या शाळेत चार हजार नागरिकांनी आश्रय घेतला आहे. युद्धाच्या भीतीने हजारो नागरिकांनी ठिकठिकाणी शिबिरांमध्ये आश्रय घेतला असून, या रुग्णालयातही शेकडो नागरिक आसऱ्याला होते. आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा हा आंतरराष्ट्रीय कायद्याचा भाग असून तो मानवतावादी कारणांसाठी युद्धाचे परिणाम सीमित करण्याचे काम करतो. शिवाय अशा लोकांना संरक्षण देतो, जे युद्धात थेटपणे सहभागी होत नाहीत. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा हा युद्धसाधने व युद्धपद्धती नियंत्रित करतो. हा कायदा युद्धाचा कायदा म्हणूनही ओळखला जातो. आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा केवळ युद्धाच्या वेळीच लागू होतो. हा पुढील दोन प्रकारच्या युद्धांना लागू होतो : १) दोन किंवा अधिक राष्ट्रांमध्ये होणारी युद्धे (आंतरराष्ट्रीय संघर्ष). २) असे संघर्ष जे राष्ट्र आणि अराजकीय सशस्त्र संघटनांमध्ये होतात किंवा दोन किंवा अधिक अराजकीय सशस्त्र संघटनांमध्ये होतात (गैर आंतरराष्ट्रीय संघर्ष). शिवाय या कायद्याचे दोन प्रमुख भाग आहेत. हेगचा कायदा आणि जिनीव्हाचा कायदा. यांतील हेगचा कायदा हा युद्धाच्या वेळी लागू होणाऱ्या अधिकार व कर्तव्यांविषयी असून, तो युद्धसाधने व युद्धपद्धती नियंत्रित करतो. त्याचप्रमाणे जिनीव्हाचा कायदा हा युद्धात भाग न घेणारे सैनिक, नागरिकव युद्धकैदी यांना संरक्षित करतो. आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा युद्धाच्या वेळी लागू होत असला तरीही हा कायदा राष्ट्रे केव्हा बळाचा वापर करू शकतात किंवा केव्हा युद्ध पुकारू शकतात, हे नियंत्रित करत नाही. एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर कायदेशीर रीत्या बळाचा वापर केला असला तरीही या गोष्टीचा आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा लागू होण्याशी संबध नसतो. आंतरराष्ट्रीय मानवतावादी हा कायदा युद्ध किंवा सशस्त्र संघर्षामध्ये गुंतलेल्या सर्व गटांना समानपणे लागू होतो. आंरी ड्यूनां (१८२८—१९१०) या स्विस उद्योगपतींना आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचे जनक मानले जाते. १८५९ साली झालेल्या इटलीमधील सॉलफेरीनोच्या युद्धातील रक्तपात व जखमी सैनिकांची स्थिती पाहून ते व्यथित झाले. जिनीव्हाला परतल्यावर ड्यूनां यांनी या लढाईच्या दुष्परिणामांविषयीचे आपले अनुभव १८६२ साली SOUVENIR DE SOLFERINO (सॉलफेरीनोच्या आठवणी) या ग्रंथाद्वारे प्रसिद्ध केले. या ग्रंथात पुढील प्रश्न विचारून त्यांनी रेडक्रॉस संघटनेचे सूतोवाच केले होते. "नागरिकत्वाचा विचार न करता युद्धातील जखमी लोकांना मदत देतील अशा स्वयंसेवकांच्या कायमच्या संस्था सर्व सुसंस्कृत देशांत स्थापन करता येणार नाहीत का?" दोन्ही बाजूकडील अशा जखमी व आजारी सैनिकांना मदत करण्यासाठी या संस्थांनी सदैव सज्ज राहावे, असेही त्यांनी सुचविले



होते. त्यांनी आपल्या या कल्पनेचा यूरोपात प्रसारही केला. या कल्पनेला व्यापक प्रमाणात सक्रिय प्रतिसादही मिळाला. यातूनच त्यांनी १८६४ मध्ये आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटनेची स्थापना केली. तेव्हापासून ही संघटना प्रामुख्याने युद्धाचे परिणाम पलसीमित करण्याचे व आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचा प्रसार करण्याचे काम करत आहे. या संघटनेचे मुख्यालय जिनीव्हा (स्वित्झर्लंड) येथे आहे. ड्यूनां यांच्याकडे जरी आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचे जनक म्हणून पाहिले जात असले, तरी आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचा इतिहास हा प्राचीन काळापासून सुरू होतो. जगातील बहुतेक सर्व संस्कृतींमध्ये युद्धाच्या वेळी पाळण्याच्या काही नियमांचा समावेश असल्याचे दिसून येते. उदा.,प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये युद्धाला धर्मयुद्ध म्हणून संबोधले जात असे. अशा धर्मयुद्धामध्ये त्या काळी लागू असलेल्या युद्धविषयक नियमांचे पालन करणे अपेक्षित असे.

आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्यामध्ये काही मूलभूत तत्त्वांचा समावेश होतो. जसे की, युद्धात गुंतलेल्या गटांनी नेहमीच नागरिक आणि सैनिक यांमध्ये भेद केला पाहिजे. केवळ सैनिक आणि सैनिकी लक्ष्ये (उदा., सैनिकीतळ, खंदक इ.) यांनाच लक्ष्य केले जाऊ शकते. तसेच युद्धात गुंतलेल्या गटांचा युद्धपद्धती व युद्धसाधने वापरण्याचा अधिकार हा अमर्यादित नसतो. त्याचप्रमाणे जे लोक युद्धामध्ये थेटपणे सहभागी होत नाहीत अशा लोकांना कोणत्याही प्रकारची इजा पोहोचवली जाऊ नये. त्याचप्रमाणे युद्धकैदी व पकडल्या गेलेल्या नागरिकांना वागवताना काही मूलभूत मानवतावादी तत्त्वांचा वापर केला पाहिजे. आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा हा प्रामुख्याने १९४९ साली झालेल्या चार जिनीव्हा करारांमध्येव त्या करारांना लागू असलेल्या तीन संधींमध्ये अंतर्भूत आहे. यातील पहिला करार हा जमीनीवरील युद्धातील जखमी व आजारी सैनिकांना लागू होतो. दूसरा करार हा समुद्रातील जखमी व आजारी सैनिकांना लागू होतो. तिसरा करार हा युद्धकैद्यांना देण्यात येणाऱ्या वागणुकीबद्दल असून चौथा करार हा युद्धकाळात नागरिकांना संरक्षण देण्याबाबत आहे. १९७७ साली जिनीव्हा करारांना लागू करण्यात आलेल्या दोन संधींमधील पहिली संधी ही आंतरराष्ट्रीय संघर्षांना लागू होते, तर दुसरी संधी ही गैर आंतरराष्ट्रीय संघर्षांना लागू होते. २००५ साली मान्य करण्यात आलेली तिसरी संधी ही मानवतावादी कारणांसाठी वापरण्यात येणाऱ्या विशिष्ट चिन्हाबद्दल आहे. युद्ध कोणत्याही प्रकारचे असो मानवतावादी कायद्याचे पालन व्हायलाच पाहिजे. हल्ला युद्धाच्या सुनित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. इस्त्राईल पॅलेस्टिनी ने नागरिकांवर सतत अत्याचार करत आहे. रुग्णालयावरील हल्ल्यातून इस्त्राईल कोणत्या थराला गेला आहे हे सहज लक्षात येते. इस्त्राईल आम्हास युद्धातील झालेल्या हानी बद्दल भारताने तीव्र शब्दात निषेध केला असून कोणत्याही परिस्थितीत मानवतावादी कायद्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे अशी भूमिका भारताने स्पष्ट केली आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आदिवासी समाजाचे एकमेव प्रबळ नेतृत्व भगवानराव कोकाटे

आधुनिक केसरी



एका छोट्याश्या आदिवासी टिटवी गावातील माणूस विकास हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेव धार्मिक,शैक्षणिक, सामाजिक कार्यात आपल्या धडाडीचे नेतृत्व करणारे तसेच गोरगरिबांचे कामे करणारा असा आदिवासी नेतृत्व म्हणून भगवान कोकाटे यांची परिसरामध्ये ओळख आहे. राजकारणामध्ये खासदार प्रतापराव जाधव यांचे एकनिष्ठ निकटवर्तीय आदिवासी चेहरा म्हणून त्यांची ओळख खा.जाधव यांच्या पाठीशी आदिवासी समाजाची ताकद उभी करण्याचे काम त्यांनी केले.१९८६ साली शिवसेना शाखाप्रमुख पदापासून आपली राजकीय कारकीर्द सुरु केली.१९९२साली त्याची सरपंचपदी अविरोध निवड झाली.

सतत पाच वेळा सरपंचपदी विराजमान, दोन वेळा उपसभापती, दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य, लोणार तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष, राशन दुकान संघटनेचे अध्यक्ष, बिरसा मुंडा आदिवासी संघटनेचे जिल्हाध्यक्ष, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंगसाजी महाराज पाणी वाटप संस्थेचे अध्यक्ष असे अनेक पद त्यांनी भुषविले व भुषवत आहे. शासन कडून मिळणाऱ्या योजन आदिवासी माणसापर्यंत पोहोचवायचे काम त्यांनी केले.सामुहीक विवाह सोहळा,कोरोना काळात आर्थिक मदत,पोखरा शेळीपालन, दुग्धव्यवसाय, शेती अवजारे परिषद महिला बालकल्याण मधून मुली महिलांना शिलाई मशीन वाटप अशा बऱ्याच योजनांचा लाभ गरीब आदिवासी माणसापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. समाजाच्या समस्या वेळोवेळी शासनाच्या दरबारी सोडविण्यासाठी सामाजिक शैक्षणिक राजकीय, कामातील उल्लेखनीय योगदान विकास कामाप्रति असलेली बांधिलकी व ग्रामीण भागाच्या विकासासाठी अहो रात्र घेतलेली मेहनत केलेली काम इतरांना देखील प्रेरणादायी ठरणार आहे याच मेहनत कामाची दखल घेत १९९७ मध्ये संत तुकाराम महाराज शासनाचा पुरस्कार,२०२३ मध्ये स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने मान कर्तृत्वाचा सन्मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार २०२३ सरपंच सेवा संघ यांच्या वतीन प्रशस्तीपत्र व ट्रॉफी देऊन भगवानराव कोकाटे यांचा सत्कार करण्यात आला.



यासीन शेख
9011851180

समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी नेहमी तत्पर समाजाचे होणारे मेळावे,मोर्चे अशा वेळी समाजाला एका ठिकाणी आणणारे नेतृत्व म्हणजे भगवानराव कोकाटे आपणास दैनिक आधुनिक केशरी परिवाराकडून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ! **हौसलों में जितनी जान है आपके, उतनी ही पहचान हो आपकी, परिंदों से भी ऊंची उड़ान हो आपकी, जन्मदिन की बहुत-बहुत बधाई हो !**

# महाविस्तरणच्या कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता यांना तत्काळ सेवेतून बडतर्फ करा

## सुभाष पा. पांडभरे : सहाय्यक अभियंता शरद ढाकणे यांची मनमानी

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाची विज चोरी करुन विक्री करणाऱ्या व त्यावर लाखोची कमाई करणाऱ्या शासन सेवेतील महावितरणच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता यांना तत्काळ शासन सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेस सरचिटणीस सुभाष पाटील पांडभरे यांनी शुक्रवारी एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, औरंगाबाद या कंपनीत आस्थापनेवर कार्यरत असलेले महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शहर विभाग क्र. २ एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद या विभागातील कार्यरत व तत्कालीन कार्यकारी अभियंता व उपकार्यकारी अभियंता तसेच उपविभाग, म्हाडा कॉलनी, एन- २, उपविभागील सहाय्यक अभियंता श्री. शरद ढाकणे यांनी महावितरण कंपनीच्या वरील विषयानुसार उपविभाग म्हाडा कॉलनी (विमानतळ शाखा) हद्दीमध्ये मोठया प्रमाणात घरगुती विज जोडणी व व्यावसायिक विज जोडणीमध्ये अनियमितता दर्शविण्यात आलेली आहे, ग्राहकाकडून अव्वाच्या सव्वा पैसे वसुल करुन बेकायदेशिर विज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. विद्युत प्रवाहाकरीता असलेल्या लोखंडी पुल, रोहीत्रे कारण नसतानाही ग्राहकांच्या सांगण्यावरुन इतर हलविण्याचे काम संबंधित महाशय करीत आहे, याकरीता ग्राहकांकडून पैशांची उकळणी केली जाते. याबाबत आपल्या कार्यालयात या संदर्भात निवेदनासोबत पुरावे सुध्दा दाखल केलेले आहेत. वारंवार निवेदने सुध्दा संबंधित मुजोर कार्यकारी अभियंता महेश पाटील, उपकार्यकारी अभियंता तौर, सहाय्यक अभियंता शरद ढाकणे यांचेवर कुठल्याही प्रकारची आतापर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही अथवा त्यांनी केलेल्या भ्रष्टाचारासंदर्भात कुठल्याही स्वरुपाची चौकशी समिती अद्याप स्थापन करण्यात आलेली नाही. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम आपल्या कार्यालयाकडून चालू आहे असे आम्हांस पूर्ण खात्री वाटते. विद्युत प्रवाह व इतर बाबीच्या देखभाल दुरुस्तीकरीताही वरिष्ठांची कुठल्याही प्रकारची परवागनी सहाय्यक अभियंता न घेता त्यांच्या मनमानी कारभाराने सदरची कामे त्यांच्या स्वाक्षरीनिशी सतत चालू असतात. करीता संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांना शासन सेवेतून तात्काळ बडतर्फ करण्यात यावे, याकरीता लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालयासमोर आपले लक्ष वेधण्यासाठी निदर्शने करण्यात येत आहे. जर यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांना शासन सेवेतून बडतर्फची कारवाई न केल्यास आंदोलनाचा पावित्रा तिव्र करण्यात येईल, याची गांभिर्याने नोंद घ्यावी. सदर निवदेनावर भाऊसाहेब जगताप, लक्ष्मण मुळे, भास्कर लहाने, उमाकांत शिंदे, सचिन वाघ, वल्लभ भंडारी, गौतम लांडगे, शामराव शिंदे, किशोर बिन्नीवाले, कारभारी वाहूळ,सुभाष शुक्ला, दीपक म्हस्के आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाविकास आघाडीच्या काळातील कंत्राटी भरती निर्णयाचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज


**जळगाव :** तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने कंत्राटी पद्धतीचा फसवा निर्णय घेऊन बेरोजगार तरुणांची फसवणूक केल्याचा आरोप करून निषेधार्थ भाजपतर्फे शनिवारी आंदोलन करण्यात आले. शहरातील बळिरामपेठ भागातील पक्षाच्या वसंतस्मृती या जिल्हा कार्यालयापासून पदफेरी काढत जिल्हा परिषदमार्गे टॉवर चौकात आंदोलन करण्यात आले. आमदार सुरेश भोळे, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर जळकेकर महाराज, माजी उपमहापौर सुनील खडसे, नगरसेविका ॲड. सुचिता हाडा, चित्रा काळे आदींनी आंदोलनाचे नेतृत्व केले. आंदोलनात जिल्हा दूध संघाचे संचालक अरविंद देशमुख, माजी नगरसेवक विशाल त्रिपाठी, महेश जोशी आदींसह पक्षासह विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते. आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला होता. आमदार भोळे म्हणाले की, कंत्राटी पद्धतीने पदभरती करण्याचा निर्णय तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने घेतला होता.

हा निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने रद्द केला. खोटारडेपणा व बेरोजगार तरुणांची फसवणूक केल्याचा प्रकार महाविकास आघाडी सरकारने केला आहे. महाराष्ट्रातील जनतेचा कौल पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वालाच आहे. विरोधकांनी स्पर्धा करायची असेल, तर विकासकामांशी करा. खोटे बोलून जनतेची दिशाभूल करू नका, आगामी होऊ घातलेल्या निवडणुकांत जनता त्यांची जागा दाखवेल, असेही ते म्हणाले. जिल्हाध्यक्ष जळकेकर महाराजांनी महाविकास आघाडी सरकारवर टीका केली.




महाराष्ट्र Business Katta









# सुकृत



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक ॥१॥ जाईन गे माय तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया ॥२॥ सर्व सुकृताचे फळ मी लाहीन । क्षेम मी देईन परब्रम्ही ॥३॥ बापरखुमादेवीवरा विठ्ठलाची भेटी । आपुलिये संवसाठी घेऊनी राहे ॥४॥ ज्ञानियांचे राजे ज्ञानेश्वर माऊली किती सुंदर शब्दात सांगतात, सुकृत म्हणजे काय ते...! ते का करायचं...? कशासाठी करायचं..? माऊली म्हणतात अवघाची संसार सुखाचा करीन!!! मंडळी ज्ञानेश्वर महाराजांसारखे ब्रह्मचारी... तुम्ही म्हणाल त्यांनी तर संसारच केला नाही... मग कुठला संसार त्यांना सुखाचा करायचा आहे... अवघाची संसार हो!!!आपण किती संकुचित विचार करतो. संसार म्हणजे आपण आपलं घर, आपली माणसं ,आपल्या घरातल्या वस्तू, आपल्या घरातले प्रश्न हा आपल्यासाठी संसार असतो. पण जन हो ..आपण करतो तो प्रपंच हो !!!!**

ज्ञानेश्वर महाराजांसारखे संत हे अवघाची संसार करतात हो !!!!! म्हणजे काय करतात... सगळ्या जगाची चिंता वाहतात आणि म्हणून ते म्हणतात अवघाची संसार सुखाचा करीन म्हणजे काय करीन तर जसा आपण आपल्या प्रपंचामध्ये प्रत्येक माणसाच्या सुखासाठी धडपड करत असतो. आपलं घर चांगलं असावं..... आपल्या माणसांना सगळ्या सुख सुविधा मिळाव्या. आपल्या माणसाचं दुःख दूर व्हावं यासाठी आपण प्रपंचात प्रयत्न करतो. मग ज्ञानेश्वर महाराज काय करतात तर अवघाची संसार सुखाचा करीन म्हणजे जगातल्या प्रत्येक माणसासाठी ते तळमळीने काम करतात. त्यांचा अज्ञान दूर होण्यासाठी काम करतात. प्रत्येकाच्या दुःख निवारण्याकडे लक्ष देतात. ते म्हणतात अवघाची संसार आणि तो कसा करीन तर सुखाचा करीन म्हणजे काय की देवाने मला जे काम सोपवलेलं आहे जगाच्या दुःखाच्या निवारण्याचं ते मी उत्तम प्रकारे करीन म्हणजे काय होईल तर तिन्ही जगात आनंद भरायचा प्रयत्न करेन. कारण सत्कर्माने समाजाचा खरा विकास होत असतो.

इथे मुळात आपण सुकृत म्हणजे काय ते बघू. सुकृत म्हणजे पुण्य कर्म. असे काम करायचे तेही दुसऱ्यासाठी आणि नितीला धरून म्हणजे ज्याच्यामध्ये समाजाचं काही हित होईल असं काम करणं ते सुकृत असतं हो!!!! मग ते का करायचं हो....? तर ज्ञानेश्वर महाराज म्हणतात जाईन गे माये तया पंढरपुरा, भेटेन माहेरा आपुलिया ..... कशासाठी करायचं हे चांगलं काम ....?तर मी पंढरपुराला येईन.... माहेराला येईन .....माहेर का म्हणतात हो पंढरपूरला माऊली ? कारण माहेर या शब्दांमध्येच जिव्हाळा आहे. मुलगी जेव्हा सासरी उत्तम नांदत असते किंवा सासर चांगलं सांभाळत असते. आपल्या माणसांना सांभाळून घेते. आपल्या सासू-सासऱ्यांना सांभाळते आणि मग त्या मुलीच सासरी मोठं नाव होतं. फार छान सून मिळाली आहे असं कौतुकाने सांगितलं जातं. मग हे कौतुक कोणाला जाऊन सांगते मुलगी ?आपल्या माहेरी जाऊन सांगते. आपल्या आई-वडिलांना जाऊन सांगते. का हो सांगते....? कारण आपली मुलगी सासरी नेटका संसार करते आहे ,सासर योग्य सांभाळते आहे या भावनेने तिचे आई-वडील तिला प्रेमभराने जवळ घेतात.

त्यांचा उर भरून येतो.अभिमानाने त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू येतात. म्हणून माऊली म्हणतात की जाईन गे माये तया पंढरपुरा म्हणजे कसं की माहेर का बर आहे पंढरपूर ?तर तिथे माझे आई-वडील आहेत. विठ्ठल रखुमाई आहेत. मग त्यांनी मला प्रेमाने जवळ घ्यायला हवं हो.... पण नुसतं पंढरपूरला जाऊन आई-वडील जवळ घेणार आहेत का ...?नाही ...तर चांगलं काम केलं तर ते प्रेमभराने जवळ घेतील. म्हणून महाराज म्हणतात सर्व सुकृताचे फळ मी लाहीन, क्षेम मी देईन परब्रम्ही माऊली सांगतात देवा तू जो माझ्या माझ्यावर विश्वाचा पसारा टाकला आहेस तो मी सांभाळण्याचा प्रयत्न करीन. मी माझ्याकडून प्रत्येकाचं दुःख कमी करायचा प्रयत्न करीन. समाजाचा हित करीन. समाजातला अज्ञान दूर करीन... आणि मगच तुला भेटायला येईल की ज्यायोगे तू मला प्रेमभराने जवळ घेशील.

जगताना विशिष्ट ध्येय ठेवून, फळाची इच्छा न करता इतरांच्या सुखासाठी, इतरांचे दुःख निवारण करण्यासाठी जे काम केले जाते त्याला सत्कर्म म्हणायचे. त्याला सुकृत म्हणायचे. आपण बघितले कोरोना काळामध्ये अशी कित्येक माणसं होती की ज्यांनी स्वतःचा विचार न करता अनेकांना वैद्यकीय सुविधा पुरवल्या. अनेकांना जेवण खाण पुरवले. आपण करतो आहोत हे सुद्धा कोणाला न कळू देता त्यामध्ये वाहून घेतले. इतकेच काय परंतु करोना काळामध्ये अंत्यसंस्कारासाठी घरची माणसं सुद्धा जिथे जात नव्हती अंत्यसंस्कारासाठी..

आपल्याला लागण होईल रोगाची.... या कारणास्तव... आपल्याच माणसाचा दाहवीधी करायला जात नव्हती... तेव्हा अशी कित्येक माणसं होती की ज्यांनी स्वतःहून हे कार्य केले आणि लोकांचे अंत्यसंस्कार केले. ह्याला सुकृत म्हणायचे. हे सुकृत असते. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात असे दुःख निवारण्याचे काम मी करेन आणि मग पंढरपुराला जाईन आणि क्षेम मी देईन परब्रम्ही! म्हणजे सगळ्या जगाला प्रेम देईन म्हणजे सगळं जग कसं सुखात नांदते



आहे की नाही असं क्षेम मी विठ्ठलाला देईन.

माऊलींनी धर्मप्रसार केला. धर्मातले अज्ञान दूर केले आणि म्हणून ते म्हणतात की सर्व सुकृताचे फळ मी लाहीन.... मला जेवढा जमला तेवढा मी याविषयीचा कारभार केला आणि हे क्षेम घेऊन मी तुमच्याकडे येईन. सगळ्याच संतांनी सांगताना तेच सांगितले की सत्कर्म करा ,चांगलं काम करा, नामस्मरण करा, देवाच्या प्रति श्रद्धा ठेवा, नीतिमत्ता ठेवा, नीतिमत्ते ने जे काम केले जाईल... ज्याने इतरांचे हित होईल ते तुमचे पुण्यच असते. ते तुमचे सुकृत असते. कान्होपात्रा म्हणतात

जन्मांतरीचें सुकृत आजी फळांसी आलें
ह्मणोनी देखिले विठ्ठलचरण ।।१।।

जगद्गुरु संत तुकाराम महाराज म्हणतात,

पुण्य परउपकार पाप ते परपीडा ।
आणिक नाही जोडा दुजा यासी ॥१॥तु.गा.३३१३

म्हणजे काय तर लोकांवर उपकार करणे हेच मुख्य पुण्य आणि लोकांना त्रास देणे त्याचेच नाव पाप आहे. याखेरीस दुसरं काय पाप पुण्य असतं..? म्हणजेच लोकांच्या परोपकारासाठी चांगले काम करायचे म्हणजे पुण्य कमवायचे. त्यासाठी जनांना श्रीहरीकडे वळवायचे. नामस्मरण सांगायचे. त्यांचे प्रत्यक्ष हित करायचे म्हणजे सुकृत करायचे.

ज्ञानेश्वर माऊलींना आत्मज्ञान झाल्यावर त्यांना तर विठ्ठल दर्शन झालेलेच होते पण त्यांना सगळ्या विश्वाचा उद्धार करायचा होता आणि म्हणून त्यांनी आपले जीवन वेचले. अनंत हालअपेष्टा,अपमान सोसून सुद्धा त्यांनी इतरांचा विचार केला. जनांचा विचार केला. ते सुकृत.

माऊली म्हणतात प्रत्येकात आत्मतत्त्व सारखेच असते. म्हणजे जसा मी आहे तसाच समोरचा असतो. आपले दुःख निवारण्यासाठी जसे आपण कष्ट करतो. तसेच दुसऱ्याचे दुःख निवारण्यासाठी ही काही कष्ट करावे.

आत्ताच आपण केदारनाथला झालेल्या नैसर्गिक संकटाला जवळून पाहिले. अशा संकटकाळी आपल्या भारतीय सेनेने आपल्या कष्टाची पर्वा न करता हजारो लोक वाचवले. त्यांना सुरक्षित स्थळी पोहोचवले. त्यांच्या अन्नपाण्याची सोय केली. हे किती मोठे सुकृत!!!! त्यातला एक टक्का जरी आपण करण्याचा प्रयत्न केला म्हणजेच निदान संकटकाळी ,कोणाच्या दुःखात, कोणाच्या गरजेला आपण काही अंशी जरी मदत करू शकलो तर आपल्यालाही विठ्ठलाला भेटतांना जगाचे क्षेम सांगता येईल. अन्यथा विठ्ठला पाशी जाऊन आपण काय सांगणार आहोत...? नेम म्हणून इतका तरी नेम करू की कुणा गरजवंताला निरपेक्ष मदत करू!!!!

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध चळवळ



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**अस्पृश्यता ही भारताची, संपूर्ण समाजव्यवस्थेची आणि अगदी सुरुवातीच्या काळातली खूप मोठी समस्या होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म याच अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीत झाला. त्या अनुषंगाने भारतीय समाजव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या समाजाला सर्वच प्रकारच्या विशेषाधिकारांपासून कायम वंचित आणि उपेक्षित ठेवण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या समाजाची ही शोकांतिका होती. संसदीयप्रणाली, संविधानातील तरतुदी यांसारख्या समाजव्यवस्थेत परिवर्तन घडविण्याची क्षमता असणाऱ्या मुक्तीच्या शोधात बाबासाहेब होते.**

परंतु जातीव्यवस्थेत खालच्या वर्गाला स्वातंत्र्य व न्याय मिळेल अशा प्रकारचे मॉडेल या व्यवस्थेत नव्हते. शेवटी त्यांनी बौद्ध मुक्ती मॉडेल निवडले आणि हिंदू धर्माचा त्याग करून बौद्धधम्म स्वीकारला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण बहुजन समाजाला धर्मांतराचे आणि बौद्ध धम्म स्वीकारण्याचे केलेले आवाहन प्रात्यक्षिक स्वरूपाचे तर आहेच; परंतु व्यक्ती आणि समाजासाठी मुक्तीचे साधन म्हणून अमेरिकेतील त्यांचे आवडते प्रोफेसर जॉन ड्युई यांच्या धार्मिक तत्त्वज्ञानातील मूल्यांनी ओतप्रोत भरलेले आढळते. त्यांनी बौद्धधम्म स्वीकारल्याचा दलित समाजावर लक्षणीय प्रभाव पडला आणि लक्षावधींना तसे करण्याची प्रेरणा मिळाली. बौद्धधम्म आणि त्याच्या आदर्शांना पुढे नेण्यासाठी त्यांनी भारतीय बौद्ध महासभा (इंडियन बुद्धिस्ट सोसायटी) ची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या ऐतिहासिक कार्यामुळे दलितांना माणूस म्हणून नवी ओळख आणि स्वाभिमान मिळण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धधम्मासाठी दिलेले योगदान भारताबाहेरही पसरले होते. बौद्ध शिकवण आणि विचारांच्या जागतिक प्रसारात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांनी जगभरातील नामवंत बौद्ध अभ्यासकांशी संवाद साधला आणि बौद्धधम्मावरील अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि चर्चेत भाग घेतला होता. सुरवातीस या धर्मांतरितांना नवबौद्ध असे म्हटले जात असे. विशेषतः अस्पृश्य वर्गासाठी ही गतिशील बौद्ध चळवळ म्हणून उदयास आली. खरे तर पुणे करारापूर्वी मुस्लिम आणि शीख यांना जी अल्पसंख्याक म्हणून मान्यता होती ती मान्यता अस्पृश्यांना मिळावी अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मागणी होती; परंतु गांधींनी ते नाकारले होते.ऐतिहासिकदृष्ट्या भारतातील बौद्धधम्माची धार्मिक पार्श्वभूमी ही २५०० वर्षांहून अधिक जुनी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बौद्धधम्म चळवळ प्रामुख्याने भगवान बुद्धाने सांगितलेल्या आर्य अष्टांगिक मार्गाने वाटचाल करत आहे. भारतातील संपूर्ण समाजासाठी आणि हिंदू धर्मातील सर्वात खालच्या स्तरातील ऐतिहासिक व्यक्ती असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी जातीची समस्या हा अत्यंत जुनाट रोग होता. भारतात सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी, जातीव्यवस्था मोडीत काढण्यासाठी आणि मूलभूत मानवी हक्कांच्या तत्त्वांनी परिपूर्ण असलेली लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी बाबासाहेबांनी आपले संपूर्ण बुद्धिकौशल्य उपयोगात आणले होते. धर्म बदलल्याशिवाय आपल्या समाजाला कधीच स्वातंत्र्य मिळू शकणार नाही, हे ओळखूनच त्यांनी बुद्ध आणि धम्माचा आश्रय घ्यायचा ठरवला. डॉ.



बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक प्रमुख व्यक्तिमत्व आहे. त्यांचे तत्त्वज्ञान भारतातील सामाजिक-आर्थिक आणि राजकीय हक्कांच्या अन्यायापासून आपल्या समाजाला मुक्त करणारे व विकासाच्या वाटेवर घेऊन जाणारे होते. त्यांची सामाजिक विचारधारा ही स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन मूलभूत गोष्टींवर आधारलेली आहे. भारतात राजकीय सत्ता आणि मानवी हक्क मिळवण्यासाठी सर्वप्रथम त्यांना कर्मठ हिंदूंशी लढावे लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येवला येथे झालेल्या जाहीर भेत जनतेसमोर जाहीर केले होते की, मी हिंदू म्हणून जन्माला आलो आहे ते माझ्या स्वाधीन नव्हते; परंतु मी हिंदू म्हणून मरणार नाही. मुळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ही चिंता होती की, वंचित वर्गास राज्याकडून कधीच कोणतेही विशेषाधिकार व संधी मिळत नाही, उलट त्यांच्यावर अत्याचार केले जातात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारधारेचे मूळ त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानातून उदयास आल्याचे दिसून येते, जे राजकारणाशी संबंधित

...नसू.

धर्माला अधिक महत्त्व देणारे आहे, कारण भारतातील सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी हेच महत्त्वाचे आहे हे त्यांनी पूर्णतः जाणले होते. त्यांना वाटत होते की, सामाजिक विचारधारा स्वातंत्र्य आणि समता देऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या सामाजिक विचारसरणीत प्रामुख्याने अस्पृश्यांना भारतीय जातीव्यवस्थेत समान दर्जा कसा मिळेल, याची चिंता होती. हिंदू धर्म नाकारल्याशिवाय आपल्या समाजाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता मिळू शकणार नाही, हे त्यांना समजले होते. स्वतंत्र भारताच्या संविधान सभेने भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती नेमली. याच संधीचे त्यांनी सोने केले आणि त्यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्व प्रकारची अस्पृश्यता नष्ट केली. उच्चवर्णीय हिंदू आणि बहिष्कृत हिंदू यांच्यात प्रचंड भेदभाव होताः खाण्यापिण्यावर बंधन, इतर जातींच्या सदस्यांशी विवाह करण्यावर बंधन, गावातील चहाच्या हॉटेलमध्ये आणि रेस्टॉरंटमध्ये दलितांसाठी बसण्याची व्यवस्था व कपबशांची व्यवस्था वेगळी केली जात असे, गावातील समारंभ आणि उत्सवांमध्ये बसण्याची आणि जेवणाची व्यवस्था वेगळी केलेली असे. गावातील मंदिरांमध्ये प्रवेश करणे, गावाच्या आत सायकल चालवणे, पायात पादत्राणे घालून ...तून चालणे, सार्वजनिक विहिरी, तलाव व ...गवठे येथून पाणी भरणे इत्यादी गोष्टी प्रतिबंधित ...त्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्म स्वीकारण्याची घोषणा केल्यानंतर बौद्ध महाबोधी सोसायटीने बौद्ध धर्म स्वीकारण्यासाठी बाबासाहेबांचे समाजासह मनापासून स्वागत असल्याचे जाहीर केले. भारतीय ऐतिहासिक संदर्भात भगवान बुद्धांनी आपल्या काळात जातिव्यवस्थेच्या विरोधात जी सामाजिक क्रांती केली होती ती खूप यशस्वी झाली, भगवान बुद्धांनी कधीही लोकांमध्ये सामाजिक, धार्मिक असे वर्गीकरण केले नव्हते; परंतु त्यांनी परस्पर सहकार्य, एकमेकांना मदत करणे आणि जगण्यासाठी चांगले वातावरण तयार करण्यावर भर दिला होता. त्या काळात सामाजिक परिस्थिती अधिक अनुकूल व योग्य झाली; परंतु त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर भारतीय सामाजिक स्थिती पुन्हा बिकट झाली. अस्पृश्य किंवा बहिष्कृतांसाठी सामाजिक क्रांती घडवून आणण्यात बाबासाहेबांना यश आले. संपूर्ण जनतेला सामाजिक समता मिळवून दिली. बाबासाहेबांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कर्तृत्वाचा आणि त्यांच्या परिपूर्ण आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा आधुनिक भारतावर खोलवर परिणाम झाला. लोकशाही, सामाजिक न्याय आणि राजकीय हक्क व आपल्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी अस्पृश्य समाजाला शिक्षणाशिवाय पर्याय नाही हा मोलाचा सल्ला दिला. आंबेडकरी बौद्ध चळवळीला समाजशास्त्रीय महत्त्व असून ती माणसाला प्रतिष्ठा देणारी चळवळ आहे. अस्पृश्यांनी बौद्ध चळवळीअंतर्गत संघर्ष चळवळ सुरू केली, ज्याला सुरुवातीस नव-बौद्ध चळवळ म्हटले जात असे, जी जगातील इतर बौद्ध चळवळींपेक्षा थोडी वेगळी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भगवान बुद्धांच्या संपूर्ण शिकवणुकीला समाजशास्त्रीय महत्त्व मानले. भगवान बुद्धांनी भारतीय समाजव्यवस्था, जातिव्यवस्था आणि समाजरचनेवर टीका केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही भारताच्या सामाजिक रचनेवर जोरदार टीका केली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक वाक्य सांगणे महत्त्वाचे आहेः भारताबाहेर जर कोणते नाव ज्ञात, लोकप्रिय असेल तर ते नाव भगवान बुद्धांचे आहे. म्हणून त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला, बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर बी.बी.सी. ने विचारले की, तुम्ही बौद्ध धर्मच का निवडला? तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्तर दिले की, बौद्ध धर्मात चांगले आणि आनंदी जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी प्रज्ञा, करुणा आणि समता ही तीन तत्त्वे आहेत. माणसाला माणूस म्हणून समाजात प्रतिष्ठा मिळवून देणारी पुढील तत्त्वेही बौद्ध धम्मात प्रकर्षाने पाळली जातात ती म्हणजे अहिंसा, सामाजिक स्वातंत्र्य, बौद्धिक स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समानता. खरे तर आंबेडकरी बौद्ध चळवळ ही भारतीय जातीव्यवस्थेत परिवर्तन आणण्यासाठी संघर्षरत होती आणि हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्म स्विकारण्याच्या त्यांच्या हेतूवर आधारित होती. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपुरात त्रिशरण आणि पंचशील ग्रहण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायायासह धर्मांतर केले. **क्रमशः**

# डॉ. शेपाळांची 'रंगसभा'



राजवर्धन निखिल माधवराव
छत्रपती संभाजी नगर

आधुनिक केसरी

**डॉ. गजानन शेपाळ यांचा ' रंगसभा' नावाचा संग्रह ग्रंथ अलिकडेच महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते प्रकाशित झाला, कलेवरिल ग्रंथ प्रकाशनासाठी राज्यपालांची उपस्थिती हा दुर्मिक योग आहे तथापि तो डॉ.शेपाळांनी ससाध्य केला.कलेवरिल ग्रंथ प्रकाशनाला उंची दिली, ही बाब एका मर्यादेत कला ग्रंथाचा सन्मान वाढवणारी आहे. मागे वळून पाहिले असता मराठी भाषेत चित्र-शिल्प संदर्भात म्हणावे तसे लेखण झाले नाही तरी मराठी लेखणात कांही दर्जेदार ग्रंथ निर्मिती झाली आहे. हा काळ फार अलिकडचा आहे.**

पूर्वी दैनिक दिवाळी अंकातील मौज, रत्नाकार, दीपावली वगैरेत कलेविषयी लिखाण केले जात असत. खरे तर तो एक प्रघात असायचा नंतर मात्र ग्रंथस्वरुपात, मराठेशाहीतील चित्रकार- दत्तात्रय भट, भारतीय चित्रकला - बालकृष्ण दाभाडे, कला आणि कलावंत- माधवराव बागल, कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे रा.ब.धुरंदर,हे सुरुवातीचे कलेविषयीचे प्रतिपादन करणारे मराठी भाषिक ग्रंथ आहेत. आणि हो सौंदर्य आणि ललित कला हे वा. गो.आपटे यांचे पुस्तकही महत्त्वाचे आहे.

मराठी भाषिक पुस्तक निर्मितीला खर्या अर्थाने १९६० नंतर गती लाभली. द.ग.गोडसे यांचे पोत, कलमिमांसा माधव अचवल- किमया, प्रभाकर बरवे- कोरा कॅनव्हास, ह. वि. माटे - विश्राब्ध शारदा खंड तीन, बाबुराव सडवेलकर- वर्तमान चित्रसूत्र आणि संभाजी कदम, सडवेलकर,परब, आदींनी मराठी विश्वकोषात कलेसंदर्भात अनेक मोलीला विषयावर लेखण केलेले आहे. बाबुराव सडवेलकर, वर्तमान चित्रसुत्रात एके ठिकाणी अपेक्षा करतात,"प्रक्रिर्ण असलेल्या कलावंतांवर एक संकीर्ण संग्रहग्रंथांची निर्मिती व्हावी" ती कदाचित डॉ.शेपाळांच्या ' रंगसभा' तून मुर्तरूप घेत आहे. लिओनार्दोः बहुरुपी प्रतिभावंत- दिपक घारे, देवी प्रतिभेचा कलावंत मायकेलॅंजीलो डॉ. माधवी मेहंदळे, पिकासो-माधुरी पुरंदरे, राजा रविवर्मा रणजित देसाई, व्हिन्सेंट व्हान गॉग- माधुरी पुरंदरे,मुलॉ रुग-तुलस लोगेल या काही मराठी भाषिक कादंबर्याही पाश्चात्य कलावंतांच्या जीवनावर लिहिल्या गेल्या, ती वेळही आला दूर नाही जेव्हा मराठी कलावंतांवर पाश्चात्य जगतात लिहले जाईल, त्यांना रसद पुरवण्याचे काम डॉ. शेपाळाच्या लेखणातून होत असेल तर ते निश्चितच कौतुकास्पद व कला परिवारासाठी अभिमानास्पद आहे. महाराष्ट्रातील कलावंत, चित्रकार सुधीर पटवर्धन,पद्माकर कुलकर्णी, माधवराव सातवळेकर, दीनावाज दलाल, ज. द. गोंधळेकर, मराठी नियत कालिकांतील दृश्य कलाविचार- रमेशचंद्र पाटणकर, दृश्यकला आणि साहित्य- वसंत डहाके, ' कलास्वाद- संभाजी कदम, चित्रवेध-प्रा. सुधाकर लवाटे, रुपबंध - एस. डी इनामदार, कॅनव्हास- अच्युत गोडबोले, शिखरे रंगरेषांची आणि अगदी अलीकडे दृकचिंतन, प्रभाकर कोलते, चित्र संहिता- मंगेश काळे, द बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट स्कूल- सुहास बहुळकर, पश्चिमरंग- पंडिराव देशमुख अशा मौलीक ग्रंथ संपदेत आता डॉ. गजानन शेपाळ लिखित रंगसभा-पहिले शंभर या मराठी भाषिक संग्रह ग्रंथाची भर पडली आहे. माटे हे. वि. यांच्या विश्राब्ध शारदा या मौलिक ग्रंथानंतर बहुदा डॉ शेपाळ यांचा रंगसंभा' हा ग्रंथ त्याच धाटणीचा वाटतो, याचे ऐतिहासिक मुल्य निश्चित असणार आहे. कला इतिहास लिहिण्यासाठी जे साधणे लागतात ते साथणे पुरवण्याचे काम सदर ग्रंथातून झाल्याचे दृग्गोचर होते,शिवाय मराठी भाषिक कलाभिरुचीच्या संवर्धनासाठी उत्तरोत्तर उत्तम ग्रंथ निर्मिती होत आहे. वाचलां करवी प्रतिसाद मिळत आहे. मोबाईल संस्कृतीतही पुस्तके वाचणार्यांची संख्या आहे, ही नक्किच लेखकांचा उत्साह वाढवणारी बाब आहे,

अनेक कलावंतांच्या कालाकृतींवर प्रकाशझोत टाकण्याचे मौलीक कार्य डॉ. शेपाळांकरवी त्यांच्या संप्रक्तामुळे झालेले आहे .सोबतच शब्दांचे सौष्ठव आहेच, त्यांची लेखण शैली इतरत्र प्रभावित नसून स्वयं सर्जीत आहे. त्यांनी समीक्षा करणे हाती घेतले तर समीक्षेलाही डॉ.शेपाळ,नक्किच न्याय देऊ शकतील आणि त्यांच्याकडून समीक्षेची अपेक्षा करणे चुकीचे ठरणार नाही..

डॉ, शेपाळ यांचा लेख संग्रह अनेक बाबींनी वैशिष्टयपूर्ण आहे. कलाक्षेत्रात आजच्या समकालिन कलेतील कलावंत विविध कला शैली व कला परंपरा कलाविषयक घटनांचे विवेचन व विश्लेषण, त्यांचे कला तत्त्वज्ञान ' रंगसभा' मध्ये अवतीर्ण झाले आहे. सुमारे तीन दशकांचा मागोवा घेताना रंगसभा सारखा महत्त्वाचा ग्रंथ साधनांची जागा घेतो. अशा संग्रह ग्रंथांना नंतर ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होते डॉ. शेपाळ हे स्तंभ लेखन करतात, त्यांच्या शेकडो लेखां पैकी निवडक शंभर लेखांचा संग्रह संकीर्ण करून ' रंगसभा-पहिले शंभर' या शिर्षकाने देखणं रूप धारण केलं आहे. ग्रंथाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ हे प्रचंड बोलके आहे. मुखपृष्ठाचा कलात्मक विचार करताना केवळ ते देवनागरीचे शब्द नाहीत तर सर्जन प्रक्रियेचा विचार लेखकाने अतिशय संवेदनशीलतेने केल्याचे जाणवते. स्वच्छ आणि सुंदर तितकेच अलंकरणात्मक अक्षरे संग्रह ग्रंयाचे अवघे चारित्र्य वर्णन करतात, या अक्षरांपासून वाचकाचे औत्सुक्य वाढत जाते. अक्षर सौंदर्याच्या संवादातून पाहणार्यांच्या ह्रदयावर छाप पडते, डॉ. शेपाळांच्या मुखपृष्ठामध्ये अनेक शब्दांच्या पलिकडे जाऊन अभिव्यक्त होण्याचे सामर्थ्य आहे.येथे इंग्लिश मुखपृष्ठकार, कॅलिग्राफर ऑब्रे बर्डस्ले, ॲलेसांद्र रॉडचेन्को सारख्या तसेच शि. द. फडणीस ग.ना. जाधव, वसंत सरवटे यांच्या मुखपृष्ठांची जाणकारांना अवर्जून आठवण येईल. एक काव्यात्मकता ' रंगसभा' या शिर्षकातून साधली आहे. रंगसभा ची अनुक्रमणिका जरी वाचली तरी लक्षात येईल की डॉ. शेपाळ हे कविमानाचे लेखक आहेत. लेखांना शिर्षके देण्याची त्यांची पद्धत अतिशय काव्यात्मक आहे. या काव्यात्मक शिर्षकांवर नविन स्तंभ लेख लिहिला जाऊ शकेल किंबहुना संशोधनाचा विषय देखिल होवू शकतो कोणतेही लेख शिर्षक सहज नाही. त्यामागे लालित्य विचार प्रक्रिया आहे एक काव्यात्मक संकिर्तण आहे.

रंगसभा या संग्रह ग्रंथाला चार मान्यवरांनी प्रस्तावना लिहिली आहे. ते त्यांच्या प्रदीर्घ व्यासंगातून ' रंगसभा चे वेचक, मोजलेपणाणे प्रस्ताविक करतात, एखाद्या माळ्या प्रमाणे फूला-फळाने बहरलेल्या बागेचे अर्थात रंगसभा या ग्रंथाचे सौंदर्य वाढवतात.पण केवळ गुणग्राहक नाहीत.डॉ. तरतरे हे अगंदी सजगपणे शेपाळांच्या लेखाविषयी अभिव्यक्त होतात, त्यांनी फार महत्त्वाची नोंद घेतली ते म्हणतात, "प्रख्यात कलाकारांच्या कलेवर सतत लिहीले गेल्याने कलेचे स्वरूप असेच काहीसे असेल अशी धारणा तयार होण्याची शक्यता असते परंतु अनेक अज्ञात कलाकारांवर लिहून त्यांना मुख्य कलेच्या प्रवाहात आणण्याचे काम शेपाळांच्या लेखणीने केले आहे" डॉ. तरतरेंनी उपरोक्त नोंदवलेली बाब शेपाळांच्या लिखाणाचे व त्यामागील सहृदयत्वाचे असामान्यत्व आथोरेखित करणारे आहे. विस्थापितांसाठी ही युग परिवर्तनीय बाब आहे. यातील मर्म किती हृदयजनांना जाणवेल कल्पना नाही पण उपरोक्त कथनाचे महत्त्व असाधारणच आहे. प्रस्थापित कलावंतांच्या कलेवर लिहिण्यासाठी अनेक लेखण्या साद्यंत सुरू आहेत पण विस्थापित कलावंतांसाठीडॉ. शेपाळांची लेखणी कायमच पुढे येते, कलावंत आणि कलाकृतीच्या रसग्रहण, प्रोत्साहणा साठी त्यांची लेखणी, शब्द सौष्ठव कुठेही कमी पडत नाही. सोबतच कलाकृतींना प्रयत्नपूर्वक तात्त्विक उंची प्रदान करण्याचे काम डॉ. शेपाळ करतात. ग्रंथाच्या चारित्र्यासंबंधी मनोगत व्यक्त करताना संस्कार, सामाजिक बांधिलकी जपणारे मते, कलावंतांचा सहवास, ललित लेखणावरील डॉ.शेपाळांची निष्ठा अगदीच दृग्गोचर होते. लेखणाशी प्रामाणिक पणा व्यक्त करताना 'शब्दांचे ऋण व्यक्त करतात,हे ऋण व्यक्त करताना डॉ .शेपाळ,शब्द आणि जमिनीशी किती जोडून आहेत सकृतदर्शनी उमगते. मुळात या ग्रंथामागे सोज्वळ प्रामाणिक अपेक्षा आहेत. कला जगतात प्रसिद्ध आणि बहुधा कलेची प्रामाणिक जोपासना करणाऱ्या अपरिचित कलाकारांच्या कलाकृतींचा सर्वसामान्य वाचकांना परिचय करुन देणे आहे. त्यांच्या कलाकृतींचे ऐतिहासिक योगदान वाचकांच्या रंगसंमेत चर्चीले जावे, अशी तळमळ डॉ. शेपाळांची, सबंध संग्रह ग्रंथात दृग्गोचर होते.





सुमारे तीन दशकात २८००हून अधिक लेख प्रकाशित झालेले आहेत, इतकी साहित्य निर्मिती करण्यासाठी अफाट मेहनत, सचोटी लागते, लिखाणातील सातत्यता लागते. कमालीची ऊर्जा डॉ शेपाळ यांच्यात आहे मागील तीन दशकांचे ते ऐतिहासिक साक्षीदार आहेत. एवढ्या प्रकीर्ण लेखांतून केवळ शंभर संकीर्ण लेख निवडणे सोपे नव्हे, यात समीक्षात्मकता नसली तरी ऐतिहासिकता निश्चित आहे, शिवाय, समाज, पुरातत्व, कलातत्वज्ञान, निर्मळ धर्मत्व, विस्थापित कलावतांच्या जाणिवा, कलांचे वेगवेगळे प्रकार, लोककला, आदिवासी कला मानवाकृती सापेक्ष कला, मुर्त-अमूर्त, सौंदर्य, यांच्या अंगभूत संवेदना आणि व्यावसायिक समज त्यांच्या लिखाणातून सर्वदूर दिसून येते. रंगसभा वाचताना हळुवार एका मागोमाग अलगद अपसुकच पाने चाळली जातात. ही त्यांच्या लेखणातील अविरत साधनेची पोच पावती आहे. डॉ. शेपाळ अभिषिक्तपणे कलाकृतीं सोबत कलावंतांच्या गुढ स्वभावाची उकल करण्यात यशस्वी होतात. लिखाणातील सहज ओघवती भाषा कलावंत,कलाकृती आणि वाचक यातील अंतर संयुत करणारी आहे. कलाकृतीतील तत्त्वज्ञानाचा असा सहसंबंध कलावंताशी आहे, तसा तो अभिरुची असलेल्या पाहणा-यांशीही आहे.

इथे कलावंत, कलाकृती आणि वाचक या त्रयींतील अंतर कमी होऊन जाणिवेच्या पातळीवर बहुधा अस्वादन घडवते. कलाकृतीतील समृद्ध जाणिव वाचकांच्या अंर्तमानाला समुत्कट भिडले, कलेसोबत ते समाज शास्त्राचे अभ्यासक आहेत, त्यांच्या त्यांच्या सामाजिक जाणीवा त्यांच्या लिखाणातून समुचित संवाद साधतात. शब्द अर्थाच्या, प्रतिमांच्या पलिकडे जाऊन कलाकृतीच्या प्रक्रिया सौंदर्याविषयी भाष्य करतात. मराठीमध्ये आजपर्यंत एवढ्या मर्यादित का असेना पण अनेक प्रतिभावंत कलावंतांच्या जीवणा विषयी क्वचित कुणी लिहिले असावे? तंत्र, माध्यम, ततविचार, जाणिवा, संघर्ष, समकालिन प्रभाव, सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक अशा अनेक घटकांचा स्पर्श रंगसभा तील कलावंतां वर झालेला आहे तो प्रभाव अलगद हेरण्याचे काम डॉ. शेपाळ यांनी निखालसपणे साथले आहे. या सर्व जाणिवेने रंगसंभा वाचकांसमोर उमी राहते, ते केवळ एक संग्रह ग्रंथ म्हणून नव्हे तर तीन दशकांचा ऐतिहासिक साक्षीदार म्हणून वर्तमान आणि भविष्यकालाला दिशादर्शक ठरते.

बहुधा त्यांचे लेख उल्लेखनिय आहेत.त्यात चतुर्भुज शिंदे, भिवा पुणेकर, विलास चोरमुले यांच्या समग्र लेखातून शेपाळांची प्राज्ञ जाणिवेची संप्रचिती येते. त्यांच्या प्राचुर्य लिखाणाने असे लेख प्रसवले आहेत, अनेक शैली, अनेक विचार यात प्रविष्ट आहेत. नव्या लेखकांना निश्चितच यातून प्रचोदन मिळण्यासारखे आहे.डॉ शेपाळांनी अनेक कलावंतां वर भाष्य केले.आपली लेखणी झिजवली, त्यांच्या कलाकृतींचे मर्म जाणून सर्वांसमोर आणलेले आहे. सदर माझ्या लेखणाचा उपदेश त्या कलावंतांवर भाष्य करणे नसून डॉ शेपाळांच्या लेखणाला सर्वासमोर आणणे असा आहे. त्यांच्या लेखणा संदर्भात भाष्य करणे असा आहे. इथे संमिश्रता असली तरी कलावंतां सारखेच कलेचे लेखन करणार्यांच्या अभिव्यक्तीलाही महत्त्व असावे, ही सहृदयी भावना आहे. कलावंताची कलाकृती जगविख्यात होते. पण त्याविषयी लेखण करणारा मात्र उपेक्षित राहतो. रंगसभा' ग्रंथ प्रकाशन समारंभात माननीय राज्यपाल श्री रमेश बैस यांनी महाराष्ट्राची कला व डॉ. शेपाळ यांचा यथोचित गौरव केला आहे. शेपाळांच्या लेखनातून महाराष्ट्राच्या कला आणि कलावंतांसोबत संन्मुख होता आले, असे गौरवोद्गार काढले आहेत,अक्षरशः ते महाराष्ट्राची कला आणि शेपाळांच्या कार्यकर्तृत्वाकडे आकर्षीले गेले, महाराष्ट्राच्या कलेच्या अंगाने ही फार महत्वाची घटना आहे. डॉ. शेपाळांच्या रंगसभेत नंतरचे दुसरे शंभर लवकर यावेत यासाठी सहदयी मंगल कामना आहेत....!!!

# योग्य व्यवस्थापन करता येणे गरजेचे




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवन म्हटलं कि राग संताप तणाव ह्या नैसर्गिक बाबी असल्याने त्याचा प्रभाव दिसणारच या मध्ये शंका नाही पण योग्य व्यवस्थापन करता आलं तर हे शरीराचे नैसर्गिक विकार आपलं कोणत्याही प्रकारच अहित करू शकत नाहीत फक्त योग्य व्यवस्थापन गरजेचं असतं. राग, संताप ही नैसर्गिक भावना असल्याने वारंवार अधुन मधुन राग संताप हा उफाळुन येण स्वभाविक आहे नैसर्गिक आहे. राग संताप येणार नाही असं कोणीही नाही पण आपल्याला आलेला राग संताप यावर आपलं नियंत्रण स्थापित नसेल तर त्याच वादळात रूपांतर होऊन आपलं प्रचंड नुकसान होते.**

आपला विवेक सदैव जागृत असला पाहिजे जेणेकरून नैसर्गिक रित्या उफाळून आलेला राग संताप आपलं कोणतंही नुकसान करणार नाही. विवेक जागृत असेल तर मग मात्र याच वादळात रूपांतर होऊन आपलं होणार अतोनात नुकसान होणार नाही आणि राग, संताप आपलं फार काही बिघडवु शकणार नाही. म्हणून विवेक जागृत असणं खुप महत्वाचे आहे.आणि जेव्हा आपण सदैव ज्ञानावर असतो तेव्हाच आपला विवेक जागृत असतो. भावना ही प्रकट होतच असते. भावनेला शक्यतो कोणीही सहजासहजी रोखू शकत नाही. म्हणजे राग, संताप याला कोणीही अपवाद असू शकत नाही. राग, संताप प्रकट होणार नाही असं सृष्टीवर कोणीही नाही. पण यावेळी आपला विवेक जागृत असलेतर मग मात्र राग, संताप आपलं काहीही बिघडवू शकत नाही. आपल्या मनात एकाच वेळी दोन शक्ति कार्यरत असतात. एक म्हणजे सकारात्मक शक्ति आणि दुसरी म्हणजे नकारात्मक शक्ती यापैकी आपण ज्या शक्तिला खाद्य पुरवतो त्या अनुषंगाने चिंतन मंथन करतो व मग ती शक्ति कार्यरत होऊन उग्र रूप धारण करत असते. आपल्या मनातील दोन शक्ति पैकी कोणती शक्ती कधी कार्यरत होईल हे कोणीही खात्रीशीरपणे सांगू शकत नाही. त्यापैकी नकारात्मक शक्ती कार्यरत झाली तर आपल्याला राग संताप येतो .व्यक्ती कोणीही असो राग येणं हे स्वभाविक आहे. पण राग, संताप आल्यानंतर त्याच वादळात रूपांतर होऊन आपलं जीवन उध्वस्त होणार नाही याची काळजी दक्षता घेयची असेल तर यासाठी आपला विवेक जागृत ठेवण अंत्यंत गरजेचं आहे. आलेला राग संताप हा आपल्या जागृत विवेकाच्या ताकदीवर वादळात रूपांतरित होऊ न देणं व आपलं कोणतही नुकसान होऊ न देता हे मोठं वादळ शमवण स्थिर करण गरजेच असतं. आयुष्य जगत असताना वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने आपल्याला राग संताप येण स्वभाविक आहे. पण जेव्हा आपल्याला राग आला तेंव्हा मात्र आपला विवेक जागृत असणं महत्वाचं आहे. कारण राग संताप आल्यानंतर जर आपला विवेक जागृत असलेतर अंहकार आपलं रूप प्रकट करून रागाला अधिक प्रज्वलित करणार नाही. कळत न कळत अंहकार



प्रज्वलित झाला तर मग कधी काय भडका होईल याचा अंदाज बांधता येणार नाही. हे वास्तव आहे.आपल्याला रागाला अंहकार साथीदार झाला तर मग मात्र हा प्रवास आपल्याला कोठुन कोठे घेऊन जाईल याची कल्पना देखील करता येत नाही. जीवन समुद्रात पैलतीरावर जात असताना राग, संताप हा आपला मुख्य शत्रु असल्याने हा आपली नौका कधी समुद्रात बुडवेल हे सांगता येत नाही.

तस पाहिलं तर जीवनातील सगळं नुकसान हे राग संताप या मुळेच होत असत. होत्याच नव्हत करण्याची ताकद क्षमाता हि फक्त रागात आहे. कधी कोणाला कोणत्या विषयावर राग संताप येईल आणि या रागाचं वादळात रूपांतर करून आपलं जीवन उध्वस्त होण्यासाठी राग आणि अंहकार हे मुख्य शत्रु कार्यरत असतात आपण त्यांना दुर्लक्षित करण्या ऐवजी त्यांचा प्रचंड पाहुणचार करतो. राग आणि अंहकार यांचा पाहुणचार हा शेवटी खुप मोठ्या दुःखाच्या सागारात आपल्याला लोटतो. जीवन हितार्थ आपल्या मध्ये असणारी नकारात्मक शक्तीच प्रमाण हे दिवसेंदिवस कमी कमी कसं होत जाईल अथवा समुळ नकारात्मक शक्ती संपुष्टात कशी येईल यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे.

एकदा का नकारात्मक शक्ती संपुष्टात आली तर मग मात्र आपण जवळपास राग, संताप मुक्त झाल्यात जमा असतो.पण तरी सुद्धा राग, संताप ही नैसर्गिक भावना असल्याने ते कधी पण उफाळून येईल प्रकट होऊ शकतात. याची आपण जाणिव ठेवत काळजी घेत स्वतःला सतत आणि सदैव ज्ञान मार्गावर ठेवलं पाहिजे अध्यात्मिक ज्ञान मार्ग हा सतत संयमी अवस्था निर्माण होण्यासाठी साह्यभूत ठरतो. जेणेकरून आपल्या जीवनातील गणित बिघडवु शकणार नाही. आपली आध्यत्मिक ज्ञान उंची आणि आध्यत्मिक ज्ञानाशी वारंवार नियमित संलग्नता हि आपला विवेक जागृत ठेवण्यासाठी सहयभुत ठरत असते. म्हणून नैसर्गिक भावना असणारा राग, संताप यापासून आपला सही सलामत बचाव करायचा असेल तर उपयुक्त गोष्ट आपला विवेक जागृत असला पाहिजे. विवेक जागृत असणं हे म्हणजे आध्यत्मिक ज्ञान आणि सात्विक वृत्ती विकसीत होण्यासाठी ज्ञान मार्गावरून मार्गक्रमण करण गरजेच आहे.

# ग्रामीण कवितेचा विद्रोही एल्गार 'माही गोधडी छप्पन भोकी'

आधुनिक केसरी

**ख्यातनाम अभिनेता कविवर्य सौमित्र यांच्या हस्ते २२ ऑक्टोबर रोजी कवी ललित अधाने यांच्या "माही गोधडी छप्पन भोकी" या कवितासंग्रहाचे प्रकाशन होत आहे. यानिमित्त काव्यपरिचय... आजच्या समकालीन मराठी ग्रामीण कवितेत "कुणबी बाप" या कवितेनं एक आश्वासक वळणवाट देणारे कवी ललित अधाने. आजच्या कुणबीकीची भयांकित लक्तरे होताना कवीने एक शतकोत्तरी एल्गार व्यक्त केला आहे. यात 'आम्ही'आमची माती, आमचीचं पाती अन् त्यांची वाती. आमच्या मातीवर बाराबोड्याची नीती.**

आमची बारभाई खेती, 'आमचं पीक', आमचाचं चीक, आमचाच माल, आमचेचं हाल, आम्ही हलाल, त्यांचे दलाल, आमचा विरोध, त्यांचा निरोध, आमचं भोक त्यांचं ठोक, त्यांची चाल, आम्ही उलाल, सालोसाल. शेतीमातीचा तिच्या फाटलेल्या व्यथा वेदनेचा हा एल्गार आहे.

शेतीक्रांतीची भाषा ही घेऊन येते. येठण, रूम्हणं, चापटनं,आरी, वखराची पास शेवटून, इळत, दावं, नाडा, सर, चाव्ह-या, कोल्डा कोयता, कु-हाड, काडूक्न आसूड, या शस्त्र अंगार विद्रोही भाषेतून ही कविता व्यक्त झाली आहे. इ्याट मारी झिंग्या, दर्या मे खसखस. येहरी "माही गोधडी छप्पन भोकी" या भोगांचे अतीव दुःखाचे विवर या कवितेने मुखर केले आहे. हजारो पिढ्यांतील शेतक-यांची दैन्यावस्था. बलशाली ठिगळं घेऊन निढळ्या छातीने अन् घामाच्या कुवतीने जगण्याची कुणबिक करणारा कवी लिहितो.

"मी मेलो म्हुण रडत बसू नगा
संधी मिळाली की, शासनाच्या तोंडावर हागा"

(स्वप्न पडलं) शेतकरी आत्महत्या, शेतकरी गाथा, शेतकरी संघटना, शेतकरी आंदोलनात बळी पडलेल्या बळीवंतास 'ही धगधगणारी एक आग आहे. आजच्या ग्रामीण वास्तवाची खरी धग प्रथमच इतकी आक्रोशाने कधीच आली नव्हती.

कारण मेहनत घाम, दाम,आणि यडा बागडा गुलाम. त्याने पिकवलेल्या मालाचा भाव ठरवणारा भाडखाऊ मोंढ्यातला आडती. त्यानेही आडतास घेऊन बेईमानी केली. शेतक-यांच्या कष्टाचे कधीच मोल झाले नाही. त्याचे सडेतोड बोल बोलणारी कविता. शेतक-यांचा जीव म्हणजे एक सृजनशील हलाहल. आजपावेतो इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख यांच्या कवितेत हा सूर आला होता. ललित अधाने यांनी हा सूर (भेसूर) असे विदारक चिंतन चित्रण करून एक क्रांतिकारक बिगुल वाजवून कवितेचा आत्माविष्कार साकार केला आहे.

तुकारामांच्या नाळेतील नाठाळ, तसा नामदेव ढसाळाच्या गाठाळ शब्दांची विद्रोह सांगाणारी कविता. हा शेतकरी क्रांतीचा बिगुल वाजवणारी कविता आहे.

"कुणी म्हणते साले, कुणी म्हणती फुकटे,
आम्ही करतो संप, तुमची काहून दुखते" (तुमची काहून दुखते)

कृषीप्रधान देशाची गाभडलेली अवस्था जेव्हा शेतकरी जगाचा तारणहार आहे. तोच आज कर्जाने आयुष्य तारण ठेवतो आहे. या शेतक-यांच्या वाट्याला आलेले भोग अन् त्या छप्पन भोगाचे वास्तव अंगार होऊन ढणाढणा पेटते. ते ललकारी होऊनच. शाहिरी गीताचा बाज असलेली रांगडी राकट सत्यान्वेषी अभिव्यक्ती या कवितेचा आत्मबाज आहे. जसे तुमची काहून दुखते, क्रांती मोर्चा, खाकी, बोल बोल बाता, उठ मावळ्या, गाऊ क्रांतीची गाणी,

दिवस किती. या कवितेचा अनुबंध हा केवळ शेतकीची ठणक आहे. मागणं मागता खाकीची झाकी उतरवण्याचं काम इथल्या शेतकरी मोर्चाने केले आहे. शेतकरी जगण्याच्या जीवन जाणीवा या प्रचंड उद्वेग निर्माण करणा-या आहेत. आजतागायत आपण शेपटं घालूनच जगलो आहे. विठ्ठल वाघांची कविता होती 'पाच वर्षांनं आमचा लिलावा होतो. ललित अधाने आता घोडाच लावू.(बटन दाबणे) मतदानच करायचं नाही. या अर्थाने ही कविता बोलते. सत्ताधीशांचे, उद्योगपतींचे लाचार न होता कुणबीक ही बापाची मिरास आहे. ती चाललीच पाहिजे.

भालेरावांनी पीकपाणी या कवितेत, शेतक-याने पिकविले नाहीतर 'काय खासाल धतुरा' ही प्रंचड उद्विग्न प्रतिमा वापरली. या पुढे जाऊन ललित अधाने जे व्हायचं ते व्हइन "इ्याट मारी झिंग्या. या कवितेने आपला कष्टकांचा एल्गार व्यक्त केला आहे. आजच्या समकालीन वास्तवाचा अजेंडा घेऊन कुणबी मराठा आरक्षणाची व रास्त कास्तकराची टाहो फोडणारी ही कविता आहे. 'जेव्हा कविताच झाली शेतीच्या आरक्षणाची भाषा, तर जातीच्या आरक्षणाचे समर्थक एकत्र येऊन उतरलेत रस्त्यावर अन् म्हणू लागले. "पोशिंद्याच्या पोटाला डागण्या द्याव्या लागतील" (पेनाची टोक) या कवितेचा अनुबंध हा अतिशय लौकिकाचा आहे. मराठी ग्रामीण कवितेचा नामदेव ढसाळी आविष्कार. 'मातीचा पेटता अंगार घेऊन माझ्या अगतिक शब्दांनो! आता व्यवस्थेच्या कुपाट्या पेटवतं चला. अशी बलदंड भाषा अभिव्यक्तीची ठणक घेऊन येणारी ही कविता आहे. मनक्यावरच दणका देतं अतिशय आशय संपन्न रचना आहेत. लेखणीचे हत्यारं घेऊन! सहा महिने शेती अन् सहा महिने निखुळ खंगाळून जरांगे पाटील स्टाईल युद्ध करायचे म्हणतोय. हे पेनाचं टोकदार भाष्य घेऊन ही कविता आली आहे. आजच्या वर्तमानाची दखल घेतं आत्मभान, समकालीन कुणबी मराठा समाजभान कृतीयुक्त शब्दांनी ही कविता काळाचे समृद्ध लेणे सांगते. जसे

"स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव
करतोय आपण साजरा
अन्न अपूर्णांक पूर्ण केलाय का रे गाजरा?"
(अमृतमहोत्सव)

'माही गोधडी छप्पन भोकी, रे सख्या ! मह्या शब्दात कच्चून नेकी रे सख्या! मह्या शब्दात क्रांतीची झाकी रे सख्या!शब्दशस्त्राचे बारूद पेरू रे सख्या! डोकी खोकीची ठिणगी पाडू रे सख्या!" ही कविता आजच्या आधुनिक विज्ञान युगाच्या शेतीमातीची ललकारी आहे. कुणबीकीची प्रचंड थिगळं झाली.




या ठिगळांचे वघळ दिल्लीपोत गेले.

राजकारण्यांच्या हुस्त्या अन् कुस्त्या सालोसाल चालत राहिल्या हे आता बंद झालं पाहिजे आरक्षण मिळालंच पाहिजे हा आर्त स्वर ही कविता देऊन जाते. 'ही आग धडाला नाही तर लोकशाहीच्या बुडाला आहे' ही कविता सर्वहारा व्यथा वेदनांची मांडणी करत खोलवर चिंतन देऊन जाते.' असं सांगून मारली, चक्का जाम, बाजार माणसांचा, खुर्चीत बसलय, सारीपाटाचा खेळ, प्राक्तनाची लक्तर, ठसठस,बांध पेटले. ही कविता ग्रामीण साहित्याचा समकालीन आगाज आहे कारण उघडपणे अन्याय सहन करून ही आम्ही मुक्यानेच दुःख गिळतो आहे. हा बाजार बुनग्याचा बाजार भरला आहे. त्यांचा सारीपाटाचा खुर्ची खेळं अन् हातात केळं देणं चालू आहे. मग आमच्या भदपड्या नशिबाला प्राक्तनाची ठसठस म्हणायची की, बांधावर गळफास घेऊन बारोमास शेतक-यांनी मरायचं. ही कविता आता बांधाबंधु-यानो पेटून उठा! असा एल्गार पुकारते. आपल्या घामाच्या दामाचा व न्याय हक्काचा वास्तव खुलासा करतं अभिव्यक्त होते. शेतीमाती, बीबियाणे अवजारे यांचा नामउल्लेख या कवितेचा इमानी बाज आहे.

आजच्या शेतीमातीचा दस्तावेज म्हणजे ही कविता आहे. पिकावरील रोग फकडी, मावा तुडतुडे, बुरशी, मर लाल्या, कवडी, दहिया, करपा इ. तर कापसाचे बियाणे, बाहूबली,डीसीएस-३२,राशी-२, अजित-५५, ग्रीणगोल्ड, विठ्ठल, महिको१२, दप्तरी, मल्लिका, न्युजीवुड, धनदेव, अजुबा इ. नावे ही ग्रामीण कवितेत कधीच आली नव्हती. ही कविता सर्वहार वेदनेचा कल्लोळ करते कारण माणूस हा धागा पकडून ही उच्चतम कविता होते. आजच्या समकालीनात महिला सबलीकरण, बेटी बचाव, बेटी पढाओ, नारीशक्ती सन्मान, या धरोहर योजनेचाही कसा बोजवारा उडविला आहे.

कुणबी बापाचे सर्वव्यापी प्रश्न कायमचं आहे. हुंडाबळी, भूकबळी, बलात्कार, स्त्रीभ्रूणहत्या, बालिकाअत्याचार, बालविवाह या प्रचंड जीवघेण्या वेणा या कवितेतून येतात. जसे (हळद) नयतारणी पोरगी घरात आहे. पण हुंडा देण्याची आयपत नाही. "दारापुढे रानाच्या बांधावर न जानो,
एखादा फिरस्ता मारून जायचा हात, हुरड्यात येण्यापूर्वी
विकण्या आगोदरच्या, अन् जावाई घरी
पिकण्या अगोदरच्या वेदना. फक्त बापालाच कळतात...ही कविता प्रचंड उद्विग्नता देऊन जाते. आजही गावखेडयातील मुली लग्नासाठी उताविळ आहे पण लग्न जमत नाही. या मुळे करपलेपण वाट्याला येतं आहे. आजच्या समकालीनात भामटेगिरी वाढली आहे. जसे "जवारी करपून बाटूक व्हावं, तसं कपाळ करपलं. तिच्या हडामासाचं खळखुट, इथल्या व्यवस्थेनं वरपलं, तिच्या इज्जतिच्या पंचनाम्यासह, ती अनेकांची 'सय' झाली. अन् मांडीवरच्या कोवळ्या फुलासाठी कपाखालची बशी झाली" (पांढरं सोनं) ही कविता प्रंचड आत्मिक अंभगीत आहे. तिच्या शब्दांचा पिळ हा अखंड दोरखंडं आहे. शेतकी चं 'घातकी'कधीचं होतं नाही. पण आत्मघातकी व्यवस्थेचा लढा पुकारणारी क्रांतीकारी ही कविता. 'मढे झाकून पेरणी करणारा मायमातीची ओटी भरणारा कुणबी काळाचा महिभार असा आहे की, हे सारं किती दिवसं? ही घोर नाकेबंदीची घृणा थांबली पाहिजे हा आर्त सवाल ही कविता करते. दुःखाच्या ऐरणीवर मनाचं धस्कट किती दिवसं घासयचं की नव्याने खनपटून घुसायचं. 'तू'या कवितेचा एक आत्मस्वर पहा.

"तुझ्या साठोत्तरी आयुष्यातही
तू घेतली नाहीस रिटायरमेंट
मागितले नाही महिन्याला पेंमेंट आणि
पेन्शनसाठी कधीचं नाही गेला
सरकारी दरबारी". (तू) या कवितेचा प्रतिमा प्रतिकांचा अविष्कार एक स्वतंत्र विषय आहे जसे उदा. 'अंधार खुरपुन काढू', द्राक्षांना आकांक्षांचे घोस', हायजॅक केलय गावशिवार, 'पेटत जातो इथेनॉल', वाळलेला उस शॉर्टसर्किट होऊन जळताना' ही इतकी थेट संवाद करणारी कविता.

ललित अधाने यांनी ख-या अर्थाने बदलत्या ग्रामीण कवितेच्या परिप्रेक्षातून ही कविता मुक्त व्यक्त होतांना तितक्याच समृद्ध चिंतन आशय संपन्न ही कविता मनाला था-यावर आनते. तशी भयान वा-याला ही सामोरे जाते. ज्या अंगार मायमातीचा ज्वलंत प्रश्न आजचे कुणबी मराठा आरक्षण. ही जनजागृती ही कवितेने केली आहे. आजच्या शेतकीसुक्ताची ही कविता आहे. उदास खेड्याचा भकास विकास, अन् उदास शेतकरी तुकड्या दास म्हणून उदयास आला आहे. लुटीची लुंगटी नेसून तो

अद्रक, लसूनाची बेभरोस्याची कुणबीक करतो आहे. कांद्याचे वांधे बीन बोभाट पोटात राजकिय दलालाची सूरी खुपसून बसतो आहे. बाभळीचा काटा लाकूड फाटा गळफास लावून आत्महत्या करतो आहे. शेतक-यांच्या जगण्याचा एन-लेआऊट केलाय. सारं शेत सेज मध्ये गेलय. शेतातलं डबुलं गायब झालंय. शेतात राम राहिला नाही तरी बाप आयुष्य पेरून रामाच्या शोधतं राहिला. मनाच्या बंदुकीत भरलाय सुरुंग, पांढरं सोनं त्याला

चूड लागलाय. मातीला केलंय वांझ. शेतकरी या व्यवस्थेचा शिकार, माणुसकीची झाकी कोणती दाखवावी. उगीचं शेतकीचे डोहळे डोसक्यात घेऊन कोणती स्वप्ने पाहावीत, साराचं भरड्यावर भरडा होऊन

शेतकीचा धांडोरा झाला. व्यवस्थेचा बकासूर आला. आजच्या समकालीन वास्तवाचे भान व जाणं देतं ही ग्रामीण कवितेच्या चौकटी मोडीत काढून बुध्द-कबीर तुकोबा, शिवराय-फुले, मार्क्स, शाहू-आंबेडकर यांच्या मानवतावादी विचार धारणेची शब्दांगार व कुणबी मराठा शेतक-यांचा कैवार घेणारी सृजनशील समृद्ध निर्लेप अभिव्यक्ती व आशयघन सत्यता देणारी ही कविता आहे.

**माही गोधडी छप्पन भोकी - ललित अधाने**
**प्रकाशनः-अक्षरवाङ्ममय प्रकाशन, पुणे.**
**मुखपृष्ठः-सरदार जाधव**
**प्रथमावृतीः-१९फेब्रुवारी २०२३**
**पृष्ठः-१५६ कविता ५६**
**मूल्यः-३००**

डॉ. प्रभाकर शेळके,
जालना

# शिक्षणसंस्कार : 'आई, मी पुस्तक होईन '



उमेश मोहिते
संपर्क ७६६६१८६९२८

आधुनिक केसरी

**प्रामुख्याने प्रौढांसाठी कविता आणि कादंबरी लेखन करणारे प्रसिध्द लेखक व कवी डॉ.कैलास दौंड यांनी अलिकडच्या काळात बालमनावर अगदी रंजकतेने उत्तम संस्कारांचे बीजारोपण व्हावे,या प्रांजळ हेतूने बालसाहित्याचे लेखन केले असून त्यांच्या ' माझे गाणे आनंदाचे ' या पहिल्या पुरस्कार प्राप्त बालकवितासंग्रहानंतर नुकताच ' आई,मी पुस्तक होईन ' हा त्यांचा दुसरा बालकवितासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे.या कवितासंग्रहात एकूण ४८ बालकविता असून या सर्वच बालकविता बालकुमारांच्या भावविश्वात अढळ स्थान असलेल्या घटकांवर आहेत.**

कवी डॉ.दौंड स्वतः प्राथमिक शिक्षक असल्यामुळे ते मुलांच्या भावविश्वाचा नेमका नि साजिवंत वेध घेऊ शकले असल्याचा सुखद प्रत्यय ह्या साध्या-सोप्या शब्दकळेत व्यक्त झालेल्या कविता वाचून येतो.या संग्रहाचा एक विशेष म्हणजे यातील बालकवितांचे लेखन प्रामुख्याने मुलांना गाव परिसराचा सार्थ परिचय व्हावा आणि त्यासोबतच त्यांना आपल्या भारत देशाच्या जडण-घडणीमधे अगदी मोठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेल्या थोर महापुरुषांची ; त्यांच्या कार्यासहित नेमकी ओळख व्हावी,या आंतरिक हेतूने झाले आहे.उदा.कुणाचेही भान हरपून टाकणाऱ्या शेती नि परिसराचे नेटके शब्दचित्र रेखाटताना कवी लिहितो :

**डोंगराच्या पुढे आहे माझे रान**
**हिरव्या रंगात हरपते भान !**

.. तर गाव-खेड्यातली हसरी मुले खूप मेहनती असून ते कष्ट करीत शिक्षण घेतात आणि त्यांना कसल्याही कष्टाची लाज कधीच वाटत नसते,असा गावाकडच्या त्या मुलांचा गुणविशेष सांगून त्यांचे वेगळेपण नोंदवताना पुढे कवी अभिमानाने म्हणतो :

**गावाकडची मुले आम्ही कशातही नाही कमी**
**काम असुद्या कोणतेही हो संधी वाटते नामी**
**कष्ट करूनी शिकतो आम्ही सारी रानची मुले..** .. तर ऊन-पावसाची कसली पर्वा न करता सतत राब राब राबून हे जग निर्माण करणाऱ्या मजूराची सार्थ नोंद कवी घेतो आणि त्याच्या कष्टाविषयी कृतज्ञताभाव व्यक्त करून मुलांना संदेश देताना म्हणतो :

**कष्टाचे मोल परि त्या नित्य दिले**
**पाहिजे जीवन त्याचे सकलांनी सुंदर केले**
**पाहिजे....** याशिवाय या संग्रहात आपल्या देशात होऊन गेलेल्या थोर महापुरुषांच्या कार्याची महती कवी अगदी साध्या-सोप्या शब्दांत गौरवतो आणि त्यांच्या हिमालयाएवढ्या उत्तुंग कार्याचा परिचय मुलांना करून देतो.उदा.' शिवबा ' या कवितेतून रयतेचे ' स्वराज्य ' स्थापन करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविधांगी पैलू असलेल्या महान कार्याची ओळख करून देताना कवी लिहितो:

**गड किल्ले जिंकून घेतले स्वराज्याच्या**
**रक्षणासाठी वृक्षांवर त्यांनी प्रेम केले**
**निसर्गाच्या वाढीसाठी..**

..तर आधुनिक काळात आपल्या भारत देशात स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या अर्वाचीन काळातील विद्येच्या देवतेच्या कार्य कर्तृत्वाचा गुणगौरव करताना कवी म्हणतो : **साऊ शिकली जिद्दीने**
**जोतिबाने शिकवले देशातल्या लेकींसाठी**
**आभाळ तिने झुकवले ..** अगदी अशाच ' सुभाषबाबू ' , ' राजमाता जिजाऊ, ' बालदिन ' या कविता असून त्यांमधून कवीने या थोरांविषयी विनम्रतेने कृतज्ञताभाव व्यक्त केला आहे.




असो. आपल्या भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असलेल्या गुढी पाडवा नि होळी या सण-उत्सवांची काव्यरूपी ओळखही कवीने संग्रहात करून दिली आहे. तसेच ' आपुले संविधान ' आणि ' भारत माझा देश ' या कवितांमधून राष्ट्रप्रेम,राष्ट्रध्वज व आपली राज्यघटना यांवर प्रकाशझोत टाकला आहे. शिवाय बाल- किशोरांच्या संवेदनशील मनांवर उच्चतम मुल्य संस्कारांची शिंपण करणाऱ्या बोधपर काही रचना संग्रहात आहेत. उदा.राष्ट्रीय एकात्मतेचे मूल्य मुलांवर ठसवताना आपल्या देशात असलेली विविधतेतील एकता अधोरेखित करताना कवी म्हणतो : **विविधतेने नटला**
**आहे सभोवताली समाज**
**सारा त्या बागेचे फुल होऊनी सुंदर**
**सजवू भारत प्यारा ..**

.. वृक्षारोपण करून ही सारी सृष्टी सुंदर व हिरवीगार करण्याचा बोधपर संदेश ' वृक्षारोपण ' या कवितेतून देताना कवी लिहितो :

**सुंदर आपुले वृक्षारोपण**
**निसर्गाचे संगोपन**
**सगळे सर्वत्र मिळून करु**
**आपण संवर्धन ..**

.. याशिवाय बाल-कुमारांच्या नितळ आणि सुंदर भावविश्वाचे प्रकटीकरण करुन बाल-कुमारांना पुनःप्रत्ययाचा निखळ आनंद देणाऱ्या ' टरबूज ' , ' पोपट ' , ' रांगोळी ' , ' नांव ' आणि ' पूर ' अशा काही सुंदर रचनाही यात आहेत ..

.. थोडक्यात कवी डॉ.दौंड लिखित ' आई,मी पुस्तक होईन ' या बालकवितासंग्रहातील कविता बालकुमारांच्या नितळ भावविश्वाचे अगदी सुंदर प्रकटीकरण असून साध्या आणि सोप्या शब्दांतून अभिव्यक्त झालेली ही कविता मुलांना संस्कारक्षम बोध रंजकतेने करून देणारी आहे.तसेच ही कविता छंदोबध्द रीतीने सहजसुंदरतेने अवतरली असल्याने ती गुणगुणावीशी वाटेल,अशी आहे.तसेच ही कविता मुलांच्या ज्ञानात आणि माहितीत मौलिक भर घालून त्यांच्या सकारात्मक वाढीस हातभार लावणारी आहे. या सर्व गुणविशेषांमुळे ही कविता मुलांना नक्कीच पसंत पडेल असा विश्वास वाटतो.हेच कवी डॉ.दौंड यांचे यश आहे.त्यांच्या पुढील लेखनास मनःपूर्वक शुभेच्छा ! !

**बालकविता - आई,मी पुस्तक होईन**
**कवी - डॉ.कैलास दौंड**
**प्रकाशक - सौरव प्रकाशन,**
**औरंगाबाद मो.९९२२८६९९५७**
**पृष्ठे - ७२ मूल्य - १२०**

# मध्य पूर्वेत युद्धाचे ढग : तिढा कसा सुटणार



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**शुक्रवारी रात्री इस्त्राईलने हमासवर शंभर रॉकेट हल्ले केले. त्यामध्ये हमासला त्यांचा दुसऱ्या फळीतला नेता गमवावा लागला. हमासने इस्त्राईलचे एक विमान पाडण्याची योजना केली होती, ती योजनाही इस्त्राईलने उदध्वस्त केली! युद्धाला पंधरा दिवस होत आहेत. हल्ले प्रतिहल्ले चालू आहेत. हमासने इस्त्राईलवर दहशतवादी हल्ला केल्यामुळे सबंध मध्य पूर्व संभाव्य युद्धाचे काळे कुट्ट ढग जमत आहेत. आता गाझापट्टीचा हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गरज आहे ती तत्काळ शांतता तोडगा काढण्याची अमेरिका व भारताने पुढाकर घेतला तर हा गुंतागुंतीचा पुश्न सुटू शकेल. इस्त्राईल हा शब्द ज्यू पुराण कथेमधील एका घटनेशी निगडीत आहे. जेकब ने मल्ल युद्ध खेळले त्याच्या 12 पुत्रांना इर्श्वराची आश्रीत लेकरे असे स्थान मिळाले. इस्त्राईल म्हणजे इर्श्वराचे वरदान लाभलेला देश मुल्ल युद्धानंतर निर्माण झालेल्या 12 पुत्रांच्या लढाऊ जमाती हे इस्त्राईलचे वैशिष्ट्ये होय त्यामुळे युद्ध आणि लढाई हा इस्त्राईलचा स्थाई भाव आहे.**

स्वातंत्र्यासाठी लढाई करणे हा या देशाचा युगधर्म आहे. हमास इस्त्राईल संघर्षाला 7 ऑक्टोंबर रोजी प्रारंभ झाला. युद्धाला रविवारी पंधरा दिवस पूर्ण होतील. परंतु हल्ले व प्रति हल्ले प्रति दिवस चालू आहेत. जीवित आणि वित्त हानीचा आकडा दररोज वाढतो आहे. युद्ध बंदी व्हावी संघर्ष टाळावा म्हणून कोण पुढाकार घेणार, हा प्रश्न आहे. बिकट हितसंबंधांच्या संघर्षामुळे दोन्ही पक्षांना तणावापासून कसे दूर ठेवावयाचे ही एक डोके दुखी बनली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष जोबाईडन इस्त्राईल मध्ये दाखल झाले, तेथे ते साडे सात घंटे होते, त्यांनी इस्त्राईलला आपला नैतिक पाठिंबा जाहिर केला. त्यामुळे बेंजामीन नेत्या नेहू यांची मान उंचावली आहे. तिकडे रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी चीनला भेट दिली. युरोपीयन युनियनची बैठक चालू असून त्यांचा कल इस्त्राइलकडे आहे. नाटो सह 64 युरोपीयन राष्ट्रांनी इस्त्राईलवरील आक्रमनांचा निशेध करून त्याच्या स्वतंत्र अस्तित्त्वाला पुष्टी दिली आहे. या पार्श्वभूमीवर या संघर्षातील बारकावे समजून घेणे आवश्यक झाले आहे. **ऐतिहासिक पार्श्वभूमी :** पॅलेस्टाईन व इस्त्राईल मधील संघर्ष हा लष्करी आणि राजकीय संघर्ष आहेत. त्यामध्ये संस्कृतिक अस्तित्त्वासाठी संघर्षाची बिजे सुधा रोवलेली आहेत. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून म्हणजे 1920 पासू सुरू असलेला हा जगातील सर्वात दिर्घकाळ चाललेला जुना संघर्ष होय. या संघर्षाचा इतिहास 1947 पासूनचा म्हणजे सुमारे 75 वर्षाचा आहे. इस्त्राईल हे राष्ट्र 1948 साली जन्माला आले तेंव्हापासून अस्तित्त्वाचा संघर्ष इस्त्राईलच्या पाचविला पुजलेला आहे. एखादे राष्ट्र जन्माला आल्यापासून त्याला आपल्या आस्तित्त्वासाठी करावा लागलेला संघर्ष किती बिकट असू शकतो त्याचे इस्त्राईल हे जिवंत उदाहरण आहे. नाना पालकर यांनी लिहिलेल्या इस्त्राईल वरील ग्रंथामध्ये या देशाच्या उभारणीसाठी ज्यु लोकांनी केलेल्या अपूर्व संघर्षाचे चित्र रेखाटले आहे. जेरूसलमच्या पवित्र भूमिवर तीन पक्षांचा दावा आहे. तथापि ऐतिहासिक संघर्ष कायम असून तो सततचा वादाचा मुद्दा बनला आहे. 1947, 1967 त्यानंतर 2021 नंतर या वेळेचा संघर्ष धोकादायक स्फोटक वळणावर उभा आहे. मागील 15 दिवसात दोन्ही बाजूनी 5 ते 6 हजार लोकांची जिवित हानी झाली आहे आणि वित्त हानी किती झाली याचा अंदाज करता येत नाही. तसेच या युद्धाचे परिणाम संबंध जगावर होण्याचा धोका संभवत आहे. रशिया युक्रेनप्रमाणे युरोपच्या सिमेवर इस्त्राईल व पॅलेस्टाईन मध्ये युद्धा भडका उडाला तर त्याचे जगावर सर्वदूर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे या दोन देशांचे अतोनात नुकसान होत आहे, शिवाय आता झालेली हानी भरून काढण्यासाठी पन्नास वर्षाचा कालावधी लागेल. शिवाय जिवित हानीमुळे अनेक निराधार कुटुंब उघड्यावर पडण्याचा धोका आहे. 1949, 1967 आणि 1970 मध्ये झालेल्या संघर्षापेक्षाही या वेळचा संघर्ष अधिक लांबला आहे. याची जगाला चिंता वाटत आहे. इस्त्राईलचे नेते म्हणतात की, हे युद्ध अधिक सफल व व्यापक तसेच दीर्घकाळ चालेल. **मध्य पूर्वेत युद्धाचे ढग :** इस्त्राईलवर अतिरेकी हल्ला करणाऱ्या हमास या राजकिय



संघटनेचा बोलविचा धनी कोण असा प्रश्न विचारला तर बोट इराण कडे जाते. शिवाय जॉर्डन, इजिप्त, सिरिया, लेबनॉन या देशांचाही हमासला पाठिंबा आहे. त्यामुळे मध्ये पूर्वेस युद्धाचे ढग जमण्यास सुरूवात झाली आहे. 7 ऑक्टोबर पासून एकमेकांवर हल्ले प्रति हल्ले, रॉकेटचा मारा व बॉम चा वर्षाव चालू आहे. दोन्ही बाजूनी जिवित हानीचा आकडा रोज वाढत आहे. युद्धजन्य भागातील 10 लाखाहून अधिक लोक सिमावर्ती देशामध्ये आश्रय घेत आहेत. त्यांचा जिवन संघर्ष बिकट व असाहाय्य होत आहे. आतापर्यंत इस्त्राईलच्या बाजूने नाटो व युरोपीय राष्ट्रे उभी आहेत तर पॅलेस्टाईच्या बाजूने अरब राष्ट्रांचा पाठिंबा आहे. इस्त्राईलची बाजू घेणाऱ्या देशांची संख्या 85 आहे तर पॅलेस्टाईनच्या बाजूने बहुसंख्य अरब देश आहेत. अमेरिकेने एकीकडे इस्त्राईलच्या पाठीवर हात फिरविला आणि दुसरीकडे पॅलेस्टाईनचे डोळे पुसले व त्यांना मदत देऊ केली. याचा अर्थ असा की अमेरिकेलाही हे युद्ध दिर्घ काळ चालावे असे वाटत नाही. इग्लंडचे पंतप्रधान ऋषी सूनक यांची इस्त्राईल भेट आणि जर्मन चांन्सर्लर यांची इजिप्त भेट अर्थपूर्ण म्हणटली पाहिजे. भारताने इस्त्राईलवरील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला परंतु पॅलेस्टाईनला मानवतावादी दृष्टीने मदत केली पाहिजे अशी भूमिका घेतली आहे. ती सत्ता समतोलाच्या दृष्टीने योग्य म्हणटली पाहिजे. पाणी व अन्न घेऊन इजिप्तच्या 20 ट्रक गाझा भागात पोहचत आहेत.

**गाझा पट्टीतील संघर्ष :** 1967 च्या 6 दिवसाच्या युद्धात इस्त्राईलने गाझा पट्टी व लेक बॅंक वर ताबा मिळविला होता. परंतु या भूमिवर पुन्हा दहशदवादी कारवाई सूरू झाली आणि या सिमेवरूनच हमासने इस्त्राईलवर हल्ला केला त्यामुळे गाझापट्टीवर पुन्हश्च वर्चस्व प्रस्थापीत करण्याचा इस्त्राईलचा प्रयत्न आहे. गाझापट्टीमधील एका बाप्टीस्ट दवाखान्यावर झालेल्या रॉकेट हल्ल्यात 500 हून अधिक निष्पाप लोक मारले गेले. इस्त्राईलने हा हल्ला इस्लामिक जिहादी गटाने केला असा अरोप केला आहे, तर हमासने प्रसार माध्यमाद्वारे ही कारवाई इस्त्राईलने केल्याचा आरोप केला. परंतु इस्त्राईलने सबळ पुराव्याच्या आधारे हे मत फोडून काढले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सह जगातील अनेक राष्ट्रप्रमुख या घटनेचा निषेध करून निष्पाप लोकांसाठी सहानुभूती व्यक्त करून त्यांना आदररांजली वाहिली आहे. हमासने ओलीस ठेवलेल्या 199 इस्त्राईली कुटुंबाची सुटका कशी होणार हा ही एक चिंतेचा विषय आहे. या ओलीसामध्ये काही अमेरिकन लोकांचाही समावेश आहे. ओलीसांच्या सुटकेशिवाय शांतता बोलणी शक्य नाहीत, अशी इस्त्राईलने भूमिका घेतली आहे. **तिढा कसा सुटणार :** युद्ध खोर हमास आणि दुखावलेल्या इस्त्राईलचा विखार पाहता युद्ध लवकर मिटेल असे वाटत नाही. युद्ध लांबत गेले तर क्रूड तेलाच्या किमती वाढतील आणि त्यातून पेट्रोल डिझेलच्या किमतीत ही वाढ होईल, जगात अन्नधान्याची टंचाई निर्माण होईल. युक्रेन युद्धात युरोप होरपळत आहे आणि आता मध्येपूर्वेतील तणावामुळे त्याचे पडसाद उर्वरीत जगावर म्हणजे आशिया व आफ्रिका खंडात उमटतील निर्वासितांच्या समस्येमुळे 4 -5 देशांच्या अर्थ व्यवस्थेवर जास्तीचा ताण पडेल. जगातील दाट लोकवस्ती पैकी एक असलेल्या गाझापट्टी मधील निर्वासिकांचे लोढें इजिप्त, जॉर्डन, लेबनॉन, सिरिया यांच्या सिमेवर धडकत आहेत. स्थलांतरीतांचे पुर्नवसन हा ही एक प्रश्न आहे. संयुक्त राष्ट्र संघाने पुढाकार घेऊन तोडगा काढला पाहिजे आणि दोन्ही पक्षांना आमने सामने बसवून समोपचाराने नवे मार्ग शोधले पाहिजेत. 1990 साली प्रे. बिल क्लिंटन यांनी शिखर परिषद घेऊन इस्त्राईल व पॅलेस्टाईन या दोघांनी एकमेकास मान्यता देण्याचा आग्रह धरला होता व तो त्यांनी मान्य करून घेतला. अमेरिकेने त्यांच्यात समेट घडून आणला होता आता बाईडन यांनी इस्त्राईल भेटीचा उपचार पूर्ण केला खरे तर मागील इतिहास लक्षात घेऊन बाईडन यांनी बिल क्लिंटन यांच्या प्रमाणे दोन्ही भांडणाऱ्या राष्ट्रांना एका टेबलावर आणून त्यांच्यात चर्चा घडवून आणावी. अमेरिका, रशिया व चिन यांचे हित संबंध परस्परात गुंतलेले आहेत, त्यामुळे त्यांच्याकडून शांतता प्रस्थापनेची आपक्षा करणे व्यर्थ आहे. युद्ध सुरू झाले की, बडी राष्ट्रे शस्त्र अस्त्रांची बाजारपेठ खुली करतात व तापलेल्या तव्यावर आपल्या स्वार्थाची पोळी भाजतात. जगाला युद्धाच्या तणावातून मुक्त करावयाचे असेल तर अलिप्त राष्ट्रांचा नेता म्हणून भारताला पुढाकार घ्यावा लागेल. भारतातचे परराष्ट्र मंत्री एस. जय. शंकर यांनी संयुक्त राष्ट्र संघामध्ये केलेल्या भाषणात जगाच्या पाठिवर कोठेही होत असलेल्या दहशवादी हल्याचे समर्थन करता येणार नाही, कारण दहशतवाद लोकशाहीच्या विरोधात असतो व तो मानवी कल्याणात मोठा अडचर निर्माण करतो, असे प्रतिपादन केले. या पर्श्वभूमिवर परराष्ट्र मंत्री एस.जय शंकर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्त्राईल, पॅलेस्टाईन संघर्षामध्ये काही तडजोड घडवून आणली पाहिजे. सध्या तातडीची गरज आहे ती युद्ध बंदीची आणि युद्धग्रस्त लोकांना आरोग्य आहार आणि जिवनावश्यक घटका बाबत मानवतावादी दृष्टीने साह्य करण्याची गरज आहे, त्यासाठी युद्धग्रस्त भागात योग्य वातावरण निर्मिती करावी लागेल. **समारोप :** या सर्व चर्चेचे सारे असे की इस्त्राईल हमास संघर्ष एका विचित्र वळणावर उभा आहे.

निर्वासितांना आपल्या देशात घेण्यास शेजारील राष्ट्रे ना खूश आहेत. "घरी माय जेवन देईना आणि बाप भिक मागू देईना'' अशी निर्वासितांची बिकट अवस्था झाली आहे. सुमारे 20 लाख निर्वासित पॅलेस्टाईन मधून शेजारील राष्ट्राकडे मदतीसाठी निवारा म्हणून धाव घेत आहेत. युद्धातील जख्मी, निराधार, अपंग व निराश्रित कुटुंबाचे पुर्नवसन प्रश्न ही कठीण होत आहेत. या दुष्ट चक्राला कुठे तरी थांबविण्यासाठी तातडणीने गरज आहे ती युद्ध बंदीची ओलीसांची सुटका करावी, शांततेची बोलणी करावी, अतिरेकी हल्ल्याच्या वेळी जे अमानवी गैर पक्रार झाले ते या पुढे होऊ नयेत अशी ठाम भूमिका जगातील लोकशाही राष्ट्रांनी घेतली पाहिजे. संयुक्त राष्ट्र संघाने शांतता स्थैर्य आणि पुर्नरचनेचा मार्गदर्शक पथ (रोड मॅप) तयार केला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत युद्ध लांबता कामा नये त्यासाठी जगातील लोकशाही अधिक सुरक्षित व बजबूत करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक स्वतंत्र देशाने दुसऱ्याच्या सार्वभौमत्त्वाचा आदर केला पाहिजे. तसे झाले नाहीतर जग पुन्हा तिसऱ्या महायुद्धच्या खाईत लोटले जाईल व त्यामध्ये उभा मानव समाज संकटात सापडेल. ही धोक्याची घंटा दहशदवादी राष्ट्रांच्या कानात घुमेल काय हाच खरा प्रश्न.

# बेरोजगारीचे भीषण वास्तव



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**काम नसतानाही कामाच्या शोधात असण्याच्या स्थितीला बेरोजगारी म्हणतात. अर्थशास्त्रज्ञ चक्रीय किंवा केनेशियन बेरोजगारी , घर्षण बेरोजगारी , संरचनात्मक बेरोजगारी आणि शास्त्रीय बेरोजगारी व्याख्या यासह बेरोजगारीच्या विविध आच्छादित प्रकार आणि सिद्धांतांमध्ये फरक करतात . अधूनमधून नमूद केलेल्या बेरोजगारीचे काही अतिरिक्त प्रकार म्हणजे हंगामी बेरोजगारी, हार्डकोर बेरोजगारी आणि छुपी बेरोजगारी.**

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे. याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०३३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे. काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. आता तर सरकारी नोकऱ्यांचे कंत्राटीकरण करण्यात येणार आहे. म्हणजेच सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते



मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. शिक्षक भरती हे त्याचे उत्तम उदाहरण. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. नोकरी मागायला गेलेल्या तरुणांना राजकीय नेते पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करत आहेत. शिक्षण असून नोकरी नाही, शेती असून शेतात काही पिकत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरावशाची झाली आहे, स्वतःचा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.

# हमास-इस्त्रायल, युक्रेन-रशिया युद्ध



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**2020 मधील अजरबैझान-आर्मेनिया युद्ध ,2021 चे अफगाणिस्तान-तालिबान युद्ध,2022 पासुन आतापर्यंत सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध आणि आता नुकताच सुरू झालेला हमास आतंकवादी व इस्रायलचा भयावह संघर्ष यामुळे जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते. अशा भयावह स्थितीमध्ये परमाणू युध्दाची शक्यता नाकारता येत नाही. कारण हे युद्ध आता हमास-इस्त्रायल युद्ध किंवा रशिया-युक्रेन युद्ध सीमित रहाले नसुन वाढण्याची दाट शक्यता आहे.**

आज रशिया-युक्रेन संघर्षात युक्रेन कडून नाटो पुर्णपणे ताकदीनी रशिया सोबत लढत आहे. तर हमास-इस्त्रायल संघर्ष दरम्यान इस्रायल कडून अमेरिका ताकदीनीशी उभा आहे तर हमास आतंकवाद्यांच्या मदतीला इराण संपूर्णपणे खुली मदत करीत आहेत.तर एकीकडे इस्रायलच्या शेजारच्या राष्ट्रांच्या आतंकवादी संघटना इस्रायलवर बंदुक तानुन बसले आहे.यामध्ये गाजा मधील हमास व इस्लामिक जिहाद आतंकवादी संघटना, लेबनॉन मधील हिजबुल्ला,मिस्त्र मधील मुस्लिम ब्रदरहुड, सीरियामधील ( आय.एस.आय.एस. ) आलं नुकसार फ्रंट अलकायदा अशा प्रकारे आतंकवादी संघटना इस्रायलवर हल्ला करण्याच्या तयारीत आहे.परंतु इस्रायल सर्वांनाच चांगल्याप्रकारे शिकस्त देत आहे. परंतु आतापर्यंत गाजा व इस्त्रायलच्या युध्दात हजारो निष्पाप लोकांचा बळी सुध्दा गेला आहे. अशा परिस्थितीत तिसऱ्या महायुध्दाची ठीनगी केव्हाही उडु शकते याला नाकारता येत नाही.त्याचप्रमाणे चीन-तैवान संघर्ष सुरूच आहे. अशा भयावह स्थितीत तिसऱ्या महायुद्धाची पुणरावृत्ती होणार नाही याची दक्षता "संयुक्त राष्ट्रसंघाने"घेतली पाहिजे. कारण सध्याच्या परिस्थितीत गेल्या 18 महिन्यापासुन रशिया -युक्रेन युद्ध किंवा आता सुरू असलेला हमास-इस्त्रायल संघर्ष जगाला केव्हाही हादरा देवू शकते.याकरिता जगातील "विध्वंसकारी" परीस्थिती पहाता "संयुक्त राष्ट्रसंघाने" मानव कल्याणासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज. आज संयुक्त राष्ट्रसंघ 78 वर्षांचा झाला असला तरीही जगात संघर्ष सुरूच आहे ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना अनेक देशांतील घडामोडीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असते. पहिल्या महायुद्धानंतर 1929 मध्ये "राष्ट्र संघाची" स्थापना करण्यात आली.परंतु "राष्ट्रसंघ" प्रभावहीन असल्यामुळे "संयुक्त राष्ट्रसंघटनेची"24आक्टोंबर 1945 ला स्थापना करण्यात आली.यावेळी संयुक्त राष्ट्र अधिपत्रावर 50 देशांच्या सह्यानीशी याची स्थापना करण्यात आली.परंतु आता जगातील अनेक देश संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य आहेत. यामुळे प्रत्येक देशाला आप-आपल्या तक्रारी मांडण्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रसंघटनेने दिलेला आहे. युध्द जन्य परीस्थिती, भुकमरी, कुपोषण, मानवधिकार, अंतराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि विश्व शांति इत्यादी संपूर्ण बाबींनवर चर्चा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून केली जाते.दुसऱ्या महायुद्धानंतर विजयी झालेल्या देशांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्राला आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याच्या उद्देशाने संघटनेची स्थापना करण्यात आली.संघटनेचा उद्देश हा आहे की भविष्यात द्वीतिय महायुध्दासारखी महाभयानक परीस्थिती उदभवु नये या उद्देशाने याची स्थापना करण्यात आलेली आहे.संयुक्त राष्ट्र संघटनेची संरचना शक्तीशाली देश अमेरिका,फ्रांस,ब्रिटन,रूस आणि संयुक्त राजशाही यांनी द्वीतीय विश्व युध्दात अत्यंत महत्वाची भूमिका बजावली होती.सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्ये 193 देश आहेत.जगातील सर्वच आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त देश या संस्थेशी जुडुन आहेत.या संस्थेची संरचना,आम सभा,सुरक्षा परिषद, आर्थिक व सामाजिक परिषद, सचिवालय आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय या संपूर्ण बाबीं या संस्थेमध्ये आहेत. संयुक्त राष्ट्र संघटना ही एक चांगली आंतरराष्ट्रीय उपयोगी संघटना आहे. गेल्या 20 वर्षापासुन अफगाणिस्तानमध्ये अमेरिका व नाटोची सेना होती. यामुळे अफगाणिस्तानची जनता स्वतःला सुरक्षित समजत होते.परंतु अमेरिकेने 2021 मध्ये आपले सैन्य माघारी बोलावल्यामुळे अवघ्या 100 दिवसात खुनी तांडव निर्माण होवून लाखो निरअपराध्यांचा बळी तालिबानी आतंकवाद्यांनी घेतला व अफगाणिस्तानवर संपूर्ण कब्जा मिळविला आणि अफगाणिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात लोटले.परंतु यात संयुक्त राष्ट्र संघाने थोडासाही हस्तक्षेप केला नाही ही संयुक्त राष्ट्रसंघाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.संयुक्तराष्ट्र संघटनेच्या माध्यमातून पाकिस्तान नेहमी भारताच्या विरूद्ध चिखल फेक करीत असतांना दीसुन येते.सिरियामधील अत्याचाराच्या घटना संयुक्त राष्ट्रसंघापुढे मांडुन या घटना जम्मु काश्मिरमध्ये घडत असल्याचे सांगून भारत मानवाधिकाराचे उल्लंघन करीत असल्याचा "पोपोगंडा "पाकिस्तान नेहमीच करीत असतो. कारण भारतीय घटनेतील 370 व 35 ए कलम हटविल्याचे दुःख पाकिस्तानला जास्तच होत असल्याचे दिसून येते.त्यामुळे हा मुद्दासुध्दा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांमध्ये अनेकदा नेलेला आहे. परंतु संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानचे संपूर्ण आरोप फेटाळून लावले. आज संयुक्त राष्ट्र संघ नसता तर जगामध्ये अनेक देशात आपसा-आपसात गृहयुद्ध पहायला मिळाली असती. कारण आज जगातील संपूर्ण राष्ट्रे "बारूदच्या ढीगाऱ्यावर" बसली आहेत व एकमेकांना धमकी देताना दिसतात. परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून अनेक राष्ट्रांमध्ये होत असलेला संघर्ष व कटुता दुर करण्याचे काम आज संयुक्त राष्ट्र संघटना करीत आहे.आज उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात नेहमी तनातनीचे वावरत दीसायचे परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून यावर तोडगा काढण्यात आला व युध्दजन्य परीस्थिती हाताळण्याचे काम संयुक्त राष्ट्रसंघटनेने केले.उत्तर कोरियाचा "तानाशहा किंम जोंग उन" हा नेहमी अमेरिकेला युध्दाची धमकी देत असतो आणि आताही देत आहे. परंतु संयुक्त राष्ट्रसंघटना याला हाताळण्याचे काम करीत असते.2020 मध्ये अजरबैझान-आर्मेनिया यांच्यातील संघर्ष टोकाला गेला होता. यांच्या संघर्षामुळे तिसऱ्या महायुद्धाचे बादल जगावर दिसत होते.कारण अजरबैझान-आर्मेनिया यांचा संघर्ष गेल्या 100 वर्षांपासून सुरू आहे.हा संघर्ष थांबावा याकरिता अमेरिका व रशिया कसोटीचे प्रयत्न करीत होते परंतु युद्ध थांबे ना!यानंतर संयुक्त राष्ट्र संघाने अजरबैझान-आर्मेनिया यांच्यातील संघर्ष थांबवीण्या करीता युध्दपातळीवर प्रयत्न करून युद्ध थांबवीले. अन्यथा मुस्लिम राष्ट्र विरूद्ध ईसाइ राष्ट्र अशी युद्धाची स्थिती उद्‌भवण्याची शक्यता होती.अशी कठीण परिस्थिती निवळण्याकरीता "संयुक्त राष्ट्र संघाने"टोकाची भूमिका घेने गरजेचे असते. चीनने



सुपर पावर बनण्याच्या उद्देशाने वुहान मधुन कोरोणा व्हायरस निर्माण केला, कोरोणा महामारीने जगात मृत्यूचे तांडवनिर्माण केले. याकरिता "संयुक्त राष्ट्रसंघाने" जगातील संपूर्ण संघर्षमय परिस्थितीला हाताळण्याची गरज आहे. अन्यथा अनर्थ होऊ शकतो याला नाकारता येत नाही.चीनची विस्तारवादी नीती रोखण्याकरीता व पाकिस्तानच्या आतंकवादी कारवाया रोखण्याकरीता पश्चिम आशियात नवे "क्वाड" स्थापन करण्यात आले आहे यात भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जापान हे देश आहेत यामुळे आशिया खंडात शांतता प्रस्थापित करण्यास मोठी मदत होणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघ जरी 78 वर्षांचा झाला असला तरी त्यात नवीन उर्जा निर्माण करून जगातील संघर्षमय वातावरण यावर ताबडतोब अंकुश लावण्याची गरज आहे.कारण संयुक्त राष्ट्र संघाने अनेक महत्वपूर्ण कार्य केले आहे याचे उदाहरण जगापुढे आहे. पाकिस्तान आताही खुंखार आतंकवाद्यांना खत पाणी देत आहे व भारत विरोधी कारवाईला अंजाम देण्याचे काम नेहमीच करीत असतो. परंतु भारत त्याला जशास तसे उत्तर देऊन त्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम करीत असतो. संयुक्त राष्ट्रसंघटनेला भारताने सीध्द करून दाखवले की भारत विश्वामध्ये शांती प्रस्थापित करू शकते.भारताचे प्रखर नेत्यृत्व व प्रखर विचाराने संपूर्ण संयुक्त राष्ट्रसंघनेतील 193 देश प्रभावीत आहे. त्यामुळेच आज भारताची मान उंचावली आहे. भारत नेहमी कोणाच्याही सुख दुःखात नेहमीच सहभागी होत असतो. कारण कठीण घडीला मदत करने ही बाब भारताच्या संस्कृतीमध्ये व रक्ता-रक्तामध्ये आहे.हीबाब इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, सुष्मा स्वराज, नरेंद्र मोदी यांनी सीध्द करून दाखविली. भारताने नेहमी मानवाच्या कल्याणासाठी व हीतासाठी आवाज बुलंद केला आहे यात पर्यावरणाचा मुद्दा, ग्लोबल वॉर्मींग व निसर्गाची ढासळती परीस्थिती या संपूर्ण बाबींवर भारताने संयुक्त राष्ट्राचे लक्ष केंद्रित केले आहे.भारताने आणि संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानला नेहमी रक्ताच्या थारोळ्यातुन बाहेर काढण्याचे प्रयत्न सुध्दा केले आहे. परंतु पाकिस्तानच्या वागनुकीवरून असे दीसुन येते की "कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच" यामुळे पाकिस्तानने आताතरी सुधरूण जावे अन्यथा पाकिस्तानचा विनाश अटळ आहे.आज जगात कोणत्याही देशांशी वैरत्व करने म्हणजे तिसऱ्या महायुद्धाकडे वळने होय.देशा-देशामध्ये कटुता निर्माण होवु नये किंवा कटुता निर्माण झाली तर ती निवळण्याकरीता आज "संयुक्त राष्ट्र संघटना" रोखठोक भुमिका बजावण्याचे काम करीत आहे. अन्यथा महायुद्ध केंव्हाही उद्‌भवले असते. परंतु यावर ब्रेक आणि लगाम लावण्याचे काम "संयुक्त राष्ट्र संघटना" करीत आहे.म्हणजेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून जनकल्यानाचे काम मोठ्या प्रमाणात होतांना दीसते.गेल्या 76 वर्षांपासून भारताविरुद्ध पाकिस्तानच्या कुरापती सुरूच होत्या आणि आहे.परंतु भारताने पाकिस्तानची पोल खोलल्याने "संयुक्त राष्ट्र संघाने" पाकिस्तानला आता पंगु केल्याचे दिसून येते. त्यामुळे संयुक्त राष्ट्राने आनखी कडक प्रतिबंध लावुन पाकिस्तानला त्याची जागा दाखविली पाहिजे. आज संयुक्त राष्ट्रसंघाच्या नजरेत भारत विश्वशांतीचा दुत असल्याचे संबोधले जाते. आज जगातील देशांकरीता काही निर्णय घ्यायचा असला तर सर्वप्रथम "संयुक्त राष्ट्र संघ" भारताशी संवाद करून निर्णय घेत असतो. "संयुक्त राष्ट्र संघटना"ही जगाला "जिवनदान" देणारी संस्था असल्याचे मी समजतो.21 व्या शतकात मानवी युध्दापेक्षा आता "द्रोणने"युध्द सुरू झाल्याचे दिसून येते.द्रोणचे युध्द जगाला घातक सीध्द होवु शकते व जगाला विनाशाकडे नेवू शकते. कारण अत्याधुनिक युगात संपूर्ण देश सध्याच्या परीस्थितीत अत्याधुनिक शस्त्र सामग्री, अनुबॉम्ब, मीसाईल, बॅलेस्टीक, क्लस्टरबॉम्ब, अणुबॉम्ब अशाप्रकारचे विनाशकारी आणि घातक शस्त्र सामग्री जगातील संपूर्ण देशांनी अवगत केले आहे. आज संपूर्ण देश अत्याधुनिक द्रोण खरेदीच्या शर्यतीत आहे व प्रत्येक देश यात सामोरं जान्याच्या शर्यतीत आहे. यावर "संयुक्त राष्ट्रसंघाने" लक्ष ठेवण्याची गरज आहे. अन्यथा पृथ्वीचा विनाश दुर नाही.1945 ला संयुक्त राष्ट्रांची परीस्थिती वेगळी होती. परंतु गेल्या 5 वर्षात संपूर्ण जगात अत्यंत संघर्षमय वातावरण निर्माण झाले आहे. याकरीता संयुक्त राष्ट्र संघाला आणखी कडक नियमावली तयार करून जगातील "खुनी संघर्ष" थांबवीलाच पाहिजे. 1945 च्या नंतरची आव्हाने आवश्यकतेनुसार वेगळी होती.परंतु आज संपूर्ण जगापुढे वेगळे आव्हान आहे.पण ज्या हेतूने संयुक्त राष्ट्रांची स्थापणा झाली तो हेतू आजही आहे का ?असा प्रश्न जगापुढे उपस्थित आहे.जगात पुर्वीही गृह युद्ध व्हायची आणि आजही अनेक देशांमध्ये गृहयुद्ध सुरू आहे. परंतु आजचे गृह युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या दीशेने वाटचाल करतांना दिसत आहे. आज संपूर्ण जगावर संयुक्त राष्ट्र संघाचे नियंत्रण असने गरजेचे आहे.संयुक्तराष्ट्र संघाची स्थापना यासाठीही करण्यात आली की दुसऱ्या महायुद्धासारखी परीस्थिती पुन्हा उदभवु नये.परंतु दुःखाची बाब म्हणजे आज संपूर्ण जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. जगातील बदलता काळ पहाता व युध्दाची गंभीर परिस्थिती पहाता संयुक्त राष्ट्र संघाने कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण जग युध्दाच्या खाईत लोटल्या जात आहे. त्यामुळे 24 आक्टोंबर संयुक्त राष्ट्र दिवस"लक्षात घेता कठोर पाऊल उचलुन जगातील युद्ध जन्यपरीस्थिती रोखली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत जगात दुसऱ्या महायुद्धापेक्षाही भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. रशिया-युक्रेन व हमास-इस्त्रायल युध्दामुळे तिसऱ्या महायुद्धाचे काळे बादल संपूर्ण जगभर दिसत आहे. त्यामुळे सध्याची कठीण परिस्थिती पहाता "संयुक्त राष्ट्र संघाने" शांतता प्रस्थापित करण्यासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे. अन्यथा पृथ्वीचा व संपूर्ण जीवसृष्टीचा विनाश अटळ आहे.

# नातवंडांवर मायेची सावली धरणारी 'बाई'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**'आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही' अशा शब्दात आईबद्दलच्या भावना आपण व्यक्त करतो. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' या ओळीतून जाणवतं की, आईशिवाय आपले अस्तित्व शून्य आहे. आईवर अनेकांनी काव्य लिहिली. आई- वडील हे प्रथम गुरु असतात. सोबतच आपल्या कुटुंबात 'आजी' नावाची प्रेमळ बाई असते. वडिलांच्या आईला आपण 'आजी' म्हणतो. आजी ही आपल्या नातवंडांवर जिवापाड प्रेम करते. त्यांचे लाड करते, सोबतच नातवंडांवर योग्य ते संस्कार करते.**

वेळप्रसंगी ती चुकीची शिक्षाही देते, वरुन कठोर वाटत असली तरी मनाने ती आपलीच काळजी करत असते. पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंबपद्धती रूढ असल्याने सर्व पिढ्या एकत्रित राहत होत्या. त्यामुळे मुलांना विविध नातेसंबंधाची ओळख व्हायची. आई जरी रागावली तरी लगेच बचावासाठी आजीच्या कुशीत शिरणारी पिढी आपण अनुभवली आहे. आपल्या वाटणीची जिलेबी आपल्या नातवाच्या हातावर ठेवणारी आजी पाहिली की वाटते , आजी नावाची सावली आपल्या डोक्यावर कायमस्वरूपी असावी. जो जन्माला आला आहे, त्याचा मृत्यु अटळ आहे. हा निसर्गनियम आहे. पण या लाभलेला जन्म आपण कसे जगलो हे अत्यंत महत्वाचे असते. माणसाच्या मृत्युनंतर आत्मा शरीरातून मुक्त होतो. शरीर नाहीसे होते पण त्या व्यक्तीच्या आठवणी कधीच नष्ट होत नाहीत. त्या आठवणी कायम आपल्या सोबत राहतात.

लेखक, कवी सुनील पांडे लिखित 'एक होती बाई' हा कवितासंग्रह म्हणजे आजीच्या स्मृतींचे अवशेष आहे.त्यांनी आपल्या आजीविषयीच्या आठवणी पुस्तकरुपात कायमस्वरूपी शब्दबद्ध केल्या आहेत. संपूर्णतः आपल्या आजीच्या स्मृतींना वाहिलेली ही शब्दसुमनांजली आहे. आईवर सगळेच कविता लिहितात पण आजीच्या प्रेमाची आणि तिच्या व्यक्तिमत्वाची दखल घेणारा हा कवितासंग्रह वाचल्यानंतर प्रत्येक वाचकाला आपल्या घरातील आजीचं अस्तित्व जाणवू लागेल, अशी रचना या संग्रहाची आहे. कवी, लेखक सुनील पांडे यांनी आपल्या आजीच्या निधनानंतर लिहिलेल्या ह्या कविता असून लेखकाने आजीच्या आयुष्याशी निगडित प्रत्येक लहानातील लहान आठवण अगदी प्रांजळपणे व्यक्त केली आहे. या आठवणी लिहिताना तेव्हा निर्माण झालेले लेखकाच्या मनातील दुःखाचे कंपन कविता वाचताना आजही जाणवतात. 'एक होती बाई' या शीर्षकात , त्या एकेरी नावात आपलेपणा जाणवतो. कवितांची रचना मुद्देसुद आणि आटोपशीर असून या कवितांमधून कवीने आपल्या आजीचे चरित्रचित्रण रेखाटले आहे. काव्यात्मक रूपाने एका नातवाने आपल्या आजीशी साधलेला हा हृदयस्पर्शी संवाद आहे. काव्यात्मक चरित्र मांडण्याची ही संकल्पना मनाला भावते. लेखक, कवी सुनील पांडे यांच्या आईची आई म्हणजे त्यांची आजी गंगूबाई विश्वनाथ शिंदे. पण सगळेच आजीला 'बाई' या नावाने संबोधत असत. बाईच्या संपूर्ण जीवनाचा संवेदनशील आणि संघर्षदायी प्रवास यात मांडलेला आहे. साध्या-सरळ स्वभावाची, बिनभिंतीच्या शाळेत शिकलेली बाई श्लोक, स्तोत्र अस्खलितपणे बोलायची. संपूर्ण संसार तिने मनापासून सावरला.शांत, संयमी, प्रेमळ, मायाळु , हळवी अशा स्वभावाच्या बाईने कधी कुणाला दुखावले नाही आणि तिला कोणी दुखावले असेल तर त्याला कधी बोल लावले नाहीत. ती जितकी प्रेमळ होती तितकीच सोशिक होती सोबतच स्वाभिमानी,कणखर आणि मेहनती होती. तिने संसार सांभाळत अध्यात्माची सोबतही जपली. माणुसकीने नाती जपली, कधी नात्यांमध्ये अहंकार येऊ दिला नाही. धार्मिक विचारांचं अधिष्ठान लाभलेली बाई देवाच्या नामस्मरणात रमुन जायची. कीर्तन, अभंग ऐकण्याची तिला आवड होती. भाऊंचा ( पतीचा ) स्वभाव, कुटुंब तिने जोडून ठेवले . कधीच उलट प्रश्न केला नाही, बाई किती विनम्र, नीतीमूल्य जपणारी प्रामाणिक




आणि सांसारिक स्त्री म्हणून जगली, याचे खरेच खूप अप्रूप वाटते. बाईने आपल्या स्वभावाने अनेक माणसे जोडून ठेवली. घरी आलेल्या पै- पाहुण्यांचे स्वागत, आदरातिथ्य ती आपुलकीने करायची. ती खरीच अन्नपूर्णा होती. आपल्या मुलांवर तसेच नातवांवर तिने भरभरून माया केली. नातू म्हणून कवीच्या मनात सुरु झालेला आठवणींचा हा प्रवाह निरंतर वाहतो आहे. त्यांनी बाईला हे जीवन जगताना पाहिले आहे. 'गरीबांची सेवा हीच ईश्वरसेवा' अशी बाईची धारणा होती. बाईच्या सात्विक स्वभावाची, तिच्यातील गुणवैशिष्ट्यांची दखल कविने घेतली आहे. वयोमानामुळे बाईला जमत नव्हते तरीसुद्धा कुणावरही अवलंबून न राहता ती बसने एकटी प्रवास करायची. लेकीकडे आल्यावर नातवंडांचे खूप लाड करायची. त्यांच्या आवड़ीनुसार पदार्थ बनवून खाऊ घालायची. पण आपल्या वयोमानामुळे आपण कुणावर ओझे होऊ नये, या विचारांनी ती अस्वस्थ व्हायची. कवीने या कवितासंग्रहाद्वारे आजीच्या जीवनाची स्मरणगाथा संवेदनशीलतेने वाचकांसमोर आणली आहे. आजकाल विभक्त कुटुंबपद्धतीमुळे आजच्या पिढीला आजी- आजोबांचा सहवास दुर्लभ झाला आहे. कामनिमित्त मुले परदेशी जातात, तिथेच स्थायिक होतात. त्यांची मुलेही तिथेच लहानाची मोठी होतात. त्यामुळे मुलांवर संस्कार करणारी , त्यांना गोष्टी सांगणारी आजी नावाची व्यक्तिची ओळख नव्या पिढीला जाणीवपूर्वक करून देणे आवश्यक आहे. आणि म्हणून ' एक होती बाई' हा काव्यात्मक संवाद आपण जरुर वाचला पाहिजे. कवितासंग्रहाच्या पानोपानी बाईचं प्रतिबिंब अवतरले आहे. स्नेहलता तावरे यांनी सुंदर शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ समर्पकतेने संतोष घोंगडे यांनी साकारले आहे. कवी प्रवीण दवणे यांनी कवितासंग्रहाची पाठराखण केली आहे.

**( एक होती बाई - कवितासंग्रह / कवी : सुनील पांडे / प्रकाशक : स्नेहवर्धन प्रकाशन / मूल्य : २०० रुपये )**



## युद्ध...!

भिन्न-भिन्न विचार हा
व्यक्तीला करी वेगळे,
कोण मोठा- कोण छोटा,
अशी वागती सगळे.

द्वेष- अहंकारापाई,
भरपूर युध्दे झाली,
अती हव्यास करती,
मानवांचे गर्व खाली.


भव्य- ताकदीचा गर्व
दुजा कचऱ्या समान,
क्षेपणास्त्र डागुनिया
युध्दाचे पेटवी रान.

भयंकर हानी होते
मुंग्या परी जातो जीव,
निष्पाप साऱ्या लोकांची,
कुणाला येत नाही कीव.

अरे माणसा-माणसा
तू धर सरळ वाट,
तोफा-गोळे डागुनिया,
वाहू नको रे रक्तांचा पाट.

युध्दाला देऊ नको रे थारा,
आता प्रेमाने सगळे वागू,
जगात शांतता नांदावी,
हीच देवाला मागणी मागू...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.



## वाट असावी

जेव्हा आस लागते मनात
दाटी होते गर्द सावल्यांची
आयुष्याची ही खडतर
वाट असावी वळणाची ॥

रीती फिर्याद माळरानी
घेऊन जाती पायवाटा
हळहळत्या काळजात
उठतील वादळी लाटा ॥

एक सवड मिळेना मज
पावसाची झाली चुकभूल
मन ओलेचिंब धुक्यात
शोधते गुज पाऊल ॥


रम्य मनोहर कातरवेळी
स्वप्न पहावे नभरात्रीचे
जसे काळोखात पडावे
टिपूर चांदणे पुनवेचे ॥


वात सुटतो धावत
ह्रदय गाते मनमौजी
दाटे गारवा मनमुराद
मुक्त होते नाराजी ॥
प्रदीप बडदे, (नवी मुंबई).
मो. ९५९४०२७९९५

## साथ तुझी

घेता नाव हे मनात तुझे,
क्षणात चेहरा डोळ्यासमोरी .
काय लिहावे तुझ वर आता,
शब्द ही कमी पडून जाईसारी
वेळ अशी ही संघर्षाची
हरलोथकलो आयुष्याच्या पाऊलवाटेवरी.
नाही साथ ना ऐकु येई शब्द दोन धीराचे,
गुंतलेल्या ह्या जीवनात हरवले स्वप्नंही ती न्यारी.
एकाक्षणी ही कशी आस एक लागली मनाला .
कोणीहोणार का सारथी चालतांना
जगण्यास आधार एकट्या ह्या जिवाला
" दिवस जणू तो सोन्याहून पिवळा,
किरण दिसली त्यातएक आशेची .
कशी ही भेटतुझी साथ त्या क्षणाला ,
भेटली संजीवनी जणू ह्या जिवाची.
न असता ध्यानी- मनी तुझ्या भेटीने,
बदलवून नेले जुने त्या आयुष्याला.
येताच तु उंबरठ्यावर ह्या क्षणी घराच्या ,
परिपूर्ण घरपण आले ह्या घराला.
दिवसा मागून दिवस गेले,
साथतुझी कधी न हरवली ती
आयुष्याच्या ह्या पानासंगे चालतांना ,
क्षणी शेवटच्या तुच असावी सोबती."
- तुषार राजेश लाखे.
- वरोरा, जिल्हा चंद्रपूर.






## केलीत मी

केलीत मी उद्याची स्वप्ने
तुम्हा बहाल
मज झोपडी बरी ही,
घ्यावे तुम्ही महाल

होऊन धुंद गावे,
गाऊन सुखवावे
सुखवून तृप्त व्हावे,
हे एक मजसी ठावे

घ्या सूरही हवे तर,
गाणे मलाच ठेवा
अंधारयात्रेतला या
तो एकमेव ठेवा

ते हार ते तुरे अन् टाळ्या
तुम्हास लाहो
एकांती, विजनी या मम
काव्यस्रोत वाहो

काव्यात डुंबतो मी,
काव्यात नाहतो मी
जगण्यात काही क्षण हे,
स्वर्गास पाहतो मी

उद्धव भयवाळ
१९, शांतीनाथ हाऊसिंग
सोसायटी
गादिया विहार रोड
शहानूरवाडी

## दसरा

चैतन्य उधळीत
दिवस उगवला हसरा
उत्सव आनंदाचा
घेवून आला दसरा

रांगोळी शोभे अंगणी
झेंडूचे तोरण दारी
स्नेहभाव वाढवूनी
कटुता विसरूया सारी

आपट्याची पानं
सोनं म्हणून लुटूया
सुख-समाधाण
एक दुसऱ्याला वाटूया

श्रीरामाचा आदर्श घेवूनी
अहंकाराचा करूया नाश
एकतेचा मंत्र जपूनी
तोडूया विषमतेचे पाश

आदराने नमस्कार करूनी
थोरांना देवूया मान
मराठी सणांचा
आम्हा सदा अभिमान
- रवींद्र व्ही. चालीकवार
मो.9011559106



## तू हो दुर्गा आता

बंदिवान स्त्री पिंजऱ्यातली
दुष्टचक्र पुरुष विकृती,
लादले जोखंड तिच्यावर
पुरुष प्रधानाची संस्कृती.....१
किती झेलते वार सदा
दुष्ट परंपरा प्रवृत्तीला,
कणखर काली बनुनीया
दे लढा तू दुष्ट विकृतीला...... २
वेदना काळजीची अंतरी
किती लपवतेस तू पुन्हा,
सांग का भोगतेस शिक्षा तू
न करताच कसला गुन्हा ....३
तोडूनी सारे बंधन पाश
घे तू उंच गगनी भरारी ,
महाकाली, चंडिका बनूनी
दुष्टांवरती पड तू भारी.......४
दाखव तू कर्तृत्वाचा झेंडा
स्त्री पुरुष नारा समानता ,
अंगात नवदुर्गाची शक्ती
दिसे जगी स्त्रीची महानता. ....५
चल उठ तू , पूस ते अश्रू
तू हो दुर्गा आता कणखर,
तुझ्यात वसे अद्भूत शक्ती
लढ नवदुर्गा बनकर .....६

कवयित्री -सौ . सुवर्णा विश्वास पवार ,
इचलकरंजी.



## विठ्ठल विठ्ठल

अंतरी नित्यची भास मला
तव कृपाछत्रात मी चालतो
संगे ठसे तुझ्याच पाऊलांचे
तुझाच पदन्यासी नाद होतो
नाहताच तव कृपाकटाक्षी
तुझ्या रूपात विरुनी जातो
सांगनं.! कसे सावरू बापा
भेटावया जीव अधीर होतो
तू विटेवरी तरीही लोचनात
अंतरी तव भावस्पर्शी होतो

निर्मली सात्विक शाश्वताला
सत्यत्वाचा साक्षात्कार होतो
स्वर्ग भूवरी वैष्णवी वाळवंटी
गजर हरिकीर्तनाचा दुमदुमतो
विठ्ठल विठ्ठल जयहरी विठ्ठल
टाळचिपळ्या संगे हरि नाचतो

वि. ग. सातपुते.
( भावकवी )
(9766544908 )

## एक पाखरू..!

एक पाखरू अंगणात येतं
तक्रार स्वरात गाणं गातं

म्हणतं मुला बोलायचं तुला
आहे का वेळ माणसाच्या पिला

तुझाच पणजा तुझाच आजा
समजत होते पृथ्वीचा राजा

जंगल तोडून ओसाड केलं
होतं तेवढं ओरपून नेलं

आम्ही पाखरं रस्त्यावर आलो
झाडाविना पोरके झालो

नाही अन्न नाही खोपा
दिवसा ढवळ्या उडाल्या झोपा

माणसामुळेच बेतली दशा
आमच्या पिढ्या वाढतील कश्या

तू तर दिसतोस शिकलेला बाळ
कठीण वाटतो पुढचा काळ

म्हणून म्हटलं सांगावं तुला
शाळा शिकलेल्या गुणी मुला

झाडे लावून जंगल वाढव
म्हणोत कुणीही तुला गाढव

आमचा प्रश्न तडीस लाव
जगात होईल तुझंच नाव

-भानुदास धोत्रे
परभणी
7972625086



# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**




**आयुष्यावर मोठा परिणाम करणारी संप्रेरके :** हार्मोन्स (संप्रेरके) - पुरुष आणि स्त्री टेस्टोस्टेरॉन - पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉन नावाचे हार्मोन्स असतात. ज्यामुळे पुरुषांमध्ये लैंगिकता घडते, याला आपण कामभावनेचे हार्मोन्स असं देखील म्हणू शकतो. ज्यामुळे कामभावना निर्माण होण्याची प्रक्रिया घडते. हे हार्मोन्स अंडाशयामध्ये तयार होतात आणि काही प्रमाणात ॲडरिनल ग्लँडमधे बनतात. मेंदूमधील हायपोथॅलॅमस व पिट्युटरी ग्रंथी टेस्टोस्टेरोनच्या निर्मितीवर नियंत्रण ठेवतात.

या हार्मोनमुळे पुरुषांमधील लैंगिक विकास वाढीला लागतो. त्याचा लाभ निश्चितपणानं लैंगिक क्रिया करताना होतो. तसेच एकाग्रता, मूड, स्मरणशक्ती यावर सुद्धा टेस्टोस्टेरॉनचा प्रभाव पडत असतो, टेस्टोस्टेरॉनच्या माध्यमातूनच शुक्राणू तयार होत असतात स्त्रियांमध्ये मात्र याचं प्रमाण फार कमी असतं. आता पाहूया या टेस्टोस्टेरॉनशी शरीरातली पातळी जर कमी झाली तर काय होतं? या हार्मोन्सच्या कमतरतेमुळे चिडचिडेपणा, कामशक्ती कमी होणे, कामेच्छा न होणे या बरोबरच नपुंसकता, शुक्राणूंची संख्या घटणे, हॉट फ्लॅशेस, नैराश्य, नितंबांचा आकार वाढणे, हाडे ठिसूळ होणे अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागतं.




आता या समस्यांवर सुद्धा निश्चित उपचार करता येतो. ज्याला वैद्यकीय भाषेमध्ये टेस्टोस्टेरॉन थेरपी असं म्हटलं जातं. आधुनिक उपचारांची मदत घेऊन शरीरातील टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढवता येते. यामध्ये हाताचा दंड, खांदा किंवा पोटावर औषधी जेल लावणे, अंडाशय किंवा शरीरावर स्कीन पॅच लावणे, २ किंवा ३ आठवड्यांतून एकदा इंजेक्शन घेणे असे उपचार केले जातात. नैराश्यासाठी वेगळी उपचार पद्धती आहे. स्त्रियांमध्ये पाळीनंतर कामेच्छा कमी होत असेल तर टेस्टोस्टेरॉन थेरपी दिली जाते.



**डॉ. विजय दहिफळे**
**युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट**
**9822326248**

लो टेस्टोस्टेरॉन- नैसर्गिकरीत्या वाढत्या वयानुसार हे कमी होतात पण किती ते नक्की नसते. सायंकाळी याची लेव्हल कमी होते. यामुळे काय होते ? A. कामभावना कमी होणे. B. ई. डी. इंपोटन्स C. स्तनांचा आकार वाढणे D. शुक्राणूंची संख्या कमी होणे E. हॉट फ्लॅशेस (अचानक चेहरा व शरीराचा वरचा भाग गरम होणे, लाल होणे) F. नैराश्य, अस्वस्थता G. अंडकोश लहान होणे H. केस गळणे. I. हाडे ठिसूळ होणे. स्त्री आणि पुरुषांमध्ये कोणते हार्मोन्स असतात? 1. प्रोलॅक्टिन- हे हार्मोन पिट्युटरी ग्लँडमध्ये तयार होते प्रसूतीनंतर बाळाला स्तनपानासाठी दूध निर्मिती होण्यासाठी हे हार्मोन महत्त्वाचे आहे. प्रोलॅक्टिनचे काम काय? असे म्हटलं तर FSH ला (फॉलिकल स्टिम्युलेटिंग हार्मोनला) हे विरोध करते तसेच GNRH (गोनॅडॉट्रॉपीन रिलीजींग हार्मोन) याला देखील ते विरोध करते. जे की बीजांड तयार करण्याचे मुख्य काम करतात. पुरुषांमध्ये हे काय काम करते यावर सध्या संशोधन सुरू आहे. मात्र नक्कीच याचा संबंध वंध्यत्वाशी आहे. हाय प्रोलॅक्टिन लेव्हल ही पिट्युटरी ट्यूमर, लिव्हर, किडनी, PCOD व हायपोथायरॉइडिझम यामध्ये आढळते. 2. फॉलिकल स्टिम्युलेटिंग हार्मोन- अंडाशय व बीजांडांची वाढ या हार्मोनमुळे होते. पुरुषांमध्ये शुक्राणू तयार करण्यासाठीदेखील हे हार्मोन कामी येते. FSH पिट्युटरी ग्रंथीमध्ये बनते आणि बीजांड व अंडी तयार होते. 3. प्रोजेस्टेरॉन- मासिक पाळी येणे व गर्भधारणा होणे या क्रियांमध्ये हे हार्मोन महत्त्वाचे आहे. इस्ट्रोजन आणि प्रोजेस्टेरॉन दोन्ही एकत्र देतात जेणेकरून इतर दुष्परिणाम टाळता येतात.

इतर हार्मोन्सची माहिती आपण पुढच्या भागात घेऊ.

# आले होते पार्श्वगायक बनायला पण बनले दर्जेदार संगीतकार !

आधुनिक केसरी

ते मुंबईत आले होते पार्श्वगायक बनायला ; पण नियतीने त्यांच्या रूपाने दिला एक दर्जेदार संगीत दिग्दर्शक ! त्यांनी सामाजिक, प्रणयप्रधान आणि पौराणिक हिंदी चित्रपटांना संगीत देण्याबरोबरच भोजपुरी चित्रपटांनाही आपल्या सुमधुर संगीताचा लाभ करून दिला. भोजपुरी चित्रपटांना त्यांनी दिलेल्या संगीतात जितके माधुर्य आणि आपलेपणा वाटतो तितका अन्य कोणत्या संगीतामुळे वाटत नाही. आजच्या घडीला भोजपुरी संगीताची बरीच पीछेहाट झालेली दिसत असली तरी एके काळी त्यांनी भोजपुरी संगीताला ज्या वरच्या पातळीवर नेऊन ठेवले होते त्याबद्दल भोजपुरी चित्रपटसृष्टी त्यांची कायमची ऋणी राहील. ही व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून ते म्हणजे सुमधुर संगीताबद्दल सुप्रसिद्ध असणारे संगीत दिग्दर्शक चित्रगुप्त श्रीवास्तव ऊर्फ चित्रगुप्त हे होत.

चित्रगुप्त यांचा जन्म बिहार राज्याच्या सरन जिल्ह्यातील (आता गोपालगंज जिल्हा) सावरेजी या खेड्यात १६ नोव्हेंबर, १९१७ या दिवशी झाला. स्वातंत्र्य चळवळीत पत्रके वाटताना ते पकडले गेले आणि त्यांना महिनाभर तुरुंगात जावे लागले. तुरुंगातून बाहेर आल्यावर एका विराट सभेत त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत एक गीत गायले. ते ऐकून पंडितजींनी चित्रगुप्त यांची तोंड भरून प्रशंसा केली. चित्रगुप्त त्यावेळी पाटण्याच्या एका महविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. पंडितजींनी केलेल्या स्तुतीमुळे त्यांच्या डोक्यात गायक बनण्याचे विचार घोळू लागले आणि त्या आवडीपोटी ते मुंबईला आले. भातखंडे विद्यापीठातून संगीताचे शिक्षण घेतलेल्या चित्रगुप्त यांच्या स्नेह्यांनी त्यांची संगीत दिग्दर्शक एस. एन. त्रिपाठी यांच्याशी भेट घडवून आणली आणि चित्रगुप्त त्रिपाठी यांचे सहायक बनले. १९५४ साली प्रदर्शित झालेल्या `नागिन' या चित्रपटाला संगीतकार हेमंत कुमार यांचे संगीत होते. त्या चित्रपटाच्या गीतांमधे पुंगीच्या आवाजाचा परिणाम साधण्याचे श्रेय कल्याणजी-आनंदजी या संगीतकार जोडीतील दिवंगत संगीतकार कल्याणजी यांना दिले जाते. कल्याणजी यांनी क्ले व्हायोलिन या वाद्यावर तो परिणाम साधला होता. परंतु `नागिन' या चित्रपटाच्या आधी एक वर्ष (१९५३) प्रदर्शित झालेल्या `नागपंचमी' या चित्रपटात चित्रगुप्त यांनी तो प्रयोग यशस्वीपणे केला होता. `अभिमन्यू' या चित्रपटापासून सुरू झालेला चित्रगुप्त यांचा चित्रपटसंगीताचा प्रवास पन्नास वर्षे अविरत चालला. त्याकाळी बहुतेक निर्माते आणि दिग्दर्शक यांचा एक गट झालेला असायचा. ते आपल्या पसंतीचा गीतकार किंवा संगीतकार यांनाच घेत असत. अशी



परिस्थिती असताना संगीत दिग्दर्शक सचिन देव बर्मन यांच्यामुळे चित्रगुप्त यांच्यापुढे एक मोठी संधी चालून आली. `एव्हीएम' (ए. व्ही. मय्यप्पन) ही प्रख्यात दाक्षिणात्य चित्रपट निर्मितीसंस्था `शिव भक्त' हा चित्रपट निर्माण करणार होती. त्या संस्थेचे सदस्य नियोजित चित्रपटाच्या संगीतासाठी सचिन देव बर्मन यांच्याकडे गेले. दादा बर्मन त्यांना म्हणाले, की मी सध्या अतिशय व्यग्र आहे ; आपण या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी माझ्याऐवजी चित्रगुप्त यांच्यावर सोपविल्यास बरे होईल. `शिव भक्त'ला चित्रगुप्त यांनी संगीत दिले. त्यानंतर `एव्हीएम' चित्रसंस्थेने `भाभी' हा चित्रपट निर्माण केला आणि त्याच्या संगीताची जबाबदारीही चित्रगुप्त यांच्यावरच सोपविली. आणि त्या चित्रपटाची गीते अतिशय लोकप्रिय झाली. त्यातील "चली चली रे पतंग मेरी चली रे" या मोहम्मद रफी आणि लता मंगेशकर यांनी गायलेल्या आणि गाजलेल्या द्वंद्वगीताप्रमाणेच चित्रगुप्त यांचा संगीतरूपी पतंगही यशाच्या आकाशात झेपावला. सुमारे अकरा वर्षांच्या कठीण तपस्येनंतर चित्रपटसृष्टीत चित्रगुप्त यांची एक वेगळी ओळख निर्माण झाली. त्यानंतर `काली टोपी लाल रुमाल', `गंगा की लहरें', `बरखा', `आकाशदीप' आणि अन्य चित्रपटांना त्यांनी दिलेले संगीत लोकप्रिय झाले.

`आकाशदीप' या चित्रपटातील "दिल का दीया जला के गया ये कौन मेरी तन्हाई में" या गीताच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळचा प्रसंग ! त्या गीताच्या ध्वनिमुद्रणासाठी सगळ्या संबंधित व्यक्ती स्टुडिओत पोहोचल्या होत्या. ते गीत लता मंगेशकर गाणार होत्या आणि त्यांची प्रतीक्षा केली जात होती. काही वेळाने लता मंगेशकर यांचे स्टुडिओत आगमन होताच चित्रगुप्त त्यांचे स्वागत करण्यासाठी पुढे गेले. चित्रगुप्त आणि लता मंगेशकर चालत असताना चित्रगुप्त काहीसे लंगडत चालत आहेत, ही बाब लता मंगेशकर यांच्या लक्षात आली. त्यांनी चित्रगुप्त यांना लंगडत चालण्याचे कारण विचारताच ते म्हणाले, की माझी चप्पल तुटली आहे. यावर लता मंगेशकर यांनी त्यांना विचारले, की तुम्ही दुसरी चप्पल खरेदी का नाही केली ? चला आपण जाऊन चप्पल घेऊन येऊ या. तेवढ्यात चित्रगुप्त हसत हसत त्यांना म्हणाले, नको नको राहू द्या. जेव्हा मी हा शर्ट, ही पॅन्ट आणि ही चप्पल घालून ध्वनिमुद्रण करतो तेव्हा ध्वनिमुद्रण उत्तमच होते, अशी माझ्या मनाची धारणा आहे. ते ऐकताच लता मंगेशकर गालातल्या गालात हसत त्यांना म्हणाल्या, की तुमचा तुमच्या चपलेवर विश्वास आहे ; माझ्या गायनावर नाही ! आणि त्यानंतर "दिल का दीया" गीताचे ध्वनिमुद्रण पार पडले.

चित्रगुप्त यांनी आपल्या सुमधुर संगीताने सजविलेली अनेक गीते हिंदी चित्रपटांद्वारे श्रोत्यांसाठी दिलेली असूनही दुर्दैवाने ते कधी कोणत्या पारितोषिकांचे मानकरी ठरले नाहीत. परंतु असे असले तरी त्यांनी भोजपुरी चित्रपटांना दिलेल्या उल्लेखनीय संगीतासारखे दर्जेदार व मधुर संगीत अन्य कोणीही संगीत दिग्दर्शक इच्छा असूनही देऊ शकला नाही. चित्रगुप्त यांनी `गंगा मइया तोहे पियरी चढइबो', `लागी नाही छूटे राम', `बलम परदेसिया', `धरती मैया' या आणि अन्य अनेक भोजपुरी चित्रपटांना संगीत दिले इतकेच नव्हे तर भोजपुरी भाषेतील गोडवा आपल्या गीतांमधे कायम राखला. "तुम ही हो माता पिता तुम ही हो", "दगा दगा वई वई वई", "बलमा माने न बैरी चुप न रहे", "जय जय हे जगदंबे माता", "चल उड जा रे पंछी", "जा रे जादूगर देखी तेरी जादूगरी"सारखी श्रवणीय गीते देऊनही चित्रपट संगीताच्या क्षेत्रात जे स्थान चित्रगुप्त यांना मिळावयास हवे होते ते त्यांना मिळाले नाही. १९६८ साली त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर १९७४ साली ते अर्धांगवायूने जर्जर झाले. हिंदी चित्रपटांबरोबरच भोजपुरी चित्रपटांना आपले माधुर्यपूर्ण आणि हळुवार संगीत देणाऱ्या चित्रगुप्त श्रीवास्तव या गुणी संगीत दिग्दर्शकाचे १४ जानेवारी, १९९१ या दिवशी आपली कर्मभूमी मुंबईत निधन झाले.

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# दादा, तुम्ही गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराशी लढाच!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र पोलीस गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी आणि सर्व नागरिकांची सुरक्षा आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध आहे. महाराष्ट्र पोलीस देखील समाजाची सेवा करण्यासाठी आणि ज्या लोकांची सेवा करतात त्यांच्याशी नाते निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षा राखण्यासाठी पोलीस आणि समाज यांच्यातील दृढ नाते आवश्यक आहे, असे महाराष्ट्र पोलिसांचे मत आहे. मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र पोलीस काय फरक?**

मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र पोलीस या महाराष्ट्र, भारतातील दोन भिन्न कायदा अंमलबजावणी संस्था आहेत. मुंबई पोलिस ही मुंबई शहरासाठी कायद्याची अंमलबजावणी करणारी संस्था आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली ते कार्यरत आहे. त्यांच्याकडे ५० हजारहून अधिक अधिकारी आहेत आणि ते शहरातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदार आहेत. तर महाराष्ट्र पोलीस ही महाराष्ट्र राज्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणारी संस्था आहे. यांचे प्रमुख पोलीस महासंचालक, महाराष्ट्र हे आहेत. यांच्याकडे १.९५ लाख अधिकारी आहेत आणि ते राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदार आहेत. मुंबई पोलिस हे महाराष्ट्र पोलिसांचा एक भाग आहे.

मात्र, मुंबई पोलिसांना महाराष्ट्र पोलिसांकडून काही प्रमाणात स्वायत्तता आहे. मुंबई पोलिस स्वतःचे बजेट आणि स्टाफिंगसाठी जबाबदार आहेत.

मुंबई पोलिसांचे स्वतःचे पोलिस आयुक्त आहेत, ज्यांची नियुक्ती राज्य सरकार करते. राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र पोलीस एकत्र काम करतात.

मुंबई शहरातील कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी मुंबई पोलिसांवर आहे, तर उर्वरित राज्यातील कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी महाराष्ट्र पोलिसांवर आहे. मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र पोलीस दोघेही महाराष्ट्रातील लोकांची सेवा करण्यासाठी आणि त्यांना हानीपासून संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहेत. कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांना प्रतिबंध करणे, तपास करणे, राज्यातील रहिवाशांची सुरक्षासह सुरक्षा सुनिश्चिती करणे यासाठी महाराष्ट्र पोलीस विभाग जबाबदार आहे. हे अनेक विशेष युनिट्स आणि विभागांमध्ये विभागले गेले आहे, प्रत्येकामध्ये विशिष्ट जबाबदाऱ्या आणि पदे आहेत. महाराष्ट्र पोलीस विभागातील काही प्रमुख पदे आणि युनिट येथे आहेत- १) पोलीस आयुक्त- सीपी- पोलीस आयुक्त हे मुंबई आणि पुणे सारख्या प्रमुख शहरांच्या पोलीस विभागातील सर्वोच्च दर्जाचे अधिकारी आहेत. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या क्रियाकलापांवर देखरेख ठेवण्यासाठी आणि त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रात सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी



ते जबाबदार आहेत.

२) पोलीस महासंचालक- डिजीपी- डीजीपी हे संपूर्ण महाराष्ट्र पोलीस विभागातील सर्वोच्च दर्जाचे अधिकारी आहेत. ते संपूर्ण पोलीस दलाला एकंदर नेतृत्व आणि दिशा देतात. ३) पोलिस अधीक्षक- एसपी- हे जिल्ह्याच्या किंवा प्रदेशाच्या प्रशासन आणि पोलिसिंगसाठी जबाबदार असतात. ते त्यांच्या हद्दीतील पोलीस ठाण्यांच्या कामकाजावर देखरेख करतात. ४) पोलीस उपअधीक्षक- डिएसपी- डीएसपी जिल्हा किंवा प्रदेशात कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या क्रियाकलापांचे व्यवस्थापन करण्यासाठी एसपींना मदत करतात. ते विशेष युनिट किंवा विभागांचे प्रमुख देखील असू शकतात. ५) पोलीस निरीक्षक- पीआई- पोलीस निरीक्षक पोलीस ठाण्यांचे पर्यवेक्षण करणे, गुन्ह्यांचा तपास करणे आणि त्यांच्या नियुक्त क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखणे यासाठी जबाबदार असतात. ६) सहाय्यक पोलीस निरीक्षक- एपीआई- हे तपास करण्यासाठी आणि पोलीस स्टेशन क्रियाकलाप व्यवस्थापित करण्यासाठी पीआईला मदत करतात. ७) उपनिरीक्षक- एसआई- हे तपास करणे, रेकॉर्ड राखणे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्यात मदत करणे यासाठी जबाबदार असतात. ८) पोलीस कॉन्स्टेबल- पीसी- पोलीस हवालदार हा पोलीस दलाचा कणा असतो. ते गस्त घालणे, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे आणि आपत्कालीन परिस्थितीला प्रतिसाद देणे यासह विविध कर्तव्ये पार पाडतात.

९) ट्रॅफिक पोलिस- ट्रॅफिक पोलिस अधिकारी वाहतूक प्रवाहाचे व्यवस्थापन आणि नियमन, रहदारी नियमांची अंमलबजावणी आणि रहदारी उद्धरण जारी करतात. रस्ता सुरक्षा राखण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. युनिट्स- अ) गुन्हे शाखा- खून, दरोडा, संघटित गुन्हेगारी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा तपास करण्याची जबाबदारी गुन्हे शाखा आहे. यात खंडणीविरोधी कक्ष, दहशतवादविरोधी पथक-एटीएस आणि सायबर गुन्हे कक्ष यासारख्या विशेष युनिट्सचा समावेश आहे. ब) लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो- एसीबी- हे पोलिस विभाग आणि इतर सरकारी संस्थांमधील भ्रष्टाचार आणि गैरवर्तनाच्या प्रकरणांची चौकशी करते. क) राज्य राखीव पोलीस दल- एसआरपीएफ- हे विशेष सैन्यदले आहेत, ज्यांचा वापर निषेध, दंगली आणि इतर मोठ्या प्रमाणात घडामोडींच्या वेळी गर्दी नियंत्रणासाठी केला जातो. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ते स्थानिक पोलिसांनाही मदत करतात. **क्रमश :**

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424



# साबुदाण्याचे इन्स्टंट पकोडे

नवरात्रातील उपवासात मधल्यावेळी चहाबरोबर कधीतरीकाही खावेसे वाटले , कोणी कधी उपवासाचे आले तर झटपट , आणि एकदम खमंग, टेस्टी अशी ही डिश ! नक्की करून पहा,


**साहित्य :** 1 वाटी साबुदाणा , 1 बटाटा , अर्धा चमचा जिरे, 4..5 हिरव्या मिरच्या , कोथिंबर, मीठ, तेल. **कृती :** प्रथम गॅसवर कढई ठेवून मध्यम आचेवर साबुदाणा भाजून घ्यावा .म्हणजे त्यातील मॉईश्चर जाऊन छान कोरडा होतो त्यामुळे हलका होतो, म्हणजे पकोडे मस्त कुरकुरीत होतात व पीठसुद्धा झटकन होते. मग तो थंड झाला की मिक्सर मधून अगदी थोडा व व्हायंपरवर फिरवावा. थोडा दाणेदार, जाडसर
ठेवावा. हे पीठ एकदम जास्त करून ठेवले तरी चालते. खूप दिवस व्यवस्थित राहते आणि आयत्यावेळी पटकन उपयोगी येते, वेळ वाचतो. हे आपण इतरही बरेच पदार्थ करताना वापरू शकतो. त्यानंतर बटाट्याची साले काढून त्याचे तुकडे करून मिक्सर मध्ये घालावेत . त्यात मिरची, जिरे, कोथिंबीर घालून फिरवून वाटून घ्यावे. मग हे एका बाऊल मध्ये काढून त्यात साबुदाण्याचे पीठ घालून चवीनुसार मीठ घालावे. हे पकोडे खमंगच जास्त चवदार लागतात. यात लागेल तसे थोडेसे पाणी घालून हातांनी पकोडे बनवता येतील असे बनवावे व वेळ असेल तर 5 मिनिटे झाकून ठेवावे. नाही तरी चालेल पण ठेवले तर पीठ छान मुरते व साबुदाणा थोडासा भिजल्यामुळे जास्त फुलतो व पकोडे मस्त फुलतात. आता गॅसवर कढई ठेवावी. त्यात पकोडे तळण्यासाठी तेल घालावे. तेल छान तापले की त्यातील 1 चमचाभर पिठात घालावे.त्यामुळे 2 फायदे होतात एकतर पकोडे खूप क्रिस्पी होतात आणि दुसरे म्हणजे आत तेल घातल्यामुळे वरून तेल जास्त लागत नाही व पकोडे तेलकट होत नाहीत. तेलात बोटांनी छोटी छोटी सांडग्यासारखे मस्त पकोडे घालावेत व मध्यम आचेवर कुरकुरीत होईपर्यंत तळावेत.
हे पकोडे चाळणीत किंवा टिश्यू पेपरवर काढून मग सर्व्हिंग डिश मध्ये काढून गरम गरम सर्व्ह करावे.
**वैशिष्ट्य :** उपवासाला सारखे खिचडी, भगर, थालीपीठ असे जड पदार्थ खाण्याचा कंटाळा येतो, असा अशावेळी आणि एरवी सुद्धा स्नॅक्स म्हणून करण्यासाठी मस्त डिश आहे. कोथिम्बिर, हिरव्या मिरच्यामुळे सुरेख हिरवी व आकर्षक दिसतात. झटपट होते म्हणून करणारे खुश आणि टेस्टी व क्रिस्पी असल्यामुळे खाणारेही खुश !

# सिंघम आयआरएस अधिकारी समीर वानखेडे आज वाशिम जिल्ह्यात

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** भारतीय राजस्व सेवा २००८ च्या बॅचचे बहुचर्चित अधिकारी समीर वानखेडे आज त्यांची जन्मभूमी असलेल्या वाशिम जिल्ह्यात विविध ठिकाणी भेटी देणार आहेत. मुंबई येथे कर्तव्यावर असताना एका ड्रॅग्ज पार्टीवर छापा घातल्यानंतर ते मुंबईचे " सिंघम " अधिकारी म्हणून चर्चेत आले होते. तथापि, चित्रपट अभिनेते शाहरुख खान यांच्या मुलाला ड्रॅग्ज प्रकरणात अटक केल्यानंतर वानखेडे हे विशेष प्रकाश झोतात आले होते. त्यानंतरच्या आरोप_ प्रत्यारोपाच्या फेऱ्यात अडकलेले समीर वानखेडे यांचे नाव राज्यासह, संपूर्ण देशात गाजले होते. त्यांचे मुळगाव वाशिम जिल्ह्यात असल्याने



त्यांचा फार मोठा चाहता वर्ग जिल्ह्यात आहे. तद्वतच, समीर वानखेडे यांना सुद्धा आपल्या मायभूमी बद्दल विशेष आदर असल्याने त्यांच्या या भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

आयआरएस अधिकारी समीर वानखेडे काल दि. २१ आक्टो. रोजी अकोला येथे दाखल झाले आहेत. अकोला येथे विविध ठिकाणी भेटी दिल्यानंतर विश्राम गृहावर पत्रकार परिषद घेऊन ते वाशिमकडे रवाना होणार असल्याची माहिती समीर वानखेडे विचार मंचकडून देण्यात आली आहे. वाशिम जिल्ह्यात आल्यानंतर सर्वप्रथम मालेगाव तालुक्यातील शिरपूर येथील शहीद जवान आकाश आढागळे यांच्या कुटुंबाला सांत्वनभेट देऊन वाशिमला मुक्काम करतील. दि. २२ आक्टो.रोजी ते रिसोडकडे प्रस्थान करणार आहेत. त्याअनुषंगाने सकाळी ९ वाजता सवड ग्रामपंचायत येथे त्यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. १० वाजता रिसोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस हारअर्पण करून सकाळी १०:३० वाजता रिसोड येथील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेऊन ११वाजता अधिकारी समीर वानखेडे संभाजी नगरकडे प्रस्थान करणार असल्याची माहिती विचार मंचचे विजय पंडीत यांनी दिली आहे.

# पॅरोलवर सुटताच कैदी फरार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगणारा कैदी पॅरोलवर सुटला होता. त्यानंतर तीन वर्षांपासून फरार असलेल्या कैदीला अकोला स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी परराज्यातून अटक केली. पूर्वाश्रमीचा पोलीस असल्याने तो पोलिसांच्या जाळ्यात अडकू नये याची पूरेपूर काळजी घेत होता. अखेर शिताफीने पोलिसांनी त्याला पकडलेच.
हिंगणा शिवारात ०३ नोव्हेंबर २०१५ रोजी रणजीतसिंग चुंगडे व जसवंतसिंग चौहान यांनी किशोर खत्री यांची हत्या केली होती. या प्रकरणी जुने शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींविरोधात दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. हत्याकांड प्रकरणी आरोपींना जिल्हा सत्र न्यायालयाने २७ सप्टेंबर २०१८ रोजी दुहेरी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. शिक्षा भोगत असताना २०२० मध्ये कैदी जसवंतसिंग चौव्हान हा पॅरोल रजेवर जिल्हा कारागृहातून सुटला होता. तो कारागृहात परत गेला नाही. २९ जुलैपासून २०२० पासून तो फरार होता. त्याच्याविरुद्ध जुने शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू होता. या प्रकरणात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जिल्हा पोलीस अधीक्षकांना फरार कैदी जसवंतसिंग चौहान याचा विशेष पथक स्थापन करून शोध घेणे व त्यासाठी काय प्रयत्न केले, याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.
पोलीस अधीक्षक संदीप घुगेंनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांना फरार कैदीचा शोध घेण्याच्या सूचना केल्या. सापळा रचून बुऱ्हानपूरमधून फरार कैदी जसवंतसिंग चौहान याला ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर शेळके, स.पो.नि. कैलास भगत व त्यांच्या पथकाने केली.

# सावळदबारा परिसरात प्रधानमंत्री उज्वला योजनेचा शंभर रुपयांत गॅस

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथील इंडियन जर-जरी ग्रामीण गॅस वितरक सावळदबारा मो.आरिफ मो.लुखमान यांच्या वतीने दि. १९ ऑक्टोंबर : प्रधानमंत्री योजनेअंतर्गत महिलांसाठी विविध योजना केंद्र सरकार राबवत असून यामध्ये केंद्र सरकारच्या योजने अंतर्गत उज्वल योजने अंतर्गत फक्त महिलांसाठी कोणत्याही राशनकार्ड वर इंण्डेन गॅस कनेक्शन फक्त १०० रुपये मध्ये कनेक्शन योजना सुरु करण्यात आली असून या गॅस कनेक्शन साठी जास्तीत जास्त सावळदबारासह डाभा, मोलखेडा, घाणेगांव तांडा, पिंपळवाडी, चारुतांडा, घाणेगाव तांडा, टिटवी, -पळसखेडा, देव्हारी, नांदा तांडा, नांदागाव, हिवरी महिलांनी लाभ घ्यावा असे सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील



जर-जरी ग्रामीण गॅस एजन्सी अंतर्गत प्रधानमंत्री उज्वला योजना सुरु करण्यात आली असून कनेक्शन घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे एक फोटो, आधार कार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स, बारा अंकी राशन कार्ड नंबर व रेशनकार्ड झेरॉक्स, रेशनकार्ड मधील १८ वर्षांवरील कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड झेरॉक्स वरील कागदपत्रे सादर करुन फक्त १०० रुपये मध्ये उज्ज्वला योजने अंतर्गत सावळदबारा परिसरातील महिला लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे जर-जरी ग्रामीण गॅस एजन्सी सावळदबारा मो. आरिफ मो. लुखमान यांनी आवाहन केले आहे.

# वाढदिवसाचा खर्च टाळत शालेय साहित्य, मिठाई वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** उद्योजिका उर्मिलाताई मनोज पवार यांचा वाढदिवसा निमित्त प्र.क्रमांक ३ येथे साने गुरुजी विद्यालय येथे संदीप नरवडे यांच्या वतीने अनोखा वाढदिवस साजरा करण्यात आला. वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळुन शाळेसाठी ऑफिस कपाट व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, मिठाई यांच्याकडून वाटप करण्यात आली.
यावेळी उद्योजक मनोज पवार यांनी व संदिप नरवडे यांचे अनोखा उपक्रम राबवला म्हणून आभार मानले. यावेळी मंचावर रुख्मनबाई नरवडे, मनोज देशमुख, शेख नौशाद शेख, समीर शेख, सोमनाथ दाभाडे, रवी भालेराव, पवन ठाकूर, नितीन शेलार, शाळेचे मुख्याध्यापक धैर्यशील केरे, नितीन पाटील, हर्षदा कदम व शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते.



# भाजपाने केले तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्यात तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात शिक्षण सेवक, प्राध्यापक, आरोग्य सेवक, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक अशी सर्व शासकीय नोकरींची पदे कंत्राटी पद्धतीने भरली जात होती. आता हीच मंडळी कंत्राटी धोरणाचे खापर शिंदे व भाजप सरकारवर फोडत आहेत असा आरोप करीत भारतीय जनता पार्टीतर्फे तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्याचं शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, धुळे शहर विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली धुळ्यात दहन करण्यात आलं.
राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारचा धिक्कार करण्यासाठी महाराष्ट्र भर आंदोलन करण्याच्या सूचना दिल्या
आहेत. त्या अनुषंगाने धुळे महानगर जिल्हा शाखेच्या वतीने शहरातील महाराणा प्रताप चौकात हे आंदोलन



करीत असल्याचं अनुप अग्रवाल यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. या आंदोलनात भारतीय जनता पार्टी धुळे महानगराचे जिल्हा अध्यक्ष गजेंद्र अंपळकर, महापौर प्रतिभा चौधरी, धुळे लोकसभा संयोजक राजवर्धन कदमबांडे, धुळे विधानसभा संयोजक अनुप अग्रवाल, भीमसिंग राजपूत, जयश्री अहिरराव, सभापती किरणताई कुलेवार, प्रदीप कर्पे, जितेंद्र चौवटीया, ओमप्रकाश खंडेलवाल, यशवंत येवलेकर, संदीप बैसाणे, भारती माळी, संजय बोरसे, राजेंद्र खंडेलवाल, पृथ्वीराज पाटील, प्रथमेश गांधी, नंदू सोनार, आरती पवार, रवी बेलपाठक, डॉ. महेश घुगरी, डॉ. माधुरी बोरसे, विजय पाछापुरकर. राजकुमार बोरसे, बंटी मासुळे, सुनील बैसाणे, नागसेन बोरसे, हर्ष रेलन, वैशाली शिरसाठ, आकाश परदेशी, राजेश पाटील, पप्पू डापसे, योगेश मुकुंदे, मुन्ना शितोळे, संजय वाडेकर, संगीता पोद्दार, आरती महाले, निशा चौबे, राम अग्रवाल, भागवत चितळकर, रंजना पाटील, वंदना विश्वकर्मा, संगीता पोद्दार, सुनिता सोनार, कशिश उदासी, आशा रावल, अश्विनी सोनार, आरती महाले, योगिता बागुल, हिमानी,विश्वकर्मा, बंटी धात्रक, स्वप्नील कुलकर्णी, मोहिनी धात्रक, बबन चौधरी, नीरज देसले, ईश्वर पाटील, करन लोंढे, विनोद खेमनर, रमेश करनकाळ, सुरज चौधरी, बालाजी अग्रवाल, मीनल अग्रवाल, सचिन पाटील, पंकज धात्रक, हर्शल बोरसे, विनय बेहरे, अशोक गवळी, शिवाजी काकडे, राजेश पवार, भिलेश खेडकर, उर्मिला पाटील, भगवान देवरे, सुनील देवर, छोटूभाऊ थोरात, अशोक गाढवे, प्रशांत गवळी, मयूर गवळी, योगेश सैंदाणे, अजय अग्रवाल, विजय पवार, रवी मगरे, वंदना सूर्यवंशी,रवी मगरे, दिलीप गवळी, सदा ठाकरे, देविदास वाघ, दीपक कुंठे, राजेंद्र मुस्गे, राजेंद्र गांगुर्डे, विशाल सोनावणे, सुनिता सोनार, विजय शिरसाठ इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संखेने सहभागी झाले होते.



# झोपडपट्टी धारकांना बेघर करण्याचा डाव; संभाजी ब्रिगेडचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल :** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पात बोरिवली येथील ओम साई गृहनिर्माण संस्थेच्या वतीने झोपडपट्टी धारकांना हक्कांच्या घरांपासून बेघर करण्याचे कटकारस्थान निराला कन्स्ट्रक्शन कडून सुरू असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेड प्रणित घर हक्क समितीच्या वतीने करण्यात आला.यावेळी पत्रकार परिषदेत मुंबई संभाजी ब्रिडचे अध्यक्ष सुहास राणे, प्रवक्ते प्रमोद शिंदे, उपाध्यक्ष श्रीकांत गिरी,चंदूभाई पटेल, मूळ मालमत्ताधारक शांतीबेन बाबुभाई पटेल सोबत २३ भाडेकरू देखील उपस्थित होते. मूळ मालमत्ता धारकांना घरे मिळावीत यासाठी संभाजी ब्रिगेड प्रणित घर हक्क समितीच्या वतीने बोरिवली ते बांद्रे झोपु कार्यालयावर आत्मक्लेष मोर्चा आयोजित करण्यात येणार आहे. बोरिवली पूर्व येथील रायडोंगरी नंबर ५, कार्टर रोड येथे झोपू योजना राबविण्यात येत आहे.मालमत्ता कार्डवर रायडोंगरीतील शांतीबेन बाबुभाई पटेल व वेस्ता जयसिंग यांची नोंद असताना निराला विकासक सुरेश सोलंकी मूळ मालमत्ता धारकांना फसवत असल्याचा आरोप करण्यात आला. मालमत्ता कार्ड वर मयत वेस्ता जयसिंग यांची मुलगी शांतीबेन बाबुभाई पटेल, वेस्ता जयसिंग यांची नावे कायदेशीर पट्टेदार म्हणून नोंद आहेत.गेल्या ७० वर्षांपासून मालमत्तेचा कर शांतीबेन बाबुभाई पटेल स्वतः भरत आहेत. मालमत्ता कार्ड सर्वे नंबर ४३५ / १ ते ५ मध्ये एकूण २३ भाडोत्री राहत असून त्यांची भाडे पावती ही शांतीबेन, शांती निवास चाळीच्या माध्यमातून करून दिली जाते.त्यामुळे ओम साई गृहनिर्माण संस्था विकासक सुरेश सोलंकी यांच्यावतीने चुकीच्या पद्धतीने झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवत आहेत.झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व पोलीस प्रशासनाला हाताशी धरून आदिवासी समाजाला हक्काच्या घरांपासून वंचित ठेवण्याचा प्रकार सुरू आहे,असा आरोप संभाजी ब्रिगेड प्रणित घर हक्क समितीने केला आहे.

**बोगस दस्तऐवज ?** : जमीन खरेदी–विक्रीचे बोगस दस्तऐवज लावून विकासकाने प्रशासनाची फसवणूक केली आहे,असा आरोप सुहास राणे यांनी केला .आत्तापर्यंत २ वेळा घरे तोडण्याच्या नोटीसा देत रहिवाशांना त्रास देणे सुरू आहे, असा आरोप उपाध्यक्ष श्रीकांत गिरी यांनी केला .चाळ पुनर्विकासाच्या यादीमध्ये बनावट नावे ही दिसून येत आहेत . विकासकाचे काम पाहणाऱ्या वकिलाचे नाव देखील पात्रता यादीत आहे .त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करून जिल्हाधिकाऱ्यांच्या मदतीने पुनर्रचना करण्यात यावी, अशी मागणी ही यावेळी संभाजी ब्रिगेड प्रणित घर हक्क समितीच्या वतीने करण्यात आली .

**कार्यालयावर मोर्चा काढणार** : जो विकासक रहिवाशांना त्रास देत असेल, त्याचा सुद्धा समाचार घेतला जाईल असा, इशारा संभाजी ब्रिगेडने दिला आहे . यासाठी रखडलेल्या झोपू योजनेतील रहिवाशांची एकत्रित मोट बांधली जात असून त्यांच्यासह बोरिवली ते वांद्रा झोपू कार्यालयावर भव्य असा मोर्चा काढण्यात येणार आहे, असे यावेळी जाहीर करण्यात आले .

**संभाजी ब्रिगेड स्टाईलने उत्तर** : जे अधिकारी विकासकांकडून पैसे घेऊन रहिवाशांना नोटीसा काढतात, त्यांना यापुढे झोपू कार्यालयात मीडियासमोर संभाजी ब्रिडच्या स्टाईलने धडा शिकवला जाणार आहे .

# राठोड यांनी स्वीकारला फुलंब्री पंचायत समितीचा पदभार

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** पंचायत समिती गटविकास अधिकारी म्हणून सहायक गटविकास अधिकारी व्ही. एस. राठोड यांनी गुरुवारी प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून पदभार घेतला आहे. फुलंब्री पंचायत समिती वादग्रस्त गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी यांच्या बदलीनंतर संजय गायकवाड यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आला होता. त्यांनी प्रस्ताव दाखल न करता अनेक संचिकांना मान्यता दिली. दोन महिन्यांपूर्वी जिल्हा परिषद मुख्याधिकारी विकास मीना यांनी गटविकास अधिकारी गोस्वामी यांच्याकडे पदभार दिला. त्यांनी पदभार स्वीकारला आणि दोन-तीन दिवसांनंतर अचानक रजेवर निघून गेले. पुन्हा संजय गायकवाड यांच्याकडे पदभार देण्यात आला. गायकवाड हे गेल्या महिनाभरापासून आजारी रजेवर निघून गेले ते आजपर्यंत कार्यालयात परतले नसल्याने पंचायत समितीतील सर्वच कामे खोळंबून पडली. गायकवाड यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली, शिवाय त्यांनी मंजुरी दिलेली सार्वजनिक कामे रद्दही करण्यात आली. अशा या वादग्रस्त ठरलेल्या पंचायत समितीचा गटविकास अधिकारी म्हणून आता सहायक गटविकास अधिकारी राठोड यांच्याकडे पदभार सोपवला आहे.



# भाजप शहराध्यक्षपदी मिसाळ

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पक्षाच्या शहर अध्यक्षपदी योगेश मधुकरराव मिसाळ यांची गुरुवारी (दि. १९) दुसऱ्यांदा निवड करण्यात आली. भाजपचे तालुकाध्यक्ष सांडू जाधव यांनी तालुका कार्यकारिणी जाहीर केली. यात शहराध्यक्षपदी योगेश मिसाळ यांची दुसऱ्यांदा निवड करण्यात आली. मागील दोन वर्षांत योगेश मिसाळ यांची पक्षातील कामगिरी पाहता त्यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. शुक्रवारी आ. हरिभाऊ बागडे यांनी योगेश मिसाळ यांचा सत्कार केला.

यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, छत्रपती संभाजीनगर बाजार समिती सभापती राधाकिसन पठाडे, विलास उबाळे, साई शेलार व ग्रामस्थ उपस्थित होते.

# १४ कोटींच्या नियमबाह्य ७८ वर्क ऑर्डर रद्द: जि. प. सीईओंचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी संजय गायकवाड यांनी शासनाच्या यादीत काम मंजूर नसताना दिलेल्या १४ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या ७८ वर्क ऑर्डर रद्द करण्याचे आदेश जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी दीड महिन्यांपूर्वी दिले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी करणारे बीडीओ गायकवाडच गेल्या २० दिवसांपासून कार्यालयात आले नसल्याने हे आदेश धूळ खात पडून आहेत.

फुलंब्री पंचायत समितीमध्ये प्रभारी बीडीओ म्हणून संजय गायकवाड हे २३ जूनला रुजू झाले, त्यांनी २३ जून ते ६ ऑगस्ट दरम्यान आपल्या अधिकारातून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नियमबाह्यरीत्या सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक, आदी ७८ कामांच्या जवळपास १४ कोटी रुपयांच्या वर्क ऑर्डर दिल्या. संबंधित कामाच्या वर्क ऑर्डर देताना शासनाकडून त्यास मंजुरी घेतली जाते. त्यानंतर पंचायत समितीस्तरवरून वर्क ऑर्डर दिल्या जातात; पण या नियमाचे पालन न करता गायकवाड यांनी स्वतःच्या अधिकाराने वर्क ऑर्डर दिल्या. विशेष म्हणजे गायकवाड यांनी अधिकारात नसताना व शासन यादीत मंजूर काम नसताना सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक रस्ता कामे, आदींच्या कुशल कामांना प्रशासकीय मान्यता दिली. प्रत्यक्षात कुशल कामाचा भार शासनावर पडतो. असे असताना गायकवाड यांनी नियमांचे उल्लंघन करून विविध कामांना प्रशासकीय मंजुरी दिली, याबाबत अनेकांनी तक्रारी केल्या. त्यामुळे ही सर्व कामे तत्काळ रद्द करण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनीही बजावली नोटीस याच प्रकरणात जिल्हाधिकारी अस्तिककुमार पांडेय् यांनीही प्रभारी गटविकास अधिकारी संजय गायकवाड़ यांना नोटीस बजावली आहे. त्यात म्हटले आहे की, फुलंब्री तालुक्यात गटविकास अधिकारी यांनी शासन स्तरावरून मंजूर कामाव्यतिरिक्त इतर कामांना मंजुरी नसताना त्यांच्या कार्यालयामार्फत प्रशासकीय मंजुरी दिली. ही मग्रारोहयो योजनेच्या दृष्टीने अंत्यत गंभीर बाब आहे. आपण कोणत्या शासन निर्णयाच्या आधारे या कामांना मंजुरी दिली, याचा खुलासा तीन दिवसांत करावा, असे आदेश दिले आहेत.

# समीक्षक धनाजी धोंडीराम घोरपडे यांना कवयित्री शांता शेळके साहित्य गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**बहादुरवाडी :** ता. वाळवा, सांगली येथील समीक्षक व कवी धनाजी धोंडीराम घोरपडे यांच्या गा-हाणं या कवितासंग्रहास राज्यस्तरीय कवयित्री शांता शेळके साहित्य गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान मंचर, जि. पुणे यांच्यावतीने दरवर्षी महाराष्ट्रातील सकस कलाकृतींना कवयित्री शांता शेळके साहित्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. गेले अनेक वर्ष या संस्थेने महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिकांच्या कलाकृतींना या पुरस्काराने सन्मानित केले असून धनाजी धोंडीराम घोरपडे यांच्या गा-हाणं या कवितासंग्रहास हा पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला आहे. हा कवितासंग्रह अनेक मान्यवर समीक्षकांनी गौरविलेला असून शांता शेळके साहित्य गौरव पुरस्कारामुळे कवितासंग्रहाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. रोख रक्कम, शाल,सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे याचे स्वरूप असून डिसेंबर 2023 मध्ये हा पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.


हा वैविध्यपूर्ण आणि दखलपात्र असा कवितासंग्रह असून त्याची दखल विविध माध्यमाने घेतली आहे. राज्यातील अनेक वांग्मयीन संस्थांनी त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्याला पुढील -पद्मश्री नारायण सुर्वे उत्कृष्ट साहित्य पुरस्कार -पुणे, तापी-पूर्णा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार -जळगाव,महाकवी कालिदास मेघदूत साहित्य पुरस्कार -सोलापूर, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा पुरस्कार- कोल्हापूर,अग्रणी साहित्य पुरस्कार देशिंग- हरोली -सांगली, शब्दांगण साहित्य पुरस्कार -मिरज जि. सांगली इत्यादी पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या कवितासंग्रहास आत्तापर्यंत सात राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल समीक्षक व कवी धनाजी धोंडीराम घोरपडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# जालन्यात आज प्रगत सर्जनशील तंत्रज्ञान सेमिनार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** ग्रो मोअर अकॅडमीतर्फे रविवार दि. 22 ऑक्टोबर रोजी सर्व शाळा आणि महाविद्यालयाचे 12 वर्षांवरील विद्यार्थी आणि त्यांच्या पालकासाठी 'प्रगत सर्जनशील तंत्रज्ञान' या विषयावर निःशुल्क सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रुपम हॉलमध्ये हॉलमध्ये सकाळी 9.30 ते 7.30 या वेळेत होणाऱ्या या सेमिनारला प्रमुख पाहुणे म्हणून मत्सोदरी इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, मुंबई येथील एसीई कॅम्पुटर एज्युकेशनचे चेअरमन डी एस. निंभोरकर, बारवाले कॉलेजच्या श्रीमती रूपाली तिडके. एड. अश्विनी धन्नावत, ईश्वरी जड, श्रेया खांडेभराड यांची उपस्थिती राहणार आहे. या ठिकाणी विविध ॲक्टीव्हीटीज, गेम्स, लकी ड्रॉ, प्रोग्रामिंग आणि मॉडेल्सचे 30 स्टॉल्स राहणार आहेत. विद्यार्थ्यांच्या बुद्धीमत्तेचा विकास व्हावा, या दृष्टीने आयोजित सेमिनारमध्ये कॉम्पूटर प्रोग्रामिंग प्रोजेकट अंतर्गत विद्यार्थ्यांने स्वतः वेगवेगळे तयार केलेले कॉम्पुटरचे प्रागामिंग पाहायला आणि शिकायला मिळणार आहेत. तसेच तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवरांचा अनुभव मिळेल. याप्रसंगी याप्रसंगी तांत्रिक व सामाजिक चर्चासत्र होईल. सॉफ्टवेअर विकसित करण्यात रस असणाऱ्या शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या सेमिनारचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळवून देणे हेच आमचं कर्तव्य

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपला माल परस्पर न देता विकता बाजार समिती लिलाव मध्ये आणावा असे बाजार समिती सभापती डॉ मनोज राठोड व सर्व संचालक मंडळाचे शेतकरी यांना आव्हान केले आहे.
कन्नड येथील मार्केट कमिटी लिलाव मध्ये मोठ्या प्रमाणात सोयाबीन, मका व इतर भुसार मालांचे आवक सर्व मालाचे जाहीर लिलाव करून शेतकरीच्या मालाला योग्य भाव मिळवून दिल्याबद्दल सर्व शेतकरीनी बाजार समिती सभापती, संचालक मंडळ, सचिव कर्मचारी व व्यापारी मंडळीचे जाहीर आभार धन्यवाद मानले. आज सोयाबीनला 4600 ते 4700 रू. तर गहुला 3000 ते 3100 रू. मका 1600 ते 1700 रू. आदरकला 6500 ते 7000 पर्यंत भाव मिळाले. तालुक्यातील सर्व उपबाजार समिती दसरा पर्यंत चालू करून अशाच प्रकारे लिलाव करून शेतकरीच्या काबाड कष्टाने पिकविलेल्या हक्काच्या मालाला मोबदला मिळवून देणार तसेच आमच्या आव्हानाला मान देऊन सर्व व्यापारी बंधूचे आभार लिलावात सहभागी झाल्याबद्दल शेतकरीनी सुध्दा परस्पर आपला माल न विकता बाजार समिती लिलाव मध्ये आणावा - सभापती डॉ. मनोज मारुती राठोड आव्हान देखील केले आहे. या वेळी लिलाव समयी सभापती डॉ. मनोज राठोड, संचालक प्रकाश अगरवाल, संचालक युसुफ शेख, सचिव बाळू पवार, संजय पवार, हुक्कुमचंद पांडे, प्रदीप पहाडे, विजू पवार, संतोष ठोले, प्रवीण अग्रवाल, मुस्सा शेख, संजय आसरवाल, अस्लम शेख, राजू शेख सह सर्व व्यापारी व शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थीत होते .



# जिल्हाधिकाऱ्यांचा जनता दरबार, जनतेकडून प्रश्नांचा भडीमार

आधुनिक केसरी न्यूज

गणेश गिरी यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाचा, गोविंद पा . रोशनगावकर यांनी बाबळी बंधाऱ्याशी निगडित प्रश्न, दिगंबर लखमावाड यांनी मालगुजारी तलावावरील अतिक्रमाणाचा, शिवराज गाडीवान यांनी लेटलतीफ अप डाऊन करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तर रवींद्र पोतगंट्टीवार यांनी तालुक्यातील विविध प्रश्नावर आक्रमक भूमिका मांडली . व सतिश शिंदे यांनी जल जीवन योजना या संधर्भात बाबुराव पाटील आलूरकर यांनी बेल्लर, या नविन झालेल्या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले त्याला जबादार कोण असे प्रश्न उपस्थित केले .

**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी शुक्रवारी सीमावर्ती भागातील धर्माबाद, बिलोली, देगलूर तालुक्यातील प्रलंबित प्रश्न निकालात काढण्यासाठी स्वतः उपस्थित राहून नगर परिषद कार्यालयात बैठक घेतली. याबैठकीसाठी धर्माबादचे उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे, तहसीलदार शंकर हंदेश्वर, बिलोलीचे उपविभागीय अधिकारी सचिन गिरी, देगलूरचे तहसीलदार राजा भाऊ कदम, कार्यकारी अभियंता रामकृष्ण गळधर, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते, पत्रकार, सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सीमावर्ती भागातील धर्माबाद तालुक्याच्या विकासाच्या संदर्भात शासनाची भूमिका नेहमी उदासीन राहिली आहे. त्यामुळे येथील नागरिकांच्या मनात खदखद आहेच.याला गणेश गिरी,शिवराज पा. गाडीवान सतिश शिंदे, बाबुराव पाटील आलूरकर, रवींद्र पोतगंटीवार, संजय पवार, दिगांबर लाखमावाड यांनी वाचा फोडली. यामध्ये प्रामुख्याने धर्माबादच्या ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात यावा, शासकीय जमिनीवरचे अतिक्रमाण थांबवावे,विविध शासकीय इमारतीचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावावे, शिवसैनिकांवरील ३५३ सारखे गुन्हे मागे घ्यावे, बाळापूर ते आयआयआयटीचा रस्त्याचा प्रश्न सोडवावा, शहराचा सिटी सर्व्हे करून लोकांना गावठाण प्रमाणपत्र मिळावे, जलजीवन मिशन अंतर्गत विविध कामे चालू असले तरी त्यांचा दर्जा व गती थक्क करणारी आहे. इसापूरच्या डाव्या कालव्याचे काम हत्तीच्यागतीने सुस्त चालू आहे. यामुळे शेती पाण्यात गेली आहे. ग्रामीण शाळा, आरोग्य यावर समस्यांचा पाडाच वाचला होता. जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी जनतेच्या दरबारात येऊन लोकांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत हे कौतुकास्पद असले तरी ह्या समस्या सुटल्या तरच हे अर्थपूर्ण होणार आहे. अन्यथा हा केवळ प्रशासकीय सोपस्कार ठरेल.

# सोलापूर महामार्ग जामखेड फाटा येथे धनगर समाज रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**आंबड :** तालुक्यातील जामखेड येथे सर्व धनगर समाज बांधवांसाठी संविधानिक आणि रास्त मागणीसाठी जामखेड व शेजारील गाव परिसरातील धनगर समाज एकत्र येऊन जामखेड फाटा येथे सकाळी दहा वाजता आंदोलन सुरू केले. समाजाला एसटी आरक्षण अंमलबजावणी करावी ' आज रोजी भारत स्वांतत्र्य होऊन 75 वर्षे झाले आम्हाला तरी देखील धनगर आणि धनगड अशा शब्दांचा कुंठ कारस्थान करून महाराष्ट्रातील धनगर समाजाला आरक्षणापासून वंचित ठेवले 'व धनगर समाजाचा बोटिंगसाठी व आश्वासनावर बळी दिला आता असे होणार नाही आता ( नवतरुण ) धनगर समाज सुशिक्षित झाला आहे याची सरकारने व पक्षातील नेत्यांनी दक्षता घ्यावी व जोपर्यत्न समाजाला आरक्षण देत नाही तोपर्यत्न कोणत्याही पक्षाला गावात प्रवेश देणार नाही , असे आव्हाहन गावातील नागरिकानी केले. मा .चंद्रकांत शेळके ( तहशील दार ) 'यांना निवेदन दिले ' लवकरात लवकर S T आरक्षणाचे प्रमाणपत्र देण्यात यावे असे सर्व समाजातील व्यक्तीनी रोकठोक संभाषणातून सांगितले ' व सर्व पक्षातील नेत्याना सागण्यात आले कि जो पर्यत्न एस टी आरक्षण मिळत नाही तो पर्यंत गावात यायचे नाही असे सांगणात आले . जामखेडचे संरपच अॅ .रतन तारडे , संखाराम भोजने , प्रा शिवाजी ढेपले ( श्रमिक वतर्मानपत्र विक्रेते संघटना महाराष्ट्र राज्य ' सचिव ) कान्होजी कुंडकर,अशोक तारडे,घनश्याम पांढरे, गंगाधर पांढरे, कल्यान तारडे, तुळशीराम वैद्य , भगवान भोजने, गणेश भोजने , रंगनाथ राठोड, संजय फटाकडे , पाराजी भोजने, श्रीमंत पांढरे, प्रमोद खांडे, सुरेश वैद्य, शेषराव भोजने, रामेश्वर वैद्य, बाबासाहेब भोजने, संतोष भोजने व धनगर समाजातील सर्व बांधव उपस्थित होते.



# महाराष्ट्रात ११.४ टक्के कमी पडला पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मान्सूनने निरोप घेतला, पण निरोप घेतानाही तो कोसळलाच नाही. त्यामुळे देशभरातच यंदा पावसाची तूट राहिली आहे. राज्यात आणि देशात यंदा मान्सून उशिराने आला. त्यानंतर पावसाचा मोठा खंड पडला. ऑगस्ट महिना वगळता राज्यात चांगला पाऊस झाला नाही. सर्व अपेक्षा परतीच्या पावसावर असताना परतीचा पाऊसदेखील चांगला झाला नाही. यंदा पाऊस सरासरीपेक्षा कमी झाला आहे. देशात पावसाची सरासरी ८६८.६ मिमी आहे. मात्र, यावर्षी ८२० मिमीच पाऊस झाला. २०२३ च्या चार वर्षांपूर्वी चांगला पाऊस झालेला होता.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118, राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142, 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# झेंडू लागवडीकडे शेतकऱ्यांचा वाढला कल

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील परिसरात पिवळ्या, केसरी, लाल रंगाच्या झेंडू फुलांची शेती बहरली आहे. आगामी येणाऱ्या दसरा, दिवाळीत झेंडूला महत्त्व असते. यावेळी झेंडूची लागवड यंदा मोठ्या प्रमाणात असून दिवाळी, दसऱ्यापर्यंत झेंडू पूर्णपणे तयार होणार असुन चांगला भाव मिळू शकेल, असा विश्वास शेतकरी व्यक्त करीत आहेत.

नवरात्रौत्सव, दसरा, दिवाळी सणासाठी झेंडूच्या फुलांची मागणी मोठ्या प्रमाणात असते. यामुळे पारंपरिक नवनिर्मितीचा ध्यास घेत झेंडू शेती बहरत आहे. झेंडूच्या फुलांची वाढती मागणी व बाजारपेठेचा शेतीसोबतच विचार करून अनेक शेतकरी झेंडू शेतीकडे वळाले आहेत. दसरा-दिवाळीच्या पार्श्वभूमीवर गेल्या दीड ते दोन महिन्यांपूर्वी लागवड केलेली झेंडूची शेती बहरली असून, पिवळ् केशरी रंगाच्या झेंडूची फुले डौलाने उभी असल्याने परिसराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची लागवड केली असून, त्यातही शेतकऱ्यांनी पिवळा आणि केशरी या जातीच्या झेंडूच्या लागवडीला पसंती दिली आहे. झेंडूचे उत्पादन देड ते दोन महिन्यात येते. ऑगस्टच्या मध्यावर व सप्टेंबरमध्ये लागवड केलेले झेंडू बरोबर सणासुदीत म्हणजेच दसरा, दिवाळीत बहरून आला आहे.



# रेशनचा तांदूळ जातो तरी कुठे ?

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** गेल्या काही दिवसापासून जिल्ह्यात रेशनच्या तांदळाची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. रेशनच्या तांदळाला काळ्या बाजारात चांगला दर मिळत असल्याने जिल्ह्यात रेशन माफिया सक्रिय झाले असून यात लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. यामुळे रेशनचा तांदूळ जातो तरी कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रिसोडच्या तहसीलदारपदी रुजू झाल्यानंतर प्रतीक्षा तेजनकर यांनी रेती माफिया, तांदूळ माफियांविरोधात धडक मोहीम हाती घेतली आहे. त्यांनी १९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजतादरम्यान रिसोड शहरातील महात्मा फुले नगर येथे छापा टाकून तांदळाचे ५१० कट्टे व ट्रक असा एकूण १६ लाख २६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. मात्र ट्रक चालक फरार झाला असून या प्रकरणी रिसोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संपूर्ण जिल्ह्यात रेशनची तस्करी होत असताना कारवाया केवळ रीसोड येथेच होत असल्याने इतर ठिकाणी प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी व रेशन माफियांमध्ये संगनमत तर नाही ना ? याचा शोध घेण्याची गरज आहे. तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर, बाळासाहेब दराडे निवासी नायब तहसिलदार तथा प्रभारी निरीक्षण अधिकारी पुरवठा विभाग, गोदामपाल बळीराम मुंडे, पी.बी बायस्कर तलाठी रिसोड, पोलीस निरीक्षक उत्तम गायकवाड आणि दोन पोलीस अमलदार यांनी रिसोड येथे कारवाई केली.




# तुमचं आरक्षण तुम्ही घ्या, आमचं आम्हाला द्या

## मनोज जरांगे : फलटणवर सुरू केलेला लढा, तो कधीच हरला नाही

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**फलटण :** ओबीसीच्या आरक्षणास धक्का लागला नाही पाहिजे या मताचे मराठे आहेत. तुमचं आहे ते खाल्लं पाहिजे. आमचं आम्हांला दिलं पाहिजे. तुम्हाला कायद्याने १४ टक्के आरक्षण दिलेले आहे. तुम्ही तुमचं घेतलं पाहिजे. आमचं आम्हांला दिलं पाहिजे. त्याशिवाय सुट्टी नाही.सरकारला सुट्टी नाही. तुमची आमची वैयक्तिक दुश्मनी नाही. तुम्ही गोरगरिब मराठ्यांना विरोध करू नका. या मराठ्यांनी सगळे पक्ष आणि सगळे नेते मोठे करण्यासाठी खूप कष्ट घेतलेले आहेत. आमच्या मराठयांनी कधीच जात बघितली नाही. ग्रामीण भागातील ओबीसी बांधवांना आताही वाटतं गोरगरीब मराठयांना आरक्षण मिळालं पाहिजे. एक ही विरोध करत नाहीत. आपण आपल्या मतावर ठाम आहे. तुमचं आरक्षण तुम्ही घ्या,आमचं आम्हाला द्या, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

छत्रपती शिवाजी महाराज यांची सासुरवाडी आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे आजोळ असलेल्या फलटण येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा क्रांती मोर्चा,सकल मराठा समाज यांच्या वतीने मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सभेला संबोधित करताना मनोज जरांगे पाटील बोलत होते. ही सभा ऐकण्यासाठी तालुक्यातूनच नव्हे तर जिल्ह्यातील मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. "एक मराठा,लाख मराठा" या घोषणेसह "एक मराठा, कोटी मराठा"असा नारा सुद्धा मराठा समाज बांधवांकडून देण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. मनोज जरांगे पाटील स्टेजवर येताच राज्यस्तरीय खेळाडू मुलींनी त्यांचे औक्षण केले. औक्षण झाल्यानंतर जरांगे पाटील यांनी मुलींना स्टेजवरच थांबण्यास सांगून मुलींना एक सन्मानाचे स्थान दिले. सभेला संबोधित करताना मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, मराठ्यांना अशी संधी येणार नाही. या संधीचे सोने करा. इथे आपल्या लेकरा बाळांच्या प्रश्नाचा विषय आहे.इथे ना माझा स्वार्थ आहे, ना तुमचा इथे घरा घरातील मराठयांच्या लेकरांचा प्रश्न आहे.प्रत्येक आई बाप स्वप्न बघतोय, माझा मुलगा,

माझी मुलगी अधिकारी झाली पाहिजे.इतका पैसा घालवून जर होत नसेल तर त्याचं मूळ कारण आरक्षण आहे.आता तेच मिळवायचे आहे.हा पहिला आणि शेवटचा लढा आहे. पण आपल्यात फुट पडू देऊ नका.हे आरक्षण कसं देत नाहीत.ते आपण बघू,त्याची काळजी करूच नका.यांना माझी भाषा कळते.असा इशारा सुद्धा जरांगे पाटील यांनी दिला.

पुढे जरांगे पाटील म्हणाले की,आपल्या मराठा समाजाच्या लेकरांच्या पदरात हे आरक्षणाचं पुण्याचं दान एकजुटीने टाकू लागा.अशी संधी पुन्हा येणार नाही. कारण वेळ आपण दिलेला नाही. वेळ त्यांनी आपल्याकडून घेतला आहे. इथे आपली जमेची बाजू आहे. असे ही त्यांनी म्हटले. समाजाशी गद्दारी करणार नाही, सरकारच्या छाताडावर बसून आरक्षण घेणार असा इशारा सुद्धा जरांगे पाटील यांनी सरकारला दिला. जरांगे पाटील येण्यापूर्वी काहींनी मनोगते व्यक्त केली.सभेला उशीर होऊन सुद्धा एक वेगळा उत्साह दिसून आला. सभेच्या ठिकाणचा परिसर हा पूर्णपणे भगवामय झाला होता. मनोज जरांगे पाटील यांनी सर्वांना मोबाईल टॉर्च सुरू करण्यास सांगितल्यानंतर सर्वांनी मोबाईलचे टॉर्च सुरू करून एक मराठा लाख मराठा हा जयघोष केला. तदनंतर जरांगे पाटील रात्री १० च्या नंतर दहिवडीचे दिशेने सभेसाठी मार्गस्थ झाले.




**तिथपर्यंत नजर पुरायनां, बघ ना म्हणावं इथं येऊन :** मनोज जरांगे पाटील यांची फलटण येथील सभेची वेळ सायंकाळ ५ वाजता होती .परंतू पुण्यातील राजगुरूनगर आणि बारामती येथील सभा सुद्धा असल्याने फलटणच्या सभेकडे त्यांना येण्यास खूपच विलंब झाला .तब्बल पाच तासांनी ते स्टेजवर येताच रात्री ९ च्या दरम्यान त्यांच्या हातात माईक आल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांना तुफान अशी गर्दी पाहायला मिळाली .याच फलटणची तुफान गर्दी पाहून मनोज जरांगे पाटील म्हणाले की, काही लोकं म्हणतात मराठा एक होत नाही . "तिथपर्यंत नजर पुरायनां, बघ ना म्हणावं इथं येऊन" यावेळी उपस्थित असलेल्या मराठा समाज बांधवांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला . फलटणने एक क्रांती केलेली आहे . फलटणला मोठा इतिहास आहे .फलटणवर सुरु केलेला लढा, तो कधी हरला नाही, तो यशस्वीच झालेला आहे .असे जरांगे पाटील यांनी म्हटले .

# युवतीसेना युवासेनेतर्फे २५० अनाथ मुलींना कपडे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** युवासेनाप्रमुख आदित्यसाहेब ठाकरे यांच्या उत्तुंग कार्याच्या प्रेरणेतून शिवसेना व युवासेना सचिव मा. वरुणजी सरदेसाई साहेब तसेच शिवसेना उपनेत्या तथा युवासेना कार्यकारिणी सदस्या मा. शितलताई देवरुखकर-शेठ यांच्या मार्गदर्शनाने युवतीसेना व युवासेना युवतींच्या हिताचे अनेक उपक्रम करीत असते, युवतीसेनेच्या माध्यमातून गरीब विद्यार्थिनींचे सवलतीच्या दरात महाविद्यालयीन प्रवेश, शालेय साहित्य वाटप, यासारखे अनेक उपक्रम युवतीसेना धुळे जिल्ह्यात राबवित असते. आज युवतीसेना युवासेनेतर्फे युवतीसेनेच्या जिल्हाप्रमुख सोनी सोनार यांचेवतीने युवासेना वर्धापनदिन तसेच नवरात्रीचे औचित्य साधून धुळे शहरातील श्री संस्कार मतिमंद मुलींची आश्रमशाळा येथे २५० अनाथ मुलींना कपडे व गरजेचे वस्त्र वाटप करण्यात आले. यावेळी संस्कार संस्थेचे संचालक मंडळाने युवतीसेनेच्या उपक्रमाचे कौतुक केले, तसेच यापुढेही वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या ८०% समाजकारण व २०% राजकारणाच्या समीकरणावर आपल्या कार्याची वाटचाल असावी अशा शुभेच्छा देखील दिल्या. यावेळी युवतीसेना जिल्हाअधिकारी सोनी सोनार, युवासेना जिल्हाप्रमुख हरिष माळी, उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ, महानगरप्रमुख मनोज जाधव, जयेश सोनवणे, प्रसिध्दीप्रमुख सिद्धेश नाशिककर, जयेश फुलपगारे, शुभम फुलपगारे, श्रुती केसावलेकर आदी युवासेना पदाधिकारी व युवासैनिक उपस्थित होते.

